# माणूस

वर्षारंभ अंक

जून १९६

एक रुपय



# माणूस

मराठी मासिकपत्र

संपादक

श्री. ग. माजगांवकर

• • •

पत्रव्यवहाराचा पत्ता

'माणूस,' मराठी मासिक

४१९ नारायण पेठ, पुणें २.

* * *

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया

• • •


## — सूचना —

१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

अभिराष्ट्रेण वर्धताम्





वर्ष दुसरें : जून १९६२ : अंक पहिला


## स्वरूप–दर्शन


— सामाजिक अंतरंग —

नव्या नेतृत्वाचा मनोभंग ... ... संकलन

आंतरभारती–ओझरतें दर्शन ... ... राजा मंगळवेढेकर

— साहित्य विभाग —

वेडयांच्या सहवासांत काळ कंठणारे साहित्यिक–डॉ. अत्तरदे ... ... प्रा. भाऊ मांडवकरे

मला दिसलेले लेखक–चिं. वि. जोशी ... ... –मी

ढग ... ... वि. शं. पारगांवकर

पुतळा ... ... शरद काळे

कविता ... ... सरिता पत्की, इंदिरा कुलकर्णी, श्री. नरेंद्र पराडकर, सुरेश भट

— रंगभूमि, चित्रपट, क्रीडा —

४४ वें नाटयसंमेलन, कांही विचार ... ... एक प्रतिनिधि

सवाई माधवरावांचा मृत्यु ... ... –प्रतिनिधि

बालगंधर्वांची पहिली भूमिका ... ... संकलन

सोनियाचीं पाऊलें–परीक्षण ... ... रंगा मराठे

बचेंगे तो और भी... ... ... रा. म. शास्त्री

पुस्तक परीक्षण, विनोद इत्यादि स्फुट साहित्य.

मुखपृष्ठ—द्वितीय वर्षारंभ

—मा. द. शिंदे

# पाथेय

या अंकापासून 'माणूस' दुसऱ्या वर्षांत पदार्पण करीत आहे. गेल्या वर्षांत आम्हास साहित्यिकांचीं, मित्रांचीं, वाचकांचीं अशीं जी अनेक पत्रें आली त्यांतील कांही संक्षिप्त रूपांत पुढें दिलीं आहेत. फक्त 'ओव्यांचीं' पत्रें छापण्याची इच्छा नव्हती, परंतु शिव्यांचे एकहि पत्र वर्षभरांत येवू नये याचें आम्हासहि वाईट वाटतें.

"अंक पहिला; सध्या निघणाऱ्या गल्लाभरू मासिकांत तो निराळा आणि म्हणूनच उमटून दिसतो."

शंकर पाटील.
पुणें.
३१-८-६१.

'माणूस' मासिकाचे तीनहि अंक वाचले. मन एका नव्या अनुभूतीनें आनंदित नि उत्साहित झालें. 'यंत्रें येती घरा' हा दि. बा. मोकाशी संकलित विभाग उत्कृष्ट वाटला. मात्र विस्तृत प्रमाणांत येईल तर अधिक उत्तम.

आत्माराम पु. पाटील.
५।२५ जे. के. बिल्डिंग
गांवदेवी मुंबई. क्र. ७.
३०-९-६१.

आपला अंक पहिला. चांगल्या अभिरुचीची छाप त्याच्यावर आहे. अशा मासिकाची जास्त गरज आहे.

संजीवनी मराठे
३-९-६१.

आपल्या मासिकाचा ऑक्टोबरचा अंक वाचला. आज मुद्दाम् पत्र लिहिण्यास कारण कीं, या अंकांत पृष्ठ २२ वर 'नेपोलियन—काहीं स्मृतिरेखा' हा लेख संक्षिप्त रूपांत 'अमृत' साठीं घेऊ इच्छितों. तेव्हा तशी अनुमति द्यावी.

मनोहर शहाणे.
संपादक 'अमृत'
५-१०-६१.

माझ्या लेखाचीं कात्रणं मला कालच मिळाली. आता या बाबतीत मी मनस्वी दिलगिरी व्यक्त करतों. कारण आपण पूर्वी पाठवलेलीं कात्रणेंहि मला मिळाली होतीं. हें माझ्या सौ.नें माझ्या निदर्शनास आणून दिलें.

वि. आ. बुवा.
२०-११-६१.

अगदीं थोड्या अवधीत तुमच्या 'माणूस' नें मराठी माणसांत लोकप्रियता संपादन केली आहे.

ग. दि. माडगूळकर.
२८-११-६१.

आपलें ता. २ चें पत्र व त्या सोबतचा मानधनाचा चेक मिळाला. मानधन पाठविण्याची आवश्यकता होतीच असे नाही. 'माणूस' सारखें नव्या पिढींत पुरुषार्थाची प्रेरणा निर्माण करण्याचें ध्येय बाळगणारें मासिक चांगलें चालावे हीच माझ्यासारख्याची मुख्य इच्छा.

[illegible]ांडेकर.
कोल्हापूर.
४-१२-६१.

'माणूस' लहान असला तरी शहाणा आहे. मात्र तो अधिक बोलणारा, मिसळणारा, खेळकर हवा. मला तो किंचित् अधिक भारदस्त व गंभीर वाटतो. त्याच्याबद्दल भीतियुक्त आदर नको. प्रेमयुक्त आदर हवा.

भवानीशंकर पंडित.
७-१२-६१.

मराठीमध्यें रंजनप्रधान मासिकांचा एक साचाच मुळीं तयार झालेला आहे. त्या साच्यांतून वेगळ्या प्रकारचें मासिक चालविण्याचा आपला उपक्रम मला स्वागतार्ह वाटला.

आपण निरनिराळ्या प्रचलित प्रश्नांची आणि त्याचबरोबर कांहीं महत्त्वाच्या चिरकालिन समस्यांची चर्चा आपल्या मासिकांतून देतां तिच्यामुळें मराठी लोकसमाजापुढें जे निरनिराळे प्रश्न आज आहेत, त्यांचें मार्मिक ज्ञान लोकांना होईल.

• • •

सगळ्या दृष्टीनें आपल्या मासिकाची उपयुक्तता आणि नावीन्य हीं दोन्ही अभिनंदनीय आहेत.

ग. त्र्यं. माडखोलकर.
नागपूर.
३-१-६२

एप्रिल महिन्याचा 'माणूस'चा अंक अत्यंत उत्सुकतेने वाचला. त्यांतील विषयांची निवड रसिकतेनें केल्याबद्दल अभिनंदन.

पुण्यांतील प्रतिष्ठेच्या निवडणुकीचा शोध हा आपला लेख मार्मिक वाटला. सार्वत्रिक निवडणुकीमधील गाजलेल्या व कदाचित् ऐतिहासिक महत्त्वाच्या ठरणाऱ्या एका मतदार संघातील निवडणुकीसबंधीं अभ्यासपूर्ण विवेचन करण्याचें औचित्य 'माणूस'नें दाखविलें हें त्याच्या विशिष्ट पिंडास साजेसेंच आहे.

अर्थात् आपल्या विश्लेषणांतील अनेक मुद्यांशी मी सहमत होऊ शकलेलों नाही. प्रत्यक्ष भेटीत बोलू

य. गो. नित्सुरे.
३१-३-६२.

'माणूस' जीवनांतील विविध पैलूंना स्पर्श करतो.

अमरावतींत आपला 'माणूस' लोकप्रिय होत आहे; मात्र कुणी वाचक वर्गणीदार होण्याच्या बेतांत नाहीत. मी तरी कुठें आहें वर्गणीदार? महाराष्ट्रीय मनाची घडणच आहे फुकट वाचनाची!

ललित ठोंबरे.
विटाळा.
जि. अमरावती.
३-५-६२.

# 'माणूस'–कां व कसा?

'माणूस'ला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. जें साधावयाचे आहे तें 'माणूस'नें किती प्रमाणांत साधलें व तो काय साधूं शकलेला नाही हें या निमित्तानें एकदा पाहणें वाचकांच्या व संपादकांच्या दृष्टीनें हिताचें आहे. का कीं, त्यामुळें पुढील वाटचालीला थोडी स्पष्टता येते.

स्वातंत्र्योत्तर काळांत भारतांत महत्त्वाचीं आर्थिक व सामाजिक स्थित्यंतरें झालीं. येथें पंचवार्षिक योजना आल्या. भाषावार प्रांतरचना झाली. तीन सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या, परतु हें करीत असतां भारतीयांमध्यें जो नवनिर्माणाचा आशावाद व राष्ट्रउभारणीचा ध्येयवाद दिसून येणें अवश्य होतें त्याचा मात्र येथें अभाव आहे. देश भौतिकदृष्ट्या समृद्धीच्या मार्गावर आहे, पण देशाचें चैतन्य हरपल्यासारखें झाले आहे.

'माणूस' या चैतन्याच्या शोधात आहे. आमचें सामाजिक व वैयक्तिक जीवन पुरुषार्थाच्या जाणीवेने उजळून निघावें अशी 'माणूस' सुरू करण्यामागील प्रेरणा आहे.

प्रत्येक देशाचे असतात; त्याप्रमाणेंच भारताचे स्वतःचे असे कांही जीवनादर्श आहेत. या जीवनादर्शांची ओळख जनतेला झाल्याशिवाय तिचें सुप्त चैतन्य जागें होणार नाही, असे वाटतें. 'ओळख' याचा अर्थ या आदर्शांचें कोरडे गुणगान किंवा भाबडें पूजन असा नव्हे. त्यामागील विचारधारणेचा वेध घेऊन नवीन कालानुरूप तिचा आविष्कार करणें.

'व्यक्ति–अनुशासन' हा या धारणेचा गाभा आहे. व्यक्तीनें स्वतःचा सतत विकास साधावा व अशा आपापल्या प्रवृत्तीप्रमाणें आपापला विकासमार्ग आक्रमणाऱ्या व्यक्तींचा समाज असावा अशी आपली धारणा आहे.

ही व्यक्तिविकासाची प्रेरणा जिवत व गतिमान राहण्यासाठी सामाजिक घटक लहान असणे, जीवनपद्धति विकेंद्रित असणें अवश्य असतें.

अशा वातावरणातच भारतीयांची प्रतिभा जागृत होते, चैतन्य प्रस्फुटित होतें, चौदा विद्याचा आणि चौसष्ट कलाचा ससार येथे थाटला जातो, पराक्रमाला उधाण येतें आणि विश्वसस्कृतीत हा समाज काही स्वतःची अशी भर घालू शकतो.

आज या उलट घडतं आहे. ठोकळेबाज वादाच्या आग्रहानें, प्रचंड पक्षसंघटनेच्या बळावर देश एका साच्यांत घालण्याचा आटापिटा चालू आहे. यामूळें सर्व क्षेत्रांत केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती झपाट्यानें वाढत आहेत. हें केंद्रीकरण भारतीय जनतेच्या प्रकृतीशीं विसंगत असल्याने तिला तें 'परकें' वाटतें, त्याच्याशी ती समरस होऊं शकत नाहीं. म्हणून ती उदासीन आहे. दिवसेदिवस अधिकच पंगु व परावलंबी होत आहे.

"स्वयंप्रवृत्त जीवनाची प्रेरणा" हीच भारतीय विकासाची उत्थानभूमि आहे हे व्यक्त करण्यासाठी 'माणूस' हें नामकरण. अभिराष्ट्रेण वर्धताम्, या सूत्राची योजनाहि यासाठीच. आपणच आपला विकास साधायचा. पण एकाकी, अनिर्बंध विकासानें व्यक्ति व समाज या दोहोंनाहि हानि पोचते, म्हणून कांही 'सामाजिक ऋणा'चाहि विवेक पाळायचा.

या दृष्टिकोनातून गतवर्षी 'माणूस'ने जे साहित्य प्रकाशित केलें पक्ष, जात, संप्रदाय, धर्म याच्या पलीकडे जाऊन, एखादें 'लहानसें' शुद्ध सात्त्विक सत्य प्रकट करण्याचा जो थोडा प्रयत्न केला, त्याबद्दल अपेक्षित अशी साथ वाचकवर्गाकडून 'माणूस'ला मिळाली. मग तो प्रसग सार्वत्रिक निवडणुकीचा शोध असो की, फैजपुरसारख्या एखाद्या खेड्याच्या स्वातंत्र्योत्तर काळातील विकासाची वाटचाल असो.

पण हा दृष्टिकोन फक्त बौद्धिक पातळीवर, सामाजिक प्रश्नांची चर्चा करतानाच 'माणूस' व्यक्त करूं शकला. त्यामुळे 'माणूस' आवडला आजवर फक्त शिक्षक, प्राध्यापक व मोजक्या सुशिक्षित वाचकाला. जनसामान्यापर्यंत पोहोंचण्यासाठी भावनेचें आवाहन लागते, चित्तवेधक विषय लागतात, चटकदार शैली लागते, आकर्षक सजावट लागते. याबाबत 'माणूस'ची धाव तोकडी पडली. अर्थात 'पानशेत प्रलयाची कहाणी,' दिवाळी अंकातील 'प्रभात फिल्म कपनीची पुरवणी' असे काही चागले अपवाद जरूर दाखविता येतील, पण एकदरीत गभीर व विचारप्रधान प्रकृति अधिक व रजक कमी हे खरेच.

पहिल्या वर्षीच्या पृष्ठ–किंमत कोष्टकामुळेंहि थोडी अडचण झाली. इच्छा व कल्पना असूनहि रजनप्रधान साहित्य अधिक देतां आले नाही. आता या अकापासून या दृष्टीने सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. किंमत व पाने दोन्हीहि वाढविली असल्याने साहित्यातील विविधताहि वाढविणें शक्य झाले आहे.

असा हा 'माणूस' सर्वसामान्य माणसाप्रमाणेच चुकतमाकत, अनुभवानें शहाणा होत पुढें येण्याचा प्रयत्न करीत आहे. मराठी वाचक त्याचें स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

• • •

# नव्या नेतृत्वाचा मनोभंग

**या** महिन्यांत महाराष्ट्रांतील सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका समाप्त होऊन लोकनियुक्त सभासदांचीं नवीन जिल्हा मंडळें आस्तिवांत येत आहेत. ग्रामीण जनतेच्या निकडीच्या प्रश्नांची जाण असणारे, तिच्या विकासासाठी झटणारें नवें नेतृत्व यांतून पुढे येईल या अपेक्षेने हा प्रयत्न प्रत्यक्ष निवडणुकीचा प्रयोग महाराष्ट्र शासनाने अंगीकारलेला आहे. ही भूमिका आजवर अनेक मान्यवर नेत्यांनी व या प्रयोगाच्या निर्मात्यांनी वेळोवेळीं भाषणांतून व लेखांतून स्पष्टपणें व्यक्त केलेली आहे. एकच उदाहरण घ्यायचें झालें तर तें मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनी 'साधना' पत्राच्या विकेंद्रीकरण अंकाला जी नुकतीच एक मुलाखत दिली त्याचें घेतां येईल. या मुलाखतींत मुख्यमंत्री म्हणतात. "स्थानिक जनतेला शासकीय नेत्यांची प्रत्यक्ष चाचणी करण्याची, त्यांच्या कार्यक्षमतेचा कस पाहण्याची संधि ( विकेंद्रीकरणामुळे ) मिळणार आहे, हा प्रयोग नव्या विधायक शक्तींना आणि नेतृत्वाला जन्म देईल अशी मला आशा वाटते, अर्थात असें हमखास होईलच असें सांगतां येणार नाहीं. ही नवी शक्ति शुभदायी व विधायक असावी याची काळजी सर्वांनीच वाहिली पाहिजे. राजकीय पक्षांचा फायदा घेऊन समाजद्रोही व अप्रामाणिक शक्ति गांवांत बलशाली होण्याचा धोका जरूर आहे. ...... ( पण ) ......आपण सारेच या बाबतींत **किती जागरूक राहतों, उमेदवार निवडतांना किती काळजी घेतों आणि विशिष्ट कसोटयांचा** आग्रह धरतों यावर या **समाजद्रोही शक्ति वरचढ होतील की** नाही हें अवलंबून आहे. ( साधना. दि. १ मे १९६२ पृ. ५ )

या असंदिग्ध शब्दांत राजकीय प्रश्नांची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनीं एकदा स्पष्ट केली की, ओघानेच प्रथम त्यांचा कॉंग्रेसपक्ष उमेदवारांची निवड कशी करतो, याबाबत कोणत्या कसोटया ठरवितो, इतर पक्षांना कोणते आदर्श घालून देतो याकडे जनता अपेक्षेने पाहणार हें उघड आहे, पण अनेक ठिकाणीं असें आढळून आलेलें आहे की, कॉंग्रेसपक्षाने अधिकृतपणें निवडलेल्या उमेदवाराला स्थानिक जनतेचा व त्या भागांतील बहुसंख्य कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा म्हणावा असा पाठिंबा नाहीं, त्यामुळे कॉंग्रेसचा अधिकृत उमेदवार विरुद्ध कॉंग्रेसचा एखादा स्थानिक कार्यकर्ता असाच सामना आगामी जिल्हा परिषदांच्या निवडणुकीनें अनेक ठिकाणीं घडून येण्याची चिन्हें दिसू लागलेलीं आहेत. प्रश्न असा येतो की, कॉंग्रेसच्या धुरीणांनी मा. मुख्यमंत्र्यांनी सुचविल्याप्रमाणें उमेदवार ठरवितांना विशिष्ट कसोटयांचा आग्रह धरला की नाही ? की दडपणांना बळी पडून नको, असलेले उमेदवार स्थानिक जनतेवर लादले गेले ? असें असेल तर विधायक शुभशक्ति विकेंद्रीकरणांतून पुढें येण्याची अपेक्षा फलद्रूप होणार ती कशी ? पुढे उधृत केलेल्या दोन–तीन वार्ताच या दृष्टीनें पाहण्यासारख्या आहेत.

**औरंगाबाद दि. ५**

" जिल्हा कौन्सिलवर निवडून द्यावयाच्या कॉंग्रेसच्या उमेदवारांचं यादी प्रसिद्ध झाली आहे. तत्पूर्वी दोन दिवसापूर्वीपासूनच जिल्ह्यांतील ठिकठिकाणच्या वातावरणांत निवडणुकीसाठी काय काय होतें हें पाहण्यासाठी गेलेली व मुद्दाम भेटण्यासाठी गेलेली मंडळी मुंबईहून परत आल्यापासून पुष्कळ असंतोषाचे वारे पसरूं लागले आहेत. येथें निरीक्षक म्हणून श्री. मधुकरराव चौधरी हे आलेले होते व त्यांनी एक अंतिम यादी जवळजवळ तीच निश्चित होईल या उमेदीने नेलेली होती आणि त्या यादीनुसार स्थानिक व जिल्ह्यांतील प्रामाणिक, ध्येयनिष्ठ व सुशिक्षित कार्यकर्त्यांचा उल्लेखहि होता. विशेषतः आपापल्या विभागांतून फारसा विरोध नसणारे असे एकएक-दोनदोन उमेदवारच कांही ठिकाणीं होते. असें असतां मुंबईला शेवटीं झालेल्या यादीमध्ये अशा बऱ्याच लोकांचीं नांवें वगळलीं गेलीं आहेत. हें आश्चर्यकारकच आहे. असेंहि कळलें की, औरंगाबाद जिल्ह्याचा नंबर या अंतिम चांचणींत रात्रीचे वेळीं लागला व येथील निरीक्षक श्री. मधुकरराव चौधरी हे त्यावेळीं तेथे नव्हते. ते तत्पूर्वीच निघून गेले होते व जातांना एका दोघांच्याजवळ जरा निराशाजनक उद्‌गार त्यांनी काढले होते. त्यावेळीं उपस्थित असलेल्या निवडसमितीमध्ये श्री. आबासाहेब खेडकर, श्री. भगवंतराव गाढे, श्री. विनायकराव पाटील (प्रा. कॉंग्रेस अध्यक्ष) हेहि होते. जीं खात्रीशीर नांवें येण्याची शक्यता वाटत होती त्यांत वगळलेलीं नांवें म्हणजे वैजापूरचे श्री. बी. एम्. पाटील, कन्नडचे नारायणराव वकील, चिखलढाण्याचे श्री. भीमराव पाटील वगैरे चांगले कार्यकर्ते आहेत. अशीं नांवें कशीं आणि कां वगळलीं गेलीं हेंच समजत नाहीं. " ( सकाळ, दि. ७ मे. )

**विटे, दि. ६ ( वार्ताहर )**

"आम्ही सच्चे आणि निष्ठावंत कॉंग्रेसवाले आहोंत. कॉंग्रेसने बाबासाहेब देशमुख यांना तिकीट दिलें त्यांत अन्याय झाला आहे. ती गटबाजी आहे. तिकीट देण्यांत येणाऱ्या उमेदवाराबद्दल या भागांतील लोकांचें मत अजमावलें गेले नाही. तालुका कॉंग्रेस कमिटीची बैठक घेण्यांत आली नाही. या सर्व गोष्टी आम्ही महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीला रजिस्टर पत्राने कळवून त्याजकडे अपीलद्वारा दाद मागितली. त्यास साधें उत्तरहि आले नाहीं. या सर्व गोष्टी जनतेसमोर स्पष्टपणें याव्यात म्हणून कॉंग्रेसच्या उमेदवाराविरुद्ध प्रतिस्पर्धी म्हणून आज आम्हीं उमेदवारीचे अर्ज भरले आहेत" अशी माहिती आटपाडी येथील श्री. के. के. देशमुख, श्री. ज्ञानेश्वर पाटील या दोघांनी येथे पत्रकाराना सागितली.

आटपाडी भागातील कॉंग्रेसच्या तीनहि उमेदवारांना कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणें उभे राहून विरोध करण्याचें ठरविले आहे.

खानापूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री शहाजीराव साळुखे यांनाहि भालवणीचे श्री. धनवडे यानी विरोधी अर्ज भरला आहे. श्री. धनवडे याचा अर्ज कॉंग्रेसच्याच बडखोर गटांतून स्वतंत्र म्हणून भरण्यांत आला आहे." ( तरुण भारत दि. ७ मे. )

**भोर दि, ९ ( वार्ताहर )**

भोर तालुक्यातून जिल्हा परिषदेसाठी कॉंग्रेसचें जुने कार्यकर्ते श्री. रामभाऊ कक हे कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार श्री. अण्णासाहेब बादल यांना विरोध करून उभे राहत आहेत असें समजतें.

कल्पना येऊं लागली. उदाहरणार्थ, राहुरी तालुक्यांतील वांबोरी गटांतून कॉंग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभे असलेले श्री. बन्सीलाल गिरिधरलाल बाफना यांचीच कथा काय आहे तें पाहा.

श्री. बाफना वांबोरी या गांवचे एक प्रमुख कार्यकर्ते असून १९४० पासून ते सार्वजनिक कार्यांत निष्ठेनें भाग घेत आहेत. चाळीस सालच्या वैयक्तिक सत्याग्रहांत त्यांनी प्रथम भाग घेतला व त्यात त्यांना शिक्षाहि झाली. त्यावेळी त्याचें वय केवळ अठरा वर्षांचें होतें. वांबोरी ग्रामपंचायतीचे ते १९५६ सालापासून सरपच आहेत. वांबोरी मल्टी परपज सोसायटीचें अध्यक्षपदहि सध्या त्यांच्याकडे आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी त्यानी स्वीकारली तेव्हा सोसायटी लिक्विडेशनमध्यें निघण्याइतकी डबघाईला आली होती, परतु श्री. बाफना याच्या कुशल प्रयत्नांमुळेंच सोसायटीची परिस्थिति हळूहळू सुधारत जाऊन हल्ली तिचा 'अ' वर्गांत समावेश झालेला आहे. तालुक्याच्या व जिल्ह्याच्या पातळीवरील विविध संस्थांमध्येंहि त्यानी जबाबदारीची कामें केलेलीं आहेत.

**श्री. बाफना यांची भूमिका**

अशा कार्यकर्त्याला नवीन जिल्हा परिषदामुळें अधिक वाव मिळावा अशी सर्वसाधारण लोकमनाची अपेक्षा असणार हें स्वाभाविक आहे. — "परंतु कॉंग्रेसच्या वरीष्ठ नेत्यानी निवडणूकीचें तिकीटवांटप करतांना लोकमताच्या या अपेक्षेची कदर बाळगली नाही." असें सांगून श्री. बाफना 'माणूस'च्या प्रतिनिधीजवळ या विषयाची चर्चा करतांना पुढें म्हणाले, "लोकसेवेच्या किंवा कर्तृत्वाच्या कुठ-

**जिल्हा परिषदांच्या निवडणुकीवर प्रकाश टाकणारें एक महत्त्वपूर्ण संकलन**

**— आमच्या प्रतिनिधीकडून —**

श्री. बादल हे कायम पुण्यातच राहतात व पुण्यांतच नोकरीपण करतात. तसेंच ते लोकलबोर्डावर निवडून गेल्यापासून आपल्या भागात एकदाहि फिरकले नाहीत, इत्यादि कारणांनी ते आम्हाला नको आहेत, असें निवेदन निरीक्षक श्री. बाळासाहेब देसाई याना देण्यात आले होतें.

परंतु त्याचा काहीच विचार करण्यात न आल्यानें लोकानी श्री. रामभाऊ कक याना कॉंग्रेसचा राजीनामा देऊन स्वतत्र उभें केले आहे.

शिंदेवाडी भोगवली या गटांत श्री. हणमंतराव सोनवणे याना तिकीट दिले असून तेथेहि त्याचें नावाला जोरदार विरोध असून कामथडीचे तरुण कार्यकर्ते श्री. काशिनाथ इंगुळकर हे पण कॉंग्रेसचा राजीनामा देऊन स्वतंत्र उभे राहिले आहेत." (तरुण भारत दि.१०मे)

अगदी ठळक मथळ्याखाली गेल्या आठवड्यात वृत्तपत्रातून आलेल्या वार्ता वर सकलित केलेल्या आहेत. औरगाबाद, सातारा, पुणें या भागातील वार्ताच जरी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या असल्या तरी अनेक ठिकाणीं कमी-जास्त प्रमाणात अशीच परिस्थिति असावी असें समजण्यास भरपूर जागा आहे. कारण सहज सुचलेल्या एखाद्या ठिकाणची परिस्थितीच समक्ष पाहून यावी या उद्देशानें 'माणूस'चे प्रतिनिधि नगर जिल्ह्यातील राहुरी भागांत हिंडत असतां अनेक कार्यकर्त्यांशी मुलाखतीचे व चर्चेचे प्रसंग घडून आले व त्यामधून सर्वसाधारण कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या मनातील खळबळीची बरीचशी

त्याच निश्चित कसोटचा न लावता उमेदवाराना तिकिटें देण्यात आलीं हा आमचा दावा आहे. निदान नगर जिल्ह्यात तरी हा प्रकार फार मोठ्या प्रमाणावर घडून आला एवढें मी निश्चित म्हणू शकतों. खरे कार्यकर्ते बाजूस पडले व ज्याचा जनतेशी कोणत्याच प्रकारचा जिव्हाळ्याचा संबध नाही, पण ज्यांच्याजवळ जात व पैसा हे भाडवल आहे अशाच लोकाना कॉंग्रेसकडून तिकिटें दिलीं गेलीं. राहुरी तालुक्यांतील चार तिकिटांपैकी तीन तिकिटें अशा पद्धतीने दिली गेलीं. यावरून इतर ठिकाणच्या परिस्थितीची आपल्याला कल्पना येऊं शकेल. राहुरीचे आमचे सोनवणे पाटीलच घ्या. ते सुशिक्षित आहेत, तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आहेत व कॉंग्रेसचे या भागातील एक चागले कार्यकर्ते आहेत. वास्तविक गेल्या निवडणुकीत आमदारकीचें तिकीटच त्यांना देण्यांत यावयाचें होतें, पण ऐनवेळीं कांहीतरी चक्रें फिरली व 'जिल्हा परिषदेंत वाव देऊं' असें आश्वासन देऊन तेव्हा त्यांना डावलण्यात आलें, पण जिल्हा परिषद आली तरी सोनवणे पाटलांना तिकीट कोठें आहे? माझ्या बाबतीतहि असाच अन्याय होत आहे. मी स्वत: कॉंग्रेसचा निष्ठावत कार्यकर्ता आहें. गेलीं तीस वर्षें मी पूर्ण वेळ कॉंग्रेस-कार्यच करीत आहे. या कार्याचा दर्जा व कस लोकांना जाणवण्याइतपत परिणामकारकहि आहे. असें असताना, कोणत्याहि कसोटचा न लावतां भलत्याच माणसाला जेव्हा आमच्या

भागांतून तिकीट दिलें जातें तेव्हा विरुद्ध भूमिका नाईलाजानें घ्यावीच लागते."

सहज खपली काढावी म्हणून बाफना यांना प्रतिनिधीने प्रश्न टाकला. "पैसा व जात पाहून कॉंग्रेसने तिकीट दिलें असें आपण म्हणतां; आपल्या-जवळ तर पैसा नाही. शिवाय आपली जातहि आडवी येणार. कारण आपण अल्पसंख्य मारवाडी समाजाचे. तेव्हा आपल्या विरोधाचा काही उपयोग आहे का? शेवटीं निवडून कॉंग्रेसचाच उमेदवार येणार."

यावर बाफना यांनी जें उत्तर दिलें तें पाहून वरिष्ठ वर्तुळांत जातीयता व भ्रष्टाचार यानी कितीहि धुमाकुळ घातला असला तरी तळाला धक्का लागलेला नाही, भारताच्या मूळ समाजपुरुषाची प्रकृति निकोप आहे याची जाणीव झाली. श्री. बाफना म्हणाले, "या-पुढें प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीच्या मागेच लोक जातील. मोटारीचे ताफे, आश्वासनाची खैरात किंवा जातपात याचा बहुसंख्य समाजावर परिणाम होत नाही असा निदान माझा तरी स्वानुभव आहे. म्हणून मी अल्पसंख्य समाजाचा असलों तरी या निवडणुकीत निश्चित यशस्वी होईन असा मला विश्वास वाटतो."

"कॉंग्रेसपक्षानें उमेदवाराची चाचणी घेण्यासाठी तिकीटवाटपापूर्वी एक निरीक्षक-मंडळ पाठविलें होतें. तरीहि अशा प्रकारचे अन्याय कसे घडू शकतात?" असा प्रश्न उपस्थित केला असता श्री. बाफना म्हणाले. "निरीक्षक मंडळ हा एक 'फार्स'च होता. या भागातून निवडून आलेल्या कॉंग्रेसच्या आमदाराच्या मर्जीवरच सर्व निर्णय अवलंबून होते. त्यानी आपल्या गटाचीं जीं चार नावे पुढें ठेवलीं ती एका 'लॉटने' मंजूर करणें भागच पडावें एवढें दडपण वरिष्ठ नेत्यावर टाकण्यांत आलें. या नांवाना ना कोणती कसोटी लावण्यात आली ना स्थानिक परिस्थितीचा विचार झाला. 'आमदाराची मर्जी' एवढेंच या नावांमागील क्वालिफिकेशन. बहुतेक ठिकाणीं आमदार खासदारांच्या दलालीमुळें तळातील चागले कार्यकर्ते डावलले गेले आहेत. मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना या परिस्थितीची जाणीव आहे की नाही याची मला कल्पना नाहीं, परंतु असा अनुभव येतो की, अन्या-याची जाणीव झाली तरी ती 'मोडून' काढण्याचा कर्तव्यकठोरपणा ते दाखवीत नाहीत. शेवटपर्यंत जाऊनहि जेव्हा दाद लागत नाही असें दिसतें तेव्हा स्वतंत्रपणे निवडणूक लढविणे एवढाच पर्याय माझ्यासार-ख्याच्या समोरहि उभा राहतो. माझ्याबरोबर नगर जिल्ह्यात आण-खीहि काही सहप्रवासी आहेत. आमच्या सर्वांच्या भूमिका न्यायावर आधारलेल्या आहेत. त्यामुळें यशाची आम्हाला खात्री वाटत आहे."

### देवळाली गटाचा धाडसी प्रयोग

राहुरी तालुक्यांतील इतर भागातील कार्यकर्त्यांनी तर आपली कैफियत 'माणूस'कडे पत्ररूपानेच सादर केली. सर्व पत्रें प्रसिद्ध करणें जागेच्या अभावी अशक्य आहे, पण नमुन्यादाखल १-२ प्रमुख पत्रें पुढे शब्दशः दिली आहेत. त्यावरूनहि शब्द आणि कृति, ध्येय आणि व्यवहार यात सध्या किती जमीन अस्मानाचें अंतर पडत चाललें आहे याची विदारक जाणीव होते. हें अंतर असेच वाढत गेलें तर आरंभीच मुख्यमंत्र्यांनी आपल्या मुलाखतीत म्हटल्याप्रमाणे विकेंद्री-करणाच्या या प्रयोगातून समाजद्रोही शक्ति प्रबळ होण्याचा धोका संभवतो असें अनुमान निघत नाही काय? सर्वच ठिकाणीं हा धोका आहे असा याचा अर्थ नाही, परंतु जेथे जेथे तो दृष्टीत्पत्तीस येऊं लागल


र. नं २०२८५)

विना सहकार नहि उद्धार

(र. ता. २५-१-१९५४

शेतकऱ्यांना माल तारणावर कर्ज पुरविणें, शेतीच्या उत्पादनासाठीं सर्व प्रकारचीं सुधारलेलीं अवजारें, बी-बियाणी व उत्तम प्रतीचीं खतें पुरविणें, सर्व प्रकारचीं इंजिन्स, सुटे भाग व इंजिन तेलें पुरविणें तसेंच तालुक्यांतील सोसायट्यांना गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करणारा...

★ शेतकरी सहकारी संघ लि. ★

मालेगांव, जि. नासिक

• संस्थापक :— सहकार महर्षि कै. भाऊसाहेब हिरे •

※ उभारलेलें भांडवल २,००,००० रु. ※ वसूल झालेलें भांडवल ५७,९७५ रु. ※ रिझर्व फंड ३,२२,०६१ रु.
※ इतर फंडस् ३,३९,१७९ रु. ※ खेळतें भांडवल १३,५२,४९५ रु. ※

— मॅनेजिंग डायरेक्टर —
श्री. मंगलदास ताराचंद भावसार

— प्रेसिडेन्ट —
श्री. किसन श्रीपत शेवाळे

तारः— शेतकरी ]

[फोन नं. ४०

आहे, आणि अशीं धोक्याचीं ठिकाणें दुर्लक्ष करण्याइतकीं कमी नाहीत, तेथे तेथे समाजद्रोही शक्तींना योग्यवेळी पायबंद घालण्याचा प्रयत्न होणें निकडीचें आहे. राजकीय पक्ष जर हें कार्य करणार नसतील तर सामान्य मतदाराने आपल्या मतदान शक्तीनें हें करावयास लावणें त्यांना भाग पाडलें पाहिजे. या दृष्टीनें राहुरी भागांतील देवळाली-प्रवरा गटांतील ग्रामस्थांनी एक चांगला आदर्श या निवडणुकींत घालून देण्याचें अवघड धाडस दाखविलें आहे. या धाडसाची सर्वांना कल्पना यावी व शक्य व अवश्य तेथे त्याचें अनुकरण व्हावें यासाठी या ग्रामस्थाच्या वतीने 'माणूस' कडे सादर झालेलें प्रातिनिधिक पत्र प्रथम येथे उधृत करीत आहोंत. अशुभ शक्तींचा धोका असला तरी शुभ शक्तीहि संघटित होऊन प्रतिकार करतात ही कांही कमी आशादायक घटना नव्हे.

प्रल्हाद रंगनाथ बीडगर
मु. मांजरी, पोस्ट-करजगांव,
ता. राहुरी, जि. अहमदनगर

श्री. सपादक 'माणूस' यांस

सा. न. वि. वि.

ता. ३० एप्रिल १९६२ च्या सकाळ वर्तमानपत्राच्या अंकांत जिल्हा कौन्सिलचे उमेदवारांतील ग्रामीण भागांतील स्थानिक लोकांचा समावेश झालेला नसल्याने राहुरी तालुक्यांतील देवळाली-प्रवरा गटांत असलेल्या गांवांतदेखील १६ खेडेगांवांनी एकत्र जमून आपल्यांतील एकाला स्वतंत्र उमेदवार म्हणून निर्णय घेतला, ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर बऱ्याच लोकांनी याबाबत उत्सुकता दाखविली. म्हणून या निर्णयामागील विचार लोकांना समजावून सांगावेत या हेतूने हें पत्र आपणाकडे पाठवून दिलें आहे.

ग्रामीण विभागावर जबरदस्तीने त्यांना नको असलेलें नेतृत्व लादण्याचा लोकशाहीला घातुक असा रिवाज आज राजकीय पक्षांत पडत आहे. ज्यांचा प्रतिनिधि म्हणून जो माणूस त्या भागांतून निवडून जाणार त्याच्याबद्दल निवडून देणाऱ्या मतदारांना जिव्हाळा वाटत नसेल तर तो माणूस त्या विभागाचा योग्य प्रतिनिधि ठरणार नाही या विचारानेच या भागांतील १६ खेड्यांनी एकत्र येऊन हा निर्णय एकमताने घेतला.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकींच्या वेळीं आमच्या खेडयांना जिल्हा कौन्सिलमध्ये तुमच्या खेडयांतूनच उमेदवार निवडून देऊं असें आश्वासन देऊन आम्हाला ता. १०-४-६२ ला तालुक्यांत उमेदवार निवडण्यासाठी बोलाविलें. त्यावेळी आम्हाला त्याबाबत विचारपूस न करतां दिलेलें आश्वासन पाळलें नाही. या विभागांत बाहेरील उमेदवार जर आला गेला तर त्याला इथल्या जनतेबद्दल तितकासा जिव्हाळा राहणार नाही आणि आता म्हणूनच आम्ही आमच्या भागांतील सर्व लोकांनी विचारविनिमय करून शेवटीं १६ गांवांच्या लोकांनीं एकत्र पायरें गांवीं जमून मारुतीच्या देवळांत प्रत्येक गांवचा उमेदवार म्हणून सोळा लोकांच्या नांवाच्या चिठ्या टाकून एका मुलाकडून त्यांतील एक चिठ्ठी उचलून ज्याचे नांवाची चिठ्ठी निघेल तोच आपल्या विभागांतील अधिकृत उमेदवार समजावा असें प्रतिज्ञेवर ठरलें.

जमलेल्या आमच्या मंडळांत— जातीयता पक्ष वगैरे याबाबत आम्हीं कोणताच विचार केलेला नाहीं. मी जातीने धनगर आहें व आमचा भाग हा बहुसंख्य मराठा समाजाचा आहे. या लोकांनी मला पाठिंबा दिला व मला स्वतंत्र उमेदवार म्हणूनच उभें केलें. याबद्दल आनंद व अभिमान वाटतो.

आम्हीं पूर्वीपासूनच सर्व भाग कॉंग्रेस विचारसरणीचा आहे आणि आजहि तीच विचारसरणी आमच्यांत आहे. परंतु सध्यां कॉंग्रेसमध्ये जे संधिसाधु लोकांनीं प्रवेश करून जो कबजा केला आहे. व निष्ठावंत कार्यकर्ते बाजूला टाकले गेले आहेत. हे संधिसाधु लोक वेळेनुसार स्वार्थासाठी सवयीप्रमाणे टोप्या बदलण्यास कमी करणार नाहीत व त्यामुळें कॉंग्रेससंघटनेचें पुढे काय याबद्दल प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्ता विचार करीत आहे.

ग्रामीण मतदारांच्या विचाराचे पर्वा न करतां त्याच्या डोक्यावर आपल्याला हवा तो माणूस जबरदस्तीने लादण्याची पद्धत कॉंग्रेसमध्ये रूढ होत आहे. त्याला विरोध करावा या हेतूनेच हा खटाटोप केला आहे.

आपला

कळावें. ता. ७-५-१९६२ (सही) प्रल्हाद रंगनाथ बीडगर

श्री. बीडगर कोणत्याहि विशिष्ट पक्षाला वा वादाला बांधलेलें "जुने" कार्यकर्ते नसून त्यांच्या रूपाने एक अ-राजकारणी व अपक्ष विचारसरणीचें नवें नेतृत्व पुढे येण्याचा संभव आहे. अर्थात् असें नेतृत्व ग्रामीण विकासाला नवें वळण व उठाव आणील की पक्षीय राजकारणाच्या रस्सीखेचीत तें निष्फळ ठरेल हे आज सागणे कठीण आहे. परंतु एक नवा प्रयोग म्हणून देवळाली-प्रवरा गटाच्या निवडणुकीला एक विशेष महत्त्व आहे एवढें खरें. याउलट दुसऱ्या पत्राचे लेखक श्री. बक्षुभाई हे एक जुने व अनुभवी राजकीय कार्यकर्ते असून त्यांनी आपल्या पत्रांत उपस्थित केलेल्या विचाराना कॉंग्रेसपक्षाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. श्री. बक्षुभाई लिहितात—

शेख अबुभाई बक्षुभाई
मु. पो. राहुरी, जि. नगर
ता. ७ मे १९६२

श्री. सपादक "माणूस" यांस

स. न. वि. वि.

जिल्हा परिषदेच्या येत्या निवडणुकांत राहुरी मतदारसघामधून स्वतत्र उमेदवार म्हणून मी निवडणूक लढविण्याचें ठरविलें आहे. या भागातील मी एक जुना कॉंग्रेस कार्यकर्ता आहें. आणि माझ्या समजुतीप्रमाणे मी पक्षाचें कार्यहि १९३८ पासून आज अखेरपर्यंत प्रामाणिकपणें करीत आलों आहे. आजहि कॉंग्रेसविषयी मला नितांत आदर आहे. परतु एका हेतुसाठी मीं स्वतत्र म्हणून निवडणूक लढविण्याचें

ठरविलें आहे. माझा विचार महाराष्ट्रांतील कॉंग्रेसच्या ग्रामीण विभागांत तळमळीने काम करीत असलेल्या अनेक कार्यकर्त्यांना उपयोगी ठरेल. त्याचप्रमाणे लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा प्रयोग यशस्वी होण्याच्या दृष्टीनेहि हा महत्त्वाचा आहे अशी माझी नम्र समजूत आहे. या पत्राला आपण आपल्या लोकप्रिय "माणूस" मासिकांत कृपया प्रसिद्धी देऊन, हा विचार जनतेसमोर न्यावा अशी विनंती आहे.

मी धर्माने मुसलमान आहे. १९३२-३३ मध्ये मीं अहमदनगर जिल्ह्यात पहिल्यांदाच राहुरी तालुक्यात मुस्लीम लीगची स्थापना करून मग सबंध नगर जिल्ह्यात तिचें कार्यक्षेत्र वाढविलें. असें १९३७ ते ३८ पर्यंत मीं जिल्ह्यात मुस्लीम लीगचें कार्य करीत होतो. त्यावेळी मी मुस्लीम लीगच्या तालुका शाखेचा सुरुवातीपासून अध्यक्षहि होतों. मुस्लीम लीगचें जिल्हा ऑफिस राहुरीला आणावे आणि तें सर्व काम मी पाहावे असा मला प्रांतिक मु. लीगचा आदेशहि आला होता, परंतु केवळ माझ्या समाजाच्या अल्पशा क्षेत्रांतच काम करणें विचारांती मला अयोग्य वाटू लागलें. खूप विचार केल्यानंतर मला लीगचें तत्त्वज्ञान पटेनासें झालें. म्हणून १९३८ सालीं मु. लीगचा राजीनामा देऊन मीं कॉंग्रेसप्रवेश केला. त्या काळांत माझा सर्व समाज लीगच्या पाठीशी असताना मी त्या सर्वांचा विरोध पत्करून केवळ एकट्यानें कॉंग्रेसप्रवेश केल्यानतर मला आपल्या समाजाकडून किती त्रास सहन करावा लागला असेल, याची कल्पना इतराना येईल असें वाटत नाही, परंतु केवळ राष्ट्रप्रेमाखातर मी तो सर्व त्रास सोसला आणि मनापासून पटलेल्या कॉंग्रेस– विचाराची मी आजपर्यंत सोबत करीत आलो आहें.

१९४२ च्या लढ्यांत जिल्ह्याच्या पहिल्या सत्याग्रही तुकडीत मीं भाग घेतला होता. मला तीन महिन्याची सजाहि झाली होती. १९४५ पासून तर मी कॉंग्रेसचा सर्ववेळ सेवक म्हणून काम करतों आहें. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळांत ज्या वेळीं कॉंग्रेस बिकट परिस्थितीत आली होती त्यावेळीहि माझी कॉंग्रेसनिष्ठा कमी झाली नाही.

आजवर अनेक वेळां जिल्ह्यांतील अनेक मानाच्या जागांवर जाण्याचा प्रयत्न करणें शक्य असूनसुद्धा, निवडणुका जरी कॉंग्रेससारखी जातिवाद न मानणारी सस्था लढवीत असली तरी मतदारांच्या मनांतला "जातिवाद" अद्याप गेला नसल्यामुळे आणि मी अल्पसंख्य जमातीतील असल्याने जागा गमावून पक्षाची इज्जत कमी होऊं नये याच विचारानें मी बाजूला राहत आलों आहें. सध्या जनतेंतील जातिवाद कमी होतो आहे असें वाटल्यावरून आणि प्रथम जिल्हा कार्यकरिणी व जिल्हा कॉंग्रेसनियंत्रण मंडळ यानी एकमताने माझी एकट्याचीच शिफारस केली असल्यामुळें मला राहुरी मतदारसघांत तिकीट मिळेल याची खात्री होती. म्हणूनच मी निवडणुकीत उतरण्याचें ठरविले होतें, परतु आमच्या मतदारसंघातून नुकतेच निवडून आलेले आमदार यांनी प्रातिक पार्लमेंटरी बोर्डामध्यें जाऊन माझ्या म्हणण्याप्रमाणे या मतदारसंघातील चारीहि जागा वांटत असाल तर मी निवडणुकीत भाग घेऊन चारहि प्रतिनिधि निवडून आणेन अशी खात्री त्यांनी दिल्यामुळे जिल्हा पातळीवरील शिफारशी केलेल्या लोकाचा काहीहि विचार न करतां त्या आमदारांच्या म्हणण्याप्रमाणें राहुरी मतदारसघातील चारहि जागाची वांटणी केली गेली, परतु या जागांचें वाटप करताना त्याच्या कॉंग्रेसच्या निष्ठेचा, त्याने आजवर केलेल्या जनसेवेचा किंवा त्या भागातील त्याच्या लोकप्रियतेचा मुळीच विचार केला गेला नाही. फक्त पैसा, मोठी बगायतदारी, मोटारगाड्या हेंच पाहिलें गेलें. ही सरंजामदारी विचारसरणी लोकशाही विचाराला मारक ठरेल असे मला प्रामाणिकपणे वाटत असल्याने याला विरोध करण्यासाठी आणि निवडून आल्यावर फक्त बहुमानासाठी त्या खुर्चीचा उपयोग करून जनसेवेच्या कामांत मुळीच भाग न घेणाऱ्या लोकांचा निषेध म्हणून मी कॉंग्रेसचा राजीनामा न देतां स्वतंत्र उमेवार म्हणून उभा राहिलों आहें.

जिल्हा परिषदाना जास्त अधिकार देऊन ग्रामीण विकासाच्या कामांची जबाबदारी तिथल्याच कार्यकर्त्यांनी स्वतःवर घेऊन ती काम थोड्या खर्चांत कशीं होतील, उत्तम कशीं होतील हें त्यानी पाहावें. तसेंच प्रथम लहान लहान जबाबदारीची कामें अगावर घेऊन तीं पुरी करण्याची स्थानिक कार्यकर्त्यांना सवय व्हावी, त्यांचा अनुभव व आत्मविश्वास वाढीला लागून त्यांतून ग्रामीण नेतृत्व पुढे यावें यासाठीं हा विकेंद्रीकरणाचा धाडसी प्रयोग सरकारनें हातीं घेतला आहे. अशा वेळी कुठल्याहि का पक्षाचा असेना, पण जनसेवेचें काम करण्याची तळमळ असणारा, सतत कामांत रमणारा असा लायक उमेदवार जर त्या भागांतुन निवडून गेला नाही तर लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीनें चालू केलेला हा विकेंद्रीकरणाचा प्रयोग यशस्वी होणार नाही. त्यांतून नवे नेतृत्व तर वर येणारच नाहीं. उलट गोंधळ माजण्याचाच संभव आहे. फक्त या कारणासाठीच मी स्वतंत्र म्हणून निवडणूक लढविण्याचें ठरविलें आहे. माझ्याप्रमाणेच या राहुरी मतदार संघांतील इतर तीन जागाहि माझ्या विचाराच्या कार्यकर्त्यांनीच लढविण्याचें ठरविलें आहे.

कळावें.

आपला

**शेख आबुभाई बक्षुभाई**

अशी आहे या एका विशिष्ट भागांतील सामान्य कार्यकर्त्यांची मनोव्यथा. विरोधी पक्षांतील कार्यकर्त्यांची अवस्थाहि यापेक्षा अधिक स्पृहणीय आहे असें म्हणवत नाही, कारण अशा एका कार्यकर्त्याशी संभाषणाचा योग आला असतां "सामान्य कार्यकर्त्याचे दिवस सपले" असेच खेदाचे उदगार त्यानें काढले. सर्वसामान्य परिस्थितीतला कार्यकर्ता पुढे यावा व त्याच्या माध्यमांतून ग्रामीण जनतेची उपजत शक्ति विकसित व्हावी या उद्देशानें सुरू होत असलेल्या विकेंद्रीकरण प्रयोगाच्या आरंभीच अशा अनेक ठिकाणच्या, अनेक पक्षाच्या व अनेक कार्यकर्त्यांवर मनोभंगाचा प्रसंग यावा हें प्रयोगाच्या यशाला मारक आहे. ज्याच्याजवळ पैसा व साधनें आहेत अशाच व्यक्तीला ही नवी लोकशाही येथेही माळ घालणार असेल तर यांमधून कोणत्या नव्या, शुभ व विधायक शक्तीची आपण अपेक्षा करूं शकतो ? कारण विकासाचे विविध कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचवून त्या कार्यक्रमाना जनतेचें सहकार्य उपलब्ध करून देणारा 'कार्यकर्ता' हा एकच महत्त्वाचा दुवा आहे. तो जर येथे डावलला जात असेल, तर जुन्या विकास योजनांची नवीन पुनरावृत्ति व समाजद्रोही व्यक्तीची शिरजोरी याहून निराळें काय घडणार ? 'जागरूक प्रयत्नांची आवश्यकता' सर्वचजण प्रतिपादन करतात. प्रश्न आहे या दृष्टीने कोण प्रत्यक्ष कृति करतात एवढाच !

●●●




वि. शं. पारगांवकर

सडकेवर पोहोचलों तेव्हा दहा वाजत आले होते. मोटारची वेळ झालीच होती. आता झटकन मोटार मिळाली की वेळेवर मुंबईला घरीं पोहोचतां येईल आणि पुढचीं आखलेलीं सारीं कामें व्यवस्थित होतील.

जवळ जवळ जंगलांतूनच ही मोटारची सडक गेली होती. मैलभर खाली लवणांत खेडें लपलेलें होतें. वर चढून माथ्यावर आलें की पूर्व-पश्चिम पांढऱ्या शुभ्र सडकेचा पट्टा दिसत होता. खेड्यावरून चालत चालत आलें म्हणजे पलीकडच्या वाकड्या बाभळीच्या झाडापासून ही सडक प्रथम दृष्टीस पडते. आणि शहरी माणसाच्या मनाला फार बरें वाटतें. सडकेला पाहून माणसांत आल्यासारखें वाटतें! मनगटावरील घड्याळाकडे लक्ष जातें. शहरांत दूरवर असलेल्या बायका-मुलांची आठवण येते. इतर साथीदारांची, मित्र मंडळींची आठवण येते. आखीव संस्कृतीच्या परिपोषाचे शहरी सुळके मनाच्या डोळ्यांना दिसूं लागतात.

ही आडवी सडक पाहिल्याबरोबर माझा मेलेला उल्हास परत आला. कारण पाऊस पडूं लागण्यापूर्वी मीं सडक गाठली होती! सकाळपासूनच आभाळ गच्च भरून आलें होतें. अगोदर एक काळा, मोठा ढग पश्चिमेकडून हळू हळू वर सरकत होता. तो सकाळीं फार अवाढव्य आणि जड, साकळलेला वाटत होता! त्याच्या मनांत आलें असतें तर खेड्याच्या आणि सडकेच्या मधल्या प्रवासांतच त्याने माझ्यावर वर्षाव केला असता. मग मला त्या दगडधोंड्यांच्या पायवाटेने नीट चालतां आलें नसतें आणि कुठे तरी एखाद्या झाडाखाली ताटकळत उभा राहून पाऊस थांबेपर्यंत वाट पाहात उभें रहावें लागलें असतें. आणि इकडे मोटार चुकली असती. मग पुढचे सारे महत्त्वाचे कार्यक्रम फिसकटले असते!

परंतु मीं सडक गाठीपर्यंत तो ढग नुसताच वर आभाळांत लोंबकळत राहिला होता. मधून मधून दिवस गेलेल्या मांजरीसारखा गुरगुरत होता. आणि माझ्या पोटांत भीतीने कांटा उभा रहात होता!

शेवटी एकदाचा मी वर चढून आलों आणि तो ढग कोसळला नाही. आता पाऊस सुरू झाला तरी हरकत नव्हती! या चिंचेच्या डेरेदार झाडाखाली उभा राहून मोटारची वाट पाहतां येणार होती आणि आता पांच-दहा मिनिटांत मोटार आलीहि असती!

मोठ्या उत्साहांत मीं सिगारेट पेटविली. आणि गार हवेबरोबर मी तिचे झुरके घेऊं लागलों! मघाचा ढग आता माझ्या अगदीच जवळ आलेला होता! शिवाय पश्चिमेकडून त्याच्याच जोडीला काळ्या ढगांची एक फळीच उठली होती! सकाळची प्रसन्न उन्हाची वेळ असूनहि चहूकडून अंधारून आलेलें होतें. आणि त्या उघड्या रानांत उगीचच दम कोंडल्यासारखें वाटत होतें!

माझी मोटार पूर्वेकडून येणार होती. माळाच्या सखल भागांतून दुतर्फा झाडीमधून दूरवर गेलेली ती सडक मैलभर सरळ पूर्वेकडे जाते आणि मग त्याहीपेक्षा आणखी उंच चढून सरळ दक्षिणोत्तर होते थोडा थोडा चढत गेलेला तो पांढरा शुभ्र पट्टा आजूबाजूला झाडी नसल्यामुळे स्पष्ट दिसतो. ही सडक अशी आडवी, दक्षिणोत्तर जवळ जवळ मैलभरपर्यंत डोळ्यांना दिसते. शेवटीं एक मोठें काट शेवरीचें झाड दिसतें आणि तिथून ती सडक पुन्हा पूर्वेकडे वळून घाटांत उतरूं लागते

मोटार घाट चढून वर आली की, त्या काट शेवरीच्या झाडाखाली उभी राहते. अशी उभी राहिलेली तांबडी मोटार, इथे या चिंचेच्या झाडाखाली उभें राहिल्या राहिल्या सहज दिसते. आणि तिथून मग आपल्या जवळ येईपर्यंत दोन मैल तिच्या मागे उडणारा धुळीचा लोट दिसत राहतो!

परंतु मला आता सडकेवर येऊन जवळ जवळ तास होत आला तरी मोटार दिसत नव्हती. खाली घाटींत पाऊस कोसळत असल्याचें दिसत होतें आणि इथेहि पाऊस सुरू झाला होता. माथ्यावरचा मोठा हत्तीएवढा काळा ढग कोसळत होता.

अगोदर चार टपोऱ्या थेंबांनी पाऊस सुरू झाला आणि पंधरा-वीस मिनिटांतच चांगल्या सणसणीत लांबसडक जलधारा त्या वातावरणांत सरसरूं लागल्या! पुढे पुढे तर पाऊस इतका वाढला की, दहा हातांवरची वस्तूहि दिसेनाशी झाली! यावेळीं मोटार आली असती तर तिची माझी दृष्टादृष्ट झाली असती की नाही शंकाच होती! चिंचेच्या खोडाशी मी चिटकून उभा होतां आणि जेवढें

कोरडें राहतां येणें शक्य होतें तेवढें राहण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो.

भोवताली इकडे तिकडे चिटपाखरू दिसत नव्हतें. चहूकडून फक्त पावसाच्या धारा वाजत होत्या. आणि तिथे मी एकटा जीव दूरवर असलेल्या माझ्या जगातील मुला-माणसाच्या आठवणी करीत दिङ्मूढ होऊन उभा होतो.

या पावसामुळे माझे पुढचे सारेच कार्यक्रम कोलमडणार याची धास्ती वाटत होती! मोटार अजूनपर्यंत आली नव्हती आणि आता खालच्या घाटातील धुवाधार पावसामुळे ती वेळेवर येईलच याची खात्री वाटत नव्हती!

मी भिजून चिंब ओला झालो होतो. डोक्यातून पाणी कपाळावर येत होते. आणि डोळ्याच्या पापण्यावरून, नाकाच्या शेंड्यावरून, हनुवटीच्या गोलग्यातुन वाहात होतें. थंडीनें हुडहुडी भरत होती दातावर दात वाजत होते आणि पायावरून घळा घळा पाणी वाहात होते. मध्येच आभाळात गडगडाट होत होता येवढा कडाडून आवाज येत होता की, छातीत धस्स होत होतें.

चहूकडून कोंडमारा झाला होता! ज्याला बोलता येतें अशा माणसाने दोन तास एखाद्या मुखस्तंभाप्रमाणे गप्प बसावे, चार शब्द बोलण्याकरिता एखादें माणूस जवळपास नसावे! आणि इथें या आडरानात एखादें माणूस जरी भेटले तरी त्याच्याशी बोलणार काय?

पाऊस सारखा कोसळत होता. जमिनीवर चहूकडे पाणीच पाणी झाले होते मोटार येत नव्हती. वेळ जात नव्हता. सारेच उलटें-पालटें झाले होते!

शेवटी जवळ जवळ एक तासानंतर पाऊस कमी झाला. सारे कोसळण्याचे थांबले, तरी बारकी भुरभुर चालूच होती. परंतु आता आभाळ बरेच निवळले होते माथ्यावरचा मोठा ढग नाहीसा झाला होता. आणि सूर्याचे कोवळें ऊन दिसण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्या थोड्याशा बदलामुळे माझ्या वृत्ती फुलल्या आणि सिगारेट ओढावीशी वाटू लागले!

मी सडकेवर येऊन तीन तास होऊन गेले होते. मोटार आली नव्हती. आणि माझ्या छातीवर पुन्हा दडपण येऊं लागले होतें. पावसाची भुरभुर थांबली तर नव्हतीच. उलट मधूनच एखादी सडसडीत सर येत होती आणि हवेत गारव्याचे दाट थर जमत होते. आता तीन तास उभा राहून पायाला कळा लागल्या होत्या कुठे खाली बसून म्हटलें तर कोरडी जागा नव्हती!

एखाद्या पूर्वकालीन गुलामाप्रमाणे किती वेळ उभें रहावे लागले असते तें सांगता येत नव्हते. पावसाची भुरभर चालूच होती. येवढ्यात खालच्या खेड्यातून लवण चढून एक किरकोळ मुलगी वर येताना दिसली तीन-चार तासानंतर माणसाच्या अस्तित्वाची चाहूल लागली!

त्या मुलीच्या डोक्यावर लोखंडी टोपले होते. ते तिने डाव्या हाताने पेलून धरले होते आणि उजव्या हातात दोरी होती. त्या दोरीचे दुसरे टोक एका करडाला बांधलेले होतें. मुलगी फार तर नऊ-दहा वर्षांची असावी आणि ते करडू तर अगदीच कोवळें होते. त्याला धडपणे चालताहि येत नव्हतें! आणि थंडीने ते गपाटून काकडले होतें. ते सारखे मागे मागे ओढ घेत होतें, किंवा मरगळून बसूनच राहात होते! मध्येच बारीक कापऱ्या आवाजात व्यँ ऽऽऽ करीत होते.

त्या मुलीची डोकीवरची टोपली आणि हातातील करडू साभाळता सांभाळता त्रेधा उडत होती! जवळ जवळ चार हात पुढे सरकण्यास तिला अर्धातास लागला! बऱ्याच वेळाने ती थोडी अधिक जवळ आली होती. ती काळी कुळकुळीत पोरगी उजव्या डोळ्याने पुन्हा आंधळी होती!

आणखी ती थोडी पुढे आली आणि पावसाची सर सरसरून आली. पुन्हा पावसाचे थेंब चहूकडून अंगावर पडू लागल्यामुळे तें कोकरू थंडीने काकडले आणि एक रेसभरहि पुढे न सरकता सारखें वँऽऽऽ करू लागले! ती मुलगी अगोदरच खूप थकलेली दिसत होती. एकीकडे थंडीनें काकडत डोक्यावरची टोपली सभाळीत त्या कोकराला बरोबर नेणे आता तिला अशक्य झालें असावें. परंतु ती न चिडता हरप्रकाराने त्या कोकराला चुचकारण्याचा, ओढण्याचा प्रयत्न करीत होती.

असे बराच वेळ चाललें होते. परंतु तें कोकरूं थोडेंहि पुढे सरकण्यास तयार नव्हते.

माझें मन एकदा त्या मुलीकडे, त्या कोकराकडे ओढ घेत होतें. तिला मदत करावी असें वाटत होते. फार पूर्वी अगदी लहानपणी मी या खालच्या खेड्यांत अनेक वेळां आलों होतो, कित्येक महिने इथे राहिलों होतो. इथे माझे लहानपणीचे बरेच मित्र मी जमविलेले होते. त्याच्याबरोबर मनमुराद खेळलो होतो. कित्येक रात्रीचीं स्वप्नें मला त्याच्या मेळाव्यातच पडली होती. आणि याच्यातून फुटून शहरांत जावें, शिकावें असें तेव्हा मुळीच वाटत न हते तेव्हांचें आलमन निराळें होतें त्याची स्वप्ने, आकांक्षा निराळ्या होत्या. तें लवणातल खेड, हें माथ्यावरच डेरेदार चिंचेच झाड, पलीकडच तें सडकेच्या वळणाला साक्षी ठेवून उभं राहिलेल काट शेवरीच झाड—इथल्या खाचा, खळगी, ओढे, माळ साऱ्या स ऱ्यात माझी प्रतिबिंब पडलेली आहेत माझ्या मनात. हे असे विचार चालले होते तेवढ्यात बाजूला धपकन् आवाज झाला आणि कोकराचा कापरा "वँऽऽऽऽ" आवाज वातावरणात घुमला. मी भानावर येऊन तिकडे बघितल. त्या मुलीने काठीचा एक रपाटा त्याच्या पाठीत घातला होता तिच्या चेहऱ्यावर त्या कोकराविषयीचा राग मुळीच दिसत नव्हता. फक्त ती चिडली होती, गारठली होती, शिवा चेहरा केविलवाणा दिसत होता.

तिच्याकडे लक्ष गेल आणि माझे पाय तिकडे वळले मी पळत पळत जाऊन त्या मुलीच्या हातातली दोरी घेतली आणि त्या कोकराला दोन्ही हातात वर उचलून घेतलं.—माझ्याकडे पाहून आणि मी कोकराला एकदम वर उचलल्याचें लक्षात येऊन ती मुलगी घाबरली. तिला वाटले, हा अनोळखी, परका छाकटा इसम कुणी तरी चोर असावा आणि आपल्या कोकराला पळविण्याचा याचा बेत असावा. असे तिच्या मनाने घेतल्याबरोबर ती "बाबाऽऽऽ" म्हणून मोठ्याने ओरडली. आणि थंडीने काकडत नव्हती इतकी भीतीने काकडू लागली! तिची भावना लक्षात येताच मी कोकराला खाली ठेवले आणि मुलीच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

"अग, मी कुणी परका नाही! इथं माझं सार लहानपण गेलेल आहे.— तू कुणाची कोण?"

परंतु त्यावर ती बोलली नाही. मग पुन्हा मीच पुढे विचारल,

"तुझ्या बाबाचं नांव काय? आणि एकटी तूं कुठं निघालीस या पावसात?"

तरीहि ती कांही बोलली नाही. अजून ती भीतीने थरथरत होती. आणि मी कुणी माणूस

असून त्याच्यांतलाच आहे हें तिला काही केल्या पटत नसावेसे दिसत होतें!

आम्ही एक भाषा बोलत होतो जमिनीच्या एकाच पट्ट्यावर राहात होतों. आमच्या भावनाही थोड्याबहुत प्रमाणात एकच होत्या. तरीहि तिला मी पूर्ण परका, या परिसरात न बसू शकणारा वाटत होतों! गडगडत येणाऱ्या आणि कोसळणाऱ्या ढगाप्रमाणे माझीहि तिला भीति वाटत होती! –शेवटी मी तिला म्हटल,

"तू कुठ चाललीस? तुला या कोकराला घेऊन जाता यणार नाही. इथच कुठ जवळपास तुला जावयाचं असल तर मी तुला सोबत करतों! चल–"

म्हणत मीं तिच्या उत्तराची वाट पाहिली नाही. कारण मला तरी वेळ कुठे होता? आणि ही जमीन मला सारखी उचलून टाकीत होती. मुबईतील माझें घर दृष्टीसमोर येत होतें. पाच-सहा महिन्याच्या प्रमोदच्या इवल्या हाताचे गुलाबी तळवे डोळ्यासमोर नाचत होते. आज मोटार आली नाही तर–मी घरी वेळेवर पोहोचू शकणार नव्हतो! बायकोची ओढ, मुलांची, तिथल्या घराची, सडका, मोटारी, जिवत हालचाल साऱ्याची ओढ अस्वस्थ करीत होती.

माझ्याच भानात मी चालूं लागलों. कोंकरू उचलून पुन्हा मी दोन्ही हातात धरले होतें. आतापर्यंत त्या मुलीची भीति जरा कमी झाली होती. भीड जरा चेपली होती. माझ्या मागून चिखलांत पचापचा पाय वाजवीत ती तुरुतुरु चालत होती. माझ्या बरोबरीला येण्याचा प्रयत्न करीत होती मी तिच्या मनातली ही धडपड जाणली. आणि माझी चाल किंचित् कमी केली, पण माझी दृष्टि लाबवर काटशेवरीपासून पुढें गलेल्या सडकेकडे होती. न जाणो मोटार आली तर–तर या कोकराला, या मुलीला असेच इथे सोडून द्यायचें; आणि धडपडत धावत–पळत जाऊन मोटार गाठायची! पण दूरवर कुठेहि मोटारीचा तांबडा ठिपका दिसत नव्हता! माझें मन व्याकुळ होत होतें. आणि मी तसाच चालत होतों. तें कोकरू आदबशीरपणे माझ्या दोन्ही हातांच्या कवेत निर्धास्त होऊन डोळे मिटून बसले होतें. माझ्याशी तें अगदी चार-दोन मिनिटातच समरस झालें होते! आणि ती मुलगीहि! एव्हांना ती माझ्या बरोबरीला चालत होती! मी तिच्याकड पाहात तिला विचारले.

"कुठ जायच आ?!"

"त्यो पल्याड!"

पल्याड म्हणजे पलीकडे. हा शब्द याच ठिकाणी मी लहानपणी शिकलो होतों. आज वीस वर्षांनी तो पुन्हा कानावर पडत होता; तेवढ्यातहि मला त्याची मौज वाटली आणि काही अधुक पूर्वस्मृति चाळवल्या. मुबईची, गुलाब ळाची, तिथल्या वातावरणाची, बायकोची आढ लुळी पडली! मी मुलीला विचारले पल्याड म्हणजे कुठे–किती दूर?

"ह्यो लवनाखाली. आव्याच्या झाडापाशी!"

दूरवर खाली लवणात आव्याचे डेरेदार झाड दिसत होतें. झाडाच्या कडेने एक ओढा वाहात गेलेला दिसत होता आणि पलीकडच्या बाजूला लहानसे हिरवे गार जमिनीचे तुकडे दिसत होते. एक उघडावाघडा माणूस खाली वाकून तिथे काम करीत असलेला झावळाझावळा दिसत होता.

मी त्याच्याकडे दृष्टि फेकीत मुलीला विचारले.

"तो कोण आहे तुझा?"

"मापला बा!"

"ऐकटाच काम करतोय. साथीला कुणी नाही काय?"

"कुनी बी न्हावी! आमची जमिन लयी थोडी हाय! आन दरसाल पावसाळयांत वाहून जाती?"

"अस?"

टिचभर जमिनीचा तुकडा, कमरेला लगोटीवस्त्र धोतर, पोरीच्या अगावर परकर पोलकादेखील धड नाही!

आम्ही खाली उताराला लागलों होतों. मुलगी आपला शिवार दृष्टीच्या टप्प्यात आल्याबरोबर उल्हसित झाली होती. आपणहून ती म्हणाली.

"औदा भुईमुग पेरलयू रानात!"

भुईमूग पेरला काय आणि भात लावल काय मला सार सारखच होत! मी विशेष काहीच उत्सुकता दाखविली नाही, पण मुलगीच पुढे म्हणाली,

"बाबा म्हतोय औदा पैका दील जिमीन!"

मला तिच्या बोलण्याची मौज वाटली कुतूहलाने तिच्याकडे पाहात मी म्हणालो

"कशाला, का हवाय पैसा इतका?"

"बाबा उन्हाळयात लगीन करनार हैती मापलं!"

"इतक्या लहानपणी–?"

मी विचारले खरें, पण तिला त्यांचा काहीच अर्थ समजला नाही! जणू माझा मधला प्रश्न ऐकलाच नाही असं दाखवीत तीच पुढे म्हणाली,

"आणि बा बी सवताच लगीन करणार है!"

'आँ?'

आता त्या मुलीचं रान माझ्या दृष्टीच्या पूर्ण टप्प्यात आल होत. भूईमुगाच्या वेलीची हिरवी पिवळी पानं स्पष्ट दिसत होती. फाटक्या अगाचा दारिद्र्याने लडबडलेला तिचा बा मला दिसत होता. आबा थोडस पुढे चालून गेले की, तिच्या रानांत आम्ही पोहोचणार होतों!

परतु बाबाच्या लग्नाची गोष्ट ऐकून मी चकमलो होतो! मुलीकडे बघत मी तिला विचारले

'तुला आई न्हाशी वाटत?"

"मला आई होती. पन् ती निघून गेली!"

"म्हणजे?"

"नादत न्हाशी म्हणाली बाशी ऽऽ!"

म्हणजे तिची आई जिवत होती आणि हिच्या बाबाबरोबर नादत नव्हती!

"का ग?"

"मापला बा गरीब हाय म्हणाली ती. आन् खालच्या वाडीतल्या आनपटासग पाट लावला तिन!"

आता आम्ही तिच्या शेतात पाऊल टाकले होतें. बापाने काम करता करता आमची चाहूल लागल्यामुळे सरळ उभा राहून आमच्याकडे बघितले आणि धावत धावत माझ्याजवळ येऊन माझ्या हातातून करडू काढून घेत तो म्हणाला,

"साहेबास्नी कामुन तरास दिलास?"

ती मुलगी भावरहित डोळयानी माझ्याकडे पाहात राहिली!

थोड्याच दिवसात लग्न होऊन कुणाजवळ तरी जाऊन राहणारी ती मुलगी, पैसा पैसा जमवून दुसर लग्न करण्याची उमेद बाळग-

(पृष्ठ १६ वर चालू)



## ' माझ्या मनींचा मोहन '

शीत सुगंधी पवन । वाहे दालनीं दालनीं ।
माझ्या मनींचा मोहन । आज येणार साजणी ॥
शत भावना धावली । दाही दिशांना लंघून ।
होती रोमांच्यांची फूलें । भरें गंधाने अस्मान ॥
मानसीचा कल्पतरू । आज भाराने लवला ।
स्मृति सुमांचा सुवास । कोना कोनांत भरला ॥

–इंदिरा कुळकर्णी

लाखांत एकादा, तसा माझा पति ।
अनुरक्त परी अती, भाग्य माझें ॥ १ ॥

काय तूं पूससी, होते का धूसफूस ।
मैत्रीण येते घूस, घरा कधीं ॥ २ ॥

कधीं रागावती, बोलती कधीं गोड ।
मैत्रीण अशी खोड, कंथा माझ्या ॥ ३ ॥

आधणाचें पाणी, त्यांत भात शिजवितें ।
रुसवे फुगवे, त्यांत सुख पिकवितें ॥ ४ ॥

आधणाचें पाणी, ओतीते विसावण ।
पतीच्या रागांत, मिसळतें प्रेमगुण ॥ ५ ॥

दूध वर येतां, पाणियानें खालीं जाई ।
कंथाचा ग राग माझा, हंसण्यानें नष्ट होई ॥ ६ ॥

कंथ रागवतां सखी, हळू हंसून पाहते ।
क्रोधी मुद्रा मोहविते, क्षणामाजीं ॥ ७ ॥

**—अपौरुषेय.**

## माणसा !

माणसा ! तूं गरुड जसा
धाव घेई मेघावरीं
नको होऊं सरड्यापरी
धाव ज्याची बांधावरीं

माणसा रे ! परिस जसा
लोहाचें तूं सोनें करी
मृगजळाच्या पाठीमागे
धावूं नको हरिणापरी

माणसा, तूं देव खरा
तूंच कृष्ण, जगजेठी
कशाला ती यात्रावारी
महाद्वारीं पायपीटी

माणसा रे, तुझ्या मनीं
कधी येईल अभाळ निळें
मंडूक तूं नको होऊं
विश्व ज्याचें क्षुद्र तळें

माणसा रे नको ताठा
गर्वाचें हो खाली घर
येतां मरण मिळेल
उरेल राख चिमुटभर

**—राम श्री. गोसावी**

# कविता

## आधार

जगण्याचें जरि त्राण न उरलें
मरण्याचीही नाही हिम्मत
अजून मागे खेचित आहे
जीवनांतली कवडी किंमत
हा कवडीचा चेक घेउनी

वणवण फिरतों तरी वटेना
अन्न झाकी वस्त्र उद्यांचें
चिकटुन बसलें तेंहि फिटेना

या कवडीच्या आधाराने
थाबविलाही आहे काळ
धरिलें आहे या खांबाने
कोसळणारें वर आभाळ

या आभाळीं उडते आहे
हिरवी हिरवी स्वप्नवावडी
वटली नाही म्हणून फुगली
आहे ब्रह्मांडाहून कवडी

--श्री

## वळीव

वळिवाची सावळीव
खर्ज तुडुंबे आकाशीं
चार थेंब गारबुंद
तप्त भिडले अंगाशी
उठे थरारून मन
लागे फुलाराया पंख
म्हणे विराट वादळा,
भिडूं आपल्या झेपेंत !
पडे होऊन बापुडें
थेंब भरवी वळीव
उले चैत्रपुष्प लाल
गर्द उरीं सावळीव !

—सरिता पदकी

रोज मी संताचिया दारीं शिळें उच्छिष्ट खाई !
'अमृतातें जिंकण्याला' ही नसे थोडी कमाई !
अंतरामाजीं तुक्याची वाजताहे एकतारी...
ज्ञानया सांगे लिहाया अन् चुका काढी जनाई !

—सुरेश भट



शब्द विनायक काळे.

चढण सरली. हुश्श करीत त्याने समोर पाहिलें. माळ दिसूं लागला--डोंगरांचे बाहू पसरून उजळत्या क्षितिजाला कवटाळूं लागला ! आतापर्यंत अडखळणारी–ठेचाळणारी पायवाट स्वैर पळूं लागली--माळरानावरून वाहणाऱ्या उषःकालीन झुळुकांशी स्पर्धा करूं लागली ! पळतां पळतां मध्येच मुरडून तिने त्याच्याकडे पाहिलें--तो धापा टाकीत तसाच उभा होता. त्याला चिडवून ती म्हणाली, "ये ना ! मी बघ किती दूर गेलें !"

तो चिडला. त्याला वाटलें, 'आपल्या पावलांचीं पांखरं बनतील तर काय बहार होईल ! या खटयाळ वाटेला स्पर्शहि न करतां--'

पण सुळक्यासारखी घाटी वेगाने चढल्यामुळे त्याला धाप लागली होती. रेशमी अंगरखा ओला होऊन अंगाला लिपटला होता. पायांतले नक्षीदार जोडे भिरकावून द्यावेसे वाटत होते. जड पिशवी धरधरून बोटें काचून गेलीं होतीं. हाताला रग लागली होती. पायांत गोळे आले होते...आणि त्याला वाटत होतें; पावलांचीं पाखरें बनावींत, पण तीं तर पाषाण बनलीं होतीं, खिळलीं होतीं. तीं उचलेनात, पुढे पडेनात.

त्या डोंगरधारेवरलें एक झाड मोठ्या मायाळूपणाने त्याच्याकडे पाहत उभें होतें. सळसळून आणि किलबिलून तें त्याला साद घालीत होतें !

तो नकळत तिकडे वळला. तिथे जातांच त्याचीं बोटें अभावितपणे सैल झालीं, आणि ती जड पिशवी त्यांनी सोडून दिली. जमिनीवर पडतांना ती एकदम खणखणली--किणकिणली !

तो दचकला. असें रेंगाळतां कामा नये. याची त्याला जाणीव झाली...

--पण त्या आधीच त्याचा देह झाडाच्या बुंध्याशी विसावला होता. बोटें अंगरख्याचे बंद सोडूं लागलीं होतीं. पाय मोकळे झाले होते. हायसें वाटून खांद्यावरल्या शेल्याने त्याने घाम टिपला. इतक्यांत एक खटयाळ झुळूक नाजुक शीळ घालीत नाचत नाचत तिथे आली. एक गिरकी घेऊन त्याच्या नेत्रांना तिने हळूच स्पर्श केला. मोठा सुखद वाटला तो त्याला. ती जादुगार झुळूक त्याच्या पापण्या हलकेच मिटवून केव्हा पळाली, तें त्याला कळलेंच नाहीं !

मात्र, त्याच्या मिटल्या डोळयांपुढे कुणीतरी नाचूं लागलें; नाचतां नाचतां गाऊं लागलें--किण्किण् ! किणकिण् ! ! तो अस्वस्थ झाला. दचकून त्याने डोळे उघडले. समोर दूरवर बसलेल्या डोंगररांगा आता स्पष्ट होऊं लागल्या होत्या. पूर्वेकडल्या उजळत्या क्षितिजाला आता लाली चढली होती. तिकडे पाहिल्यावर त्याला उगीचच वाटलें की कुणी शिल्पकार त्या प्रचंड पाषाणांत शिल्प कोरीत आहे आणि त्याच्या छिन्नी–घणांनी होणाऱ्या आघातामुळे ठिणग्यांचे फवारे तिथे उडत आहेत ! तिकडे पाहतां पाहतां तो अस्वस्थ झाला आणि वळून त्याने खाली पाहिलें. खाली दूरवर पसरलेली टुमदार राजनगरी त्याला मोठी मोहक वाटली. फुलांनी डवरून गेलेल्या उद्यानासारखी ! त्या उद्यानांतून त्याच्या नजरेचें फुलपाखरूं भिरभिरूं लागलें. उडतां उडतां त्या उद्यानाच्या मध्यभागीं असलेल्या एका मोठ्या फुलापाशी तें थबकलें, पण त्याला तिकडे बघवेना ! कोमेजून पडलेल्या फुलासारखा तो राजमहाल आता त्याला वाटूं लागला. त्याने पुन्हा पूर्वेकडे पाहिलें. तिथल्या शिल्पकाराचे छिन्नी–घण आता अगदी रंगांत आले होते. त्याला वाटलें, "आपण मात्र अजून..."

कपडे झटपट सावरून नि ती पिशवी पाठुंगळीला मारून तो झरझर चालूं लागला. उचलतांना ती पुन्हा किणकिणली. तो वेगाने चालत असल्यामुळे ती हेलकावत होती. तिच्यांतून "खण–कण" असे ध्वनि बाहेर पडत होते. त्यामुळें त्याला अधिकच गति मिळत होती. त्याचीं पावलें त्या पायवाटेवरल्या मातींत लगबग उमटत चाललीं होतीं. आता तीं खरोखरच पाखरें बनलीं होतीं. केव्हा एकदा तें चार–पांच कोसांवर असलेलें खोरें गाठतों, असें त्याला झालें होतें. आता पुष्कळ दिवस तिथल्या त्या झोपडींत राहायला मिळणार, म्हणून तो हरखला होता. एका क्षणांत वाट मागे टाकावी आणि त्या नंदनवनांत पोचावें, असें त्याला वाटत होतें. तो जिथून निघाला त्या राजनगरीला किंवा त्या खोऱ्याशेजारच्या खेडयाला या नंदनवनाची कल्पनाहि नव्हती, पण त्याला तें खोरें स्वप्नासारखें वाटे. आपल्या महान् कलेची जन्मभूमि वाटे !

तसें पाहिलें तर तें खरेंहि होतें. थोडया

दिवसांपूर्वीच राजदरबारांत भरलेल्यां कला-प्रदर्शनांतला त्याने केलेला नर्तिकेचा पुतळा खुद्द राजाच्या मनांत भरला होता त्याला प्रथम पारितोषिक देतांना त्याने भर दरबारांत जाहीर केलें होतें– " धोंडीराम शिल्पकार आजपासून राज्य–शिल्पकार बनला आहे " हें सारें केलें त्या शिळाभांडारानें–खोऱ्याने ! चालतां चालतां हा प्रसंग त्या धोंडीराम शिल्पकाराला आठवला आणि तो गहिवरला–एका दृष्टीने तो प्रसंग जसा आनंददायक होता तसाच दुःखदहि होता. कारण त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्याच्या शिल्प-शाळेंत अकस्मात एक राजदूत ठाकला. त्याने घाबऱ्याघुबऱ्या धोंडीरामाला सांगितलें, " महाराज एकाएकी अत्यवस्थ झाले आहेत. त्यांच्या छातींत एकदम कळा येऊं लागल्या आहेत. सारखं 'धोंडीराम धोंडीराम' असं घोकताहेत–आमात्यांनी तुम्हाला सांगितलं आहे– 'असाल तसे चला...'

छिन्नीघण तसेंच टाकून तो निघाला. मृत्युशय्येवरल्या बेशुद्ध दिसणाऱ्या राजापाशी जाऊन तो हलकेच म्हणाला, " मी धोंडीराम आलों आहें महाराज ! "

डोळे उघडून नि उत्तेजित होऊन राजाने विचारलें, " कोण ? "

" मी—शिल्पकार "

" धोंडीराम ?"

" जी ! "

राजा बोलूं लागला–धुंद डोळ्यांनी, घोगऱ्या स्वराने, " हें बघ– आम्ही–आता–चाललों... " धोंडीराम घाबरत, चाचरत म्हणाला, ' हें भलतंच... "

तें न ऐकतां राजा बोलतच होता. " आम्ही चाललों तरी–आमच्या इच्छा अजून...सारे उपभोग अजून भोगायचे आहेत .." मध्येच त्याच्या छातींत एकदम कळ आली. एक दासी त्याच्या छातीवर अंजन चोळूं लागली. त्याच्या खुणेनुसार दुसरीने त्याला एका चषकांत थोडें मद्य ओतून दिलें. तें घेतल्यावर तो पुन्हा धोंडीरामाला उद्देशून बोलूं लागला, " हा जनाना–त्या शिकारी–हीं पाखरें...फुलें... ऐश्वर्य–पाहा–हें सारें पाहा... " सारा राज-महाल दाखवायला निघाल्यासारखा तो बोलत होता. धोंडीराम निमूट ऐकत होता..." अजून आम्हाला फुलें हुंगायचीं...चुरायचीं आहेत... पाखरं टिपायचीं आहेत ! आमची ही अधुरी इच्छा...धोंडीराम, तुझ्या छिन्नींतून आम्ही...



पुन्हा जन्मूं...जगूं–फुलें हुंगूं...पाखरें टिपूं..." राजाचे ओठ हलतच होते, पण आता त्यांतून ध्वनि उमटेना, डोळे अजून मद्यासारखे लालट होते. पायाशी बसलेल्या एका यौवनसम्राज्ञी-वर ते रोखले गेले होते. शेवटी ते तशाच स्थितींत राहिले–ओठ विलग होऊन तसेच राहिले. राजाचा देह काष्ठवत् झाला–मोठ्या हंबरड्याने राजमहाल भरून गेला. जड अंतःकरणाने धोंडीराम शिल्पकार परतला. त्याच्या कानांत दिवंगत राजाचे ते अंतिम उद्गार पुनःपुन्हा घुमत होते– " ......तुझ्या छिन्नीं-तून आम्ही पुन्हा जन्मूं......जगूं––फुलें हुंगूं ......पाखरें टिपूं...... " शिल्पशाळेंत आल्यावर तिथल्या प्रत्येक लहानमोठ्या पाषाणांत त्याला महाराजांची मूर्ति दिसूं लागली––जनानखान्यांतील फुलें...हुंगणारी ...चुरगळणारी, चषकांतल्या फेसाळत्या मद्याचा आस्वाद घेणारी ! त्याला वाटलें,

महाराज किती भाग्यवान् ! प्रत्यक्ष भोगान लाजावें असे त्यानी उपभोगिलें ! घडीघडीला नवें फूल–नवा चषक––नवा सुवर्णक्षण ! अशा धुंद सम्राटाची स्मृति कायम राखणें आपल्या हातीं आहे केवळ आपली छिन्नीच त्याला समर्थ आहे ! राजाचे शेवटचे उद्‌गार पुन्हा त्याच्या कानात दुमदुमूं लागले.

आणि अचानक त्याला त्या खोऱ्याची आठवण झाली. तिथलं ती झोपडी दिसू लागली– खोऱ्यातल्या शिळाबरोबरच त्या झोपडीचा सहवासहि लाभणार म्हणून तो हरखला, थोड्याच दिवसांत राजाच्या एका तैलचित्राची गुडाळी आणि लहानमोठे छिन्नीघण एका पिशवीत भरून घेऊन भल्या पहाटेच त्याने राजनगरी सोडली आणि तो चालू लागला ..

चढण संपली माळ दिसू लागला आता पर्यंत अडखळत, ठेचाळत, जाणारी पायवाट त्या माळरानावरून वाहणाऱ्या उषःकालीन झुळकाशी स्पर्धा करीत स्वैर पळू लागली आणि थोडें विसावून तो चालू लागला होता...जितक्या वेगाने त्याची पावलें मातीत उमटत––होती त्यापेक्षा जास्त वेगाने हे सारें त्याला आठवत होते. पळणाऱ्या रथामागे धुळीचे लोट उठत जावे तसे झरझर पुढे जात असतांना त्याच्या मनात स्मृतीचे कल्लोळ उठत होतें ..आणि केव्हा एकदा त्या खोऱ्यात पोचतो असें झाले होते. एका क्षणात ती वाट मागे टाकावी आणि त्या स्वप्नभूमींत, नंदनवनात पोचावें असे त्याला वाटत होते ..

वाटेंत मध्येंच दिसणाऱ्या एका डेरेदार वृक्षाकडे पाहिल्यावर आपण तीन-चार कोस केव्हाच मागे टाकले, हे त्याने ताडलें. थोडा वेळ त्या वृक्षाच्या छायेत विसावून तो चालू लागला. पुन्हा मनातल्या विचारांशी स्पर्धा करीत त्याची पावले पळूं लागलीं. थोड्या वेळापूर्वी ते विचार राजनगरीकडे धावत होते. मात्र आता त्याच्या पावलाच्या जोडीनंच ते खोऱ्याच्या दिशेने धावू लागले–– त्याच्या मनांतली सारी अधीरता घेऊन– अस्वस्थता घेऊन !

आता ऊन तापूं लागले, पण त्याला कुठले ते जाणवायला ? त्याचे डोळे समोर दूरवर दिसणाऱ्या झाडीकडे लागले होते राजनगरीपासून सुरू होणारा माळ तिथे संपत होता. तो केव्हाच त्या झाडापाशी पोचला. माळावरून स्वैर पळणारी पायवाट आता उड्या मारीत, बागडत, खिदळत उतरू लागली– त्या खोऱ्याच्या दिशेने–धोंडीराम शिल्पकाराच्या स्वप्नभूमीच्या दिशेने ! थोडें खाली उतरल्यानंतर त्याला खालून वाहणाऱ्या झऱ्याची झुळझुळ ऐकू आली. त्याच्या मनातला उत्साह नि आनंद तसाच झुळझुळू लागला ! मध्येच पाखराची किलबिल त्याच्या कानी पडे. त्याच्या पाठुंगळीच्या पिशवीतले छिन्नीघण किणकिणून त्यांना प्रतिसाद देत ! हुरूप येऊन लपाछपी खेळणाऱ्या वाटेला हुडकीत तो उतरू लागे बरेच खाली उतरल्यानंतर पलीकडल्या झाडीतून त्याच्याकडे डोकावून पाहाणारी झोपडी त्याला दिसली वृद्ध वैदूमायच आपल्याकडे पाहत आहे असे वाटले ! तो मनाशी विचार करू लागला खाली गेल्यावर आधी वैदूमायकडे जावें का आधी झऱ्याकाठच्या शिळा–पाषाणांतून हिंडावें ? त्याचें त्यालाच या विचाराचें थोडें आश्चर्य वाटले. आपल्या नव्या शिल्पसंकल्पाइतकेंच वैदूमायचे महत्त्व आपल्याला कां वाटावे, तिची इतकी ओढ आपल्याला कां असावी, याचा तो विचार करू लागला.

*ज्या ज्या वेळी तो या खोऱ्याकडे येई, त्या* त्या वेळी वैदूमायच्या झोपडीतच राही. शिल्पकृति पुरी होईपर्यंत तो तिथेच असे. वृद्ध वैदूमाय त्याला काही कमी पडू देत नसे. परगावी राहणारा लेक बऱ्याच दिवसांनी आला, की आईच्या आनंदाला उधाण येतें ना ? धोंडीराम आला की वैदूमायला अगदी तसेच होऊन जाई. पुष्कळ दिवसांनी मातेला पाहून, तिच्या हातचे मायेचे घास खाऊन लाडक्या लेकाने पुन्हा लहान होऊन *बागडू खिदळू लागावे ना ?* धोंडीरामहि वैदूमायच्या सहवासात तसाच हरखून जाई तसे पाहिले तर लहानपणापासून तो पोरका होता. त्याला शिल्पकलेचा वारसा देऊन त्याचा बाप त्याच्या कुमार वयातच सोडून गेला होता. बापाच्या छिन्या नि घण हीच बापाविषयीची त्याची आठवण होती, आई त्याच्या शैशवातच त्याला पोरका करून गेली, पण त्याच्याजवळ जें होते ते काही थोडें नव्हते. *अशा स्थितीत एके दिवशी* वैदूमायशी त्याचा संबंध आला– त्या खोऱ्याच्या निमित्ताने तेव्हापासून खऱ्या अर्थाने त्याला वाढविले होतें वैदूमायनेच तो दिवस ! त्या शिळाभांडाराचा, त्याचा नि वैदूमायचा परस्पराशी दृढ परिचय करून देणारा तो दिवस–– त्या झोपडीकडे पाहत असताना त्याला अभावित आठवला होता आणि म्हणूनच वैदूमायला भेटून नंतर आपल्या शिल्पसंकल्पाकडे वळावे, असे त्याने ठरविले. तो पुन्हा झरझर उतरू लागला.

तो झऱ्याकाठी येऊन पोचला. झऱ्याच्या दोन्ही काठांवर लहानमोठे दगडगोटे आणि प्रचंड पाषाण इतस्ततः विखुरलेले होते. जलक्रीडेसाठी हत्तींचा कळप जमावा, तशा त्या भव्य शिळा वाटत होत्या! तिकडे जाण्याचा मोह त्याला अनावर झाला, पण झऱ्याचे पाणी तोंडावर शिंपडून तो झऱ्यापलीकडे जाऊन आधी वर गेला– वैदूमायच्या झोपडीच्या दिशेने ! झोपडीचें बांबूचें कवाड बाहेरून बंद होतें. वैदूपणाचा आपला नित्य व्यवसाय करण्यासाठी वैदूमाय शेजारच्या खेड्यांत गेली

---

( पृष्ठ ११ वरून ) ढग

णारा तिचा बाप, दरवर्षी पावसाळ्यात कणा कणानी वाहात जाणारी त्याची जमीन आणि तें काकडणारें कोकरू ! मी आळीपाळीने प्रत्येकाच्या चेहऱ्याकडे वेडा होऊन पाहात राहिलों आणि यातील प्रत्येक घटकाचें दुसऱ्याशी काय नातें असावे हेंच माझ्या ध्यानात येईनासें झालें. कुठल्या ओढीने, ओलाव्याने ते एकमेकांच्या सान्निध्यात राहिले आहेत. आणि एकमेकांपासून दूरहि होऊं पाहात आहेत हें समजून घेण्याचा प्रयत्न करतांनाच माझ्या मनाचा गोंधळ उडाला. मनांतील साऱ्या भावनांचा गुंता झाला.

काय बोलावे काय करावें काहीच सुचेनासें झालें आणि दिङ्‌मूढ होऊन मी सहज वर बघितलें. आभाळात मघाप्रमाणेच भला मोठा ढग ऐन माथ्यावर आला होता. जड होऊन लोंबकळत होता !

–आणि दूरवर घाट चढताना मोटारीचा आवाज होत आहे याचा कानात भास होत होता ! आणि सारें विस्कळित होऊन, तुटून गेलेले भावनांचे दुवे त्या आवाजाभोंवती जमून एकत्र येण्याचा प्रयत्न करीत होते !

● ● ●

असावी, हें त्याने ताडलें त्या खेड्यापासून थोडें दूर, अशा एकाकी स्थळीं ती एकटीच कां राहते आणि वैदूपणात कशी काय रमते, याचें त्याला नेहमीच कुतूहल वाटे. तिला त्याने तसें विचारलेंहि होते, पण अनेक वर्षांपूर्वी ती असहाय्य परिस्थितीत त्या खेड्यात आली. तिच्या उपायानी कुणाचा मस्तकशूळ, कुणाचा पोटशूळ हरत असे. कुणी अडलेली बाई तिच्या हातगुणाने सुखरूप सुटत असे, कुणाकुणाची भूतबाधा तिच्या मंत्रवलेल्या दोऱ्याने बरी होत असे आणि म्हणून तिच्या इच्छेनुसार गावकऱ्यानी तिला ही झोपडी अशी थोडी दूर बाधून दिली. एवढेंच त्याला समजलें होतें. तिचा परिचय झाल्यापासून सारे गांवकरी तिला ज्या नावाने संबोधीत त्या नावानेच तो तिला हाक मारी–'वैदूमाय!' त्याला ठाऊक होतें तें एवढेंच, पण ती शेजारच्या खेड्यांत गेली आहे, हें ताडायला तेवढें पुरेसे होतें.

म्हणून तिथून खाली येऊन तो पाषाणाच्या त्या समुदायातून हिंडू लागला. पाठुंगळीच्या पिशवीतले छिन्नी नि घण आता अगदी अधीर झाले होते–आतल्या आत नाचत होते. किणकिणत, खणखणत होते. त्याचे मन थोपवून धरीत होते–सागत होतें, "थाबा–जरा धीर धरा बावानो, आता काही अगदी घटकेचा प्रहर होत नाही!" तो शिळेशिळेवरून पाषाणापाषाणावरून प्रेमाने हात फिरवीत जाऊं लागला. त्याना कुरवाळू लागला. मध्येच तो एखाद्या पाषाणापाशी थाबे. छिन्नीवर घण मारून त्याचे एक–दोन कपरे उडवी. जरा विचार करी आणि पुढे जाई. फिरता फिरतां एका भव्य, काळ्या कुळकुळीत शिळेपाशी तो आला. तिच्या तुकतुकीत–गुळगुळीत कांतीच्या स्पर्शाने त्याच्या बोटाना गुदगुल्या झाल्या, जणू पेरागणिक डोळे फुटले. त्या शिळेत आपला संकल्प साकार झाल्याचा त्याला भास झाला. राजाची ती धुंद डोळ्याची, फूल हुंगणारी, चषकांतल्या मद्याचा आस्वाद घेणारी भव्य मूर्ति त्याच्या डोळ्यापुढे ठाकली. हातातल्या छिन्नी–घणानी त्या शिळेचे तीन–चार ठिकाणचे कपरे उडवून पाहिले आणि त्या भव्य पाषाणाला एकवार आपादमस्तक न्याहाळले. पिशवीतली राजाच्या तैलचित्राची गुडाळी सोडून तें चित्र नीट निरखलें. नंतर त्या शिळेकडे पाहत हवेंत हाताने आडव्या–उभ्या रेषा मारल्या, मापें घेतलीं–आपले स्वप्न सत्यसृष्टींत फुलण्याचा हाच तो सुवर्णक्षण, असे त्याला वाटलें आणि–त्या पिशवीतून लहान–मोठ्या छिन्न्या किणकिणत बाहेर पडल्या. घण खणखणत त्याना साद देत आले. धोंडीरामाच्या मनांत समाधान, उत्साह नि अधीरता याचे मोठे मोहक मिश्रण झालें–सथपणाने छिन्नी-घणाचे नर्तन सुरू झाले–तों तो पाषाण त्या तालावर गाऊ लागला–लयबद्ध, तालबद्ध–"किण्–किण्किण्–किण्! कण्–ठक्ठक्–किण्!!"

झाडे पानाचे कान करून तें संगीत ऐकू लागली. फुलाच्या अनिमिष नेत्रांनी वेली तें दृश्य पाहू लागल्या. पाखरे पख मिटून घेऊन किलबिल थांबवून धोंडीराम शिल्पकाराच्या छिन्नीचें ते कूजन श्रवण करू लागलीं. झऱ्याचें पाणी तुषारित झालें आणि छिन्नीच्या आघातांमुळे त्या शिळेतून उडणाऱ्या पाषाण–तुषाराच्या फवाऱ्याशी स्पर्धा करू लागलें! हळूहळू ते खोरे, तो आसमत छिन्नी–घण आणि पाषाण याच्या सगीताने भरला जाऊ लागला. त्या निनादाला सारें वातावरण प्रतिनिनाद देऊं लागलें. त्यामुळे धोंडीरामाची छिन्नी अधिकच उत्साहित होऊ लागली. अधिक जोमाने, अधिक स्फूर्तीने तिचें नर्तन–गायन घुमू लागले. तें खोरे तापविणारे ऊनहि ते सगीत ऐकून चांदण्यासारखे शीतल झाले.

* * *

मात्र खेड्याकडून त्या झोपडीकडे परतत असलेल्या दोन सुरकुतलेल्या पावलाना त्या उन्हाचे चटके बसत होते. काठी टेकून–टेकून एक कृश हात शिणला होता. दुसरा त्याच्या मनगटावर हेलकावणाऱ्या बटव्यासारखाच थरथरत होता. कांकणें मूक झाली होतीं. दोन वृद्ध डोळ्यांकडे केविलवाण्या नजरेने पाहत होती. धुवट पांढरे लुगडें अधिकच फिकें झाले होते. ती वृद्धा हळूहळू छायेसारखी पुढे सरकत होती. त्या खोऱ्याच्या दिशेने, झोपडीकडे. पण तिला कल्पनाहि नव्हती की खोऱ्यांत भरून राहिलेल्या त्या संगीताने तिचें मन नाचू लागणार आहे. निनादूं लागणार आहे, भारून जाणार आहे, थोड्यावेळाने त्या खोऱ्यापाशी येऊन ती पोचली आणि ते लयबद्ध संगीत तिच्या कानीं पडलें. 'किण्–किण्किण–किण्! किण्–ठक्ठक्–किण्!!' मकळत तिच्या हातांतली काठी खालच्या दगडावर तालात आपटूं लागली–नाचू लागली. थोडें पुढे सरकून ती झऱ्याजवळ आली–आणि त्या आवाजाच्या रोखाने डोळ्यावर हात आडवा धरून पाहू लागली. धोंडीराम आला आहे, हे तिच्या कानानी तिला केव्हाच सागितले होते. तिच्या अंधुक डोळ्यांनी आत त्याला दुजोरा दिला. पुढे जाऊन त्याला भेटावे असे तिला वाटलें. पण त्याच्या तंद्रीचा भंग होऊं नये म्हणून ती वर वळली, तिने झोपडीचें कवाड उघडलें आणि तिच्या मनाचें कवाडहि खुलें झालें. ती झोपडीत शिरली. धोंडीरामची "वैदूमाऽऽय" अशी प्रेमळ हाक तिच्या मोकळ्या झालेल्या मनात घुमू लागली. तिथल्या झुळझुळणाऱ्या आनंदाला साथ करू लागली.

मोठ्या प्रसन्न मन.स्थितीत तिने चूलीतली लाकडें झाडली. राखेंतलें शेणकूट बाहेर काढून ते फुंकलें नि जाळ केला. नतर जवळचें मशेरे उचलून चुलीवर ठेवले. मग कोपऱ्यातली घागर उचलून ती झऱ्याच्या दिशेने उतरू लागली.तिथे गेल्यावर झऱ्याच्या कोंडीतून घागर बुडवून तिने ती एका सपाट दगडावर ठेवली आणि बराच वेळ उभी राहिली. –धूसर दिसणाऱ्या धोंडीरामकडे कौतुकाने पाहत, छिन्नी-घणाचे सगीत ऐकत.

पण त्याला त्याचें भान नव्हते. ओबडधोबड पाषाणाला आकार देण्यांत तो गुग झाला होता. त्याच्यासमोर पाषाण त्यावेळीं उभा नव्हता–एका वैभवशाली राजाचा भव्य देह त्याच्यापुढे ठाकला होता–आपादमस्तक दागिन्यानी नटलेला, एका हातात फूल असलेला, दुसऱ्या हातात चषक असलेला, त्या चषकातील मद्याची धुंदी डोळ्यांनी पिणारा, करड्या मिशातून मादक स्मिताची लकेर उमटविणारा!

बरीच दुपार झाली होती. वैदूमायला राहवलें नाही. त्याने चार घास खाऊन मग कामाला लागावें, असें तिला वाटलें. त्याला तसें सांगण्याकरितां ती पुढे गेली–आणि तिने त्याला वात्सल्यपूर्ण हाक मारली, "बाळा धोंडीरामा!" त्याला काहीच ऐकू आलें नाही. त्याचे कान बधिर झाले होते–धुंद झाले होते. थोडें जवळ जाऊन तिने त्याला पुन्हा हाक मारली "धोंडीऽऽ" आता मात्र छिनी–घण थांबवून त्याने तिच्याकडे वळून पाहिलें नि तो उद्गारला "माऽऽय!" तिला

वात्सल्याचें भरतें आलें. ती हसत म्हणाली, " पुरे आता "

" मी येतोच. एवढा हा कोपरा झाला की आलोंच " असे म्हणत तो पुन्हा पाषाणाकडे वळू लागलेला पाहून तिने त्याचा हात धरला नि त्याला ओढीतच ती म्हणाली–" आता आधी वर चल. काही खा, विश्राती घे नि मग–" मुकाट्याने तो तिच्यामागून चालू लागला.

झऱ्याजवळ जाताच पाण्याने तोंड धुवून, त्याने एक ओंजळ भरली नि तो तें पाणी पिऊ लागणार इतक्यात वैदूमायचा करडा पण प्रेमळ आवाज त्याच्या कानी पडला– " अं ऽहुंऽ अनशापोटी पाणी पिऊ नये बाळ ! " ओंजळीतलें पाणी सोडून देऊन त्याने तिच्याकडे पाहिले. ती घागर कमरेवर घेण्याचा प्रयत्न करीत होती. तो धावत तिच्याजवळ गेला नि त्याने घागर आपल्या हाती घेतली– " तुझ्यापुढे इलाज नाही रे बाबा " असे म्हणत ती वर गेली. झोपडीत गेल्यावर एका वाटीत तिने ताकपीठ कालवले आणि धोंडीरामच्या पुढ्यात ती वाटी आणि पाण्याचें तांब्या–फुलपात्र ठेवून ती तांदूळ निवडू लागली. निवडता-निवडता त्याला म्हणाली,–" आता पाणी प्यायलस तरी चालेल–" त्याला मोठें, रुचकर वाटले तें ताकपीठ. तें खाऊन वर पाणी प्यायल्यावर त्याच्या पोटात थंडाई आली. ढेकर देत तो म्हणाला, " बाकी काही झाल तरी वैदूमायच तू "

" हे तुला आताच समजतय् होय ?"

" तस नव्हे, पण मघाशी हात धरलास त्याच वेळी माझी नाडीपरीक्षा केलीस म्हणून म्हटल "

त्याचें बोलणे न उमजून तिने हाताची प्रश्नार्थी खूण करून त्याला विचारले, " म्हणजे ?"

" म्हणजे माझ्या भुकेचं निदान कस अगदी अचूक केलस ! "

" वैद्य रोगाच निदान करतो, भुकेच नाही "

" मग कस ओळखलस ग ? "

" अरे बाबा, मी 'वैदू' असले तरी 'माय' म्हणतोस ना मला तू ? म्हणून ओळखल हो ! " .

तिचें हें चतुर पण वात्सल्याने ओसंडत असलेलें उत्तर ऐकून तो मनापासून हसू लागला. पुतळे बनविण्यापेक्षा नि पारितोषिके मिळविण्यापेक्षा वैदूमायच्या हातचें ताकपीठच जीवनभर खात राहावे, असे त्याला वाटले ! त्याचें त्या सपन्न खोऱ्याबद्दलचें आकर्षण वाढलें ते काही निव्वळ तिथल्या सुदर नि निर्माणक्षम शिळामुळे नव्हे. त्याच्या जोडीला वैदूमायचे वात्सल्यपूर्ण प्रोत्साहन त्याला तिथे लाभत गेलें म्हणून. तिथे वाहणारा केवळ झराच त्याला स्फूर्ति देई असे नव्हे, तर त्याच्यासारखाच वैदूमायच्या मायेचा झरा त्याच्यावर झुळझुळत जलसिंचन करी म्हणून. याची जाणीव होऊन तो अधिक कृतज्ञतेने तिच्याकडे पाहू लागला.

चुलीत फुकतांना तिला मध्येच खोकल्याची उबळ आली ती अनावर होऊन कासावीस होऊन ती खोकू लागली. तो उठला, तिच्या हातची फुकणी आपल्या हाती घेऊन त्याने तिला थोडें पाणी ओतून दिले आणि एवढेच म्हणाला, " माऽऽय, तुझ्यान होत नाही आता ही दगदग "

" काय करणार बाबा ? " असा असहाय्य उद्गार काढून ती जेवणाच्या तयारीला लागली. तो कसला तरी विचार करूं लागला. पान वाढून ती म्हणाली, " बस आता " तो मुकाट उठला, जेवता जेवता तो मध्येंच तिला म्हणाला, " मी एक सुचवू तुला, माय ? "

डोळ्यानीच तिने " काय ? " असे विचारले.

तो सागू लागला, " असं बघ– तू आता वृद्ध झालीस. तुला या वयात जवळचा असा मीच, नाही का ? तेव्हा– " तो जरा थांबला. तिच्या डोळ्यांत उत्सुकता तरळल्याचें पाहून पुन्हा बोलू लागला, " तेव्हा तू माझ्या शिल्पशाळेंतच का नाही येऊन राहात ? " ती एकदम म्हणाली, " म्हणजे त्या– " तिच वाक्य पुरें करीत तो म्हणाला– " राजनगरीत. "

ती चिडली. " त्या राजनगरीच नावसुद्धा काढू नकोस माझ्यापुढे " असें जोराजोराने म्हणत ती थरथरू लागली. तिचे डोळे धुमसू लागले आणि तिला उबळ आली. वातावरण एकदम गढूळ होऊन गेलें ! एकदम असे रागावण्यासारखें तिला आपण काय बोललों, हें त्याला कळेना.तो वरमून म्हणाला,"माऽऽय, तुला नाही बर वाटत तर राहू दे, मर्जी तुझी. पण तुझं हे एकाकी नि म्हातार जिणं पाहिल्यावर मला वाटल खरं. रागावलीस ?"

त्याच्या मनाला लागल्याचें पाहून तिने राग आवरला. शात होत तिने म्हटलें, " मी तुझ्यावर कशाला चिडेन ? या शेजारच्या गावांतले लोक नाही का सागत होते मला त्याच्यात येऊन राहायला ? पण मला हे खोर, अस थोडसं दूर आहे म्हणून तर आवडत. मला आपल इथच बर वाटतं म्हणून तर ही झोपडी मी थोडीशी दूर बाधून घेतली. इकडे तर एकाकी - इकडे तर हाकेच्या अतरावर ! "

वातावरण निवळू लागल्याचे पाहून त्यालाहि बरें वाटलें नि तो उरले जेवण जेवू लागला

विषय बदलून त्याला प्रसन्न करण्याकरिता ती म्हणाली, " बर मग आज काय योजून आला आहेस तू ! "

तो मनाशी म्हणू लागला, " राजनगरीचं नुसत नाव काढल्याबरोबर ही चिडली. मग मी तर खुद्द महाराजाचा पुतळा बनविण्याचा सकल्प करून आलो आहे सागाव का हिला ? का डाव दुरारच काही तरी ठोकून ? छे ! वैदूमायशी अस खोटं बोलण बर नव्हे–आणि आता महाराज तर दिवगत झाले आहेत. नाही तरी आज ना उद्या वैदूमायला ते समजल्याशिवाय राहायच नाही– "

मध्येच तिने विचारले, " इतका विचार कां करतोस ? इतक का गुपित आहे ! "

त्याचा निश्चय कायम झाला आणि तो सागू लागला " महाराज मृत्युशय्येवर असताना मला अचानक अमात्याच बोलावणं आल. मला जाता जाता सदिग्ध शब्दात आपली अपुरी राहिलेली इच्छा महाराजानी सागितली आपण गेलो तरी आपली स्मृति माझ्या छिन्नीने कायम ठेवावी ही त्याची इच्छा. मी तर नुकताच राजशिल्पकार झालो आहें. तेव्हा मी ठरविले..." कुठल्या तरी तंद्रीत तो बोलत होता.

का कोण जाणे, पण ते ऐकून वैदूमायच्या आधीच सुरकुतलेल्या कपाळावर आठ्या चढल्या ! ती मनाशी चरफडू लागली ' अस्सं- म्हणजे त्या दिवटच्या राजाचा पुतळा बनवायला निघाली आहे ही स्वारी. कशाला ? त्याच्या मागून गादीवर येणाऱ्याना त्याच्या प्रतापानी हुरूप यावा म्हणून ? त्याने पाजळलेल्या दिव्याच्या उजेडात सर्वांनी आपला मार्ग शोधावा म्हणून ? तिने चिडून धोंडीरामकडे पाहिलें. तो अजून स्वप्न पाहात असल्यासारखें बोलतच होता– जेवण थांबलें होतें नि

त्याचें डोके काही तरी पाहात होते. तो बडबडत होता, "दिवगत महाराजाचे ते शेवटचे शब्द अजून माझ्या कानात घुमताहेत– 'तुझ्या छिन्नीतून आम्ही जन्मू–फुले हुगू–पाखरें टिपू !"

हे ऐकून तर ती फारच रागावली नि आपला खालचा ओठ तिने चावला. त्याने तिच्याकडे पाहिलें आणि तो थोडा वरमला. हें पाहून तिनेहि आपला राग आवरला. निवळू लागलेल्या पाण्यात पुन्हा खडा पडू नये म्हणून कुठल्या तरी चिडीनें डोळ्यात येणारे पाणी आवरून ती हसली तो पुन्हा सागू लागला– "आता थोड्याच दिवसात मी हा पुतळा बनवीन. मग राजनगरीतल्या प्रमुख चौकात त्याची स्थापना होईल– त्याखाली माझे नाव असेल– "शिल्पकार धोंडीराम...!" आता आपण चिडलो तर त्याचें मन दुखावतें, हसून समति दर्शविली तर आपल्याला चीड येते, अशा पेचात वैदूमाय सापडली, पण त्याचें जेवण तसेच पडले आहे, हे पाहून त्याला बोलताना थाबविण्याची युक्ति तिला गवसली. ती जरा करड्या स्वरातच त्याला म्हणाली, "हें सगळं थोड्याच दिवसात होईल, हे खर, पण तुझ जेवण मात्र बऱ्याच दिवसात–"

तिच्या करारी आवाजाने तो भानावर आला. मुकाट जेवू लागला. जेवल्यानतर पटकुरावर थोडा वेळ पहुडला, पण वैदूमायला जेवण जाईना. कुठली तरी कटु स्मृति तिला एकसारखी आठवत होती. ती स्मृति इतक्या तीव्रतेने तिला जाणवत होती की तिला चीड असह्य झाल्यावाचून राहत नव्हती. पण लगेच आपल्या अबलत्वाची, असहाय्यतेची जाणीव होऊन तिच्या डोळ्यात टचकन् पाणी उभें राहिले. त्याहि स्थितीत फुटणारा बाध आवरून तिने ओठ मुडपला, पदराने डोळे पुसले. पूर्ववत् करारीपणा आणि मायाळूपणा याचें रम्य मिश्रण तिच्या चेहऱ्यावरल्या सुरकुत्यात झाले. पटकुऱ्यावर पडलेल्या, आपल्याच विचारात गढलेल्या आणि पेंगुळलेल्या धोंडीराम शिल्पकाराच्या, हें सारे मुळीच लक्षात आले नाही. थोडी विश्राती घेऊन तो पुन्हा आपल्या कामाला लागला. वातावरण पुन्हा छिन्नी–घणाच्या ध्वनीने निनादून जाऊं लागलें– "किण् किण्किण्–किण्ण्...किण् ठक्–ठक् –किण्ण् !"

* * *

अनेक अधार पाषाणातून सूर्याने सहस्र छिन्यानी कोरलेली अनेक दिव्यशिल्पें उमलली .विकसली .!

धोंडीराम शिल्पकाराच्या समोरच्या पाषाणाला हळूहळू घाट येत गेला. डौल येत गेला. एका मानवाकृतीत त्याचें रूपातर होऊं लागले. काही दिवसांनी तो पाषाण राजनगरीच्या सम्राटासारखा भासू लागला. प्रत्येक सकाळीं त्या पुतळ्याकडे पाहिल्यावर धोंडीरामाला मोठी कृतार्थता वाटे तो उत्साहित होई, अधीर होई ..

नित्याप्रमाणे तो आजहि प्रसन्न मनःस्थितीत उठला वैदूमायने दिलेले दूधपीठ खाऊन आपल्या शिल्पाकृतीच्या दिशेनें चालू लागला––उत्साहित मनाने, अधिऱ्या बोटाची चाळवाचाळव करीत !

पण झऱ्यापाशी आल्यावर आज त्याला त्याचें पाणी नेहमीसारखें चमकदार वाटले नाही. ते काळवडून गेलें होतें. त्याने वर पाहिले–सूर्यकिरणाच्या सहस्र छिन्याचा नाच आज बद झाला होता. त्याचे सगीत त्याला ऐकू येईना. आकाश ढगाळून गेले होतें. खोरें अजून उजळून गेले नव्हते. ते अधिकच गडद वाटत होतें...

धोंडीरामाची सारी–सारी प्रसन्नता कुठल्या कुठे पळून गेली. झऱ्याच्या पाण्याप्रमाणें त्याच्या मनातला उत्साहहि काळवडून गेला ––तो झुळझुळेना, तुषारित होईना !

पण जेव्हा तो पुतळ्याच्या दिशेने चालू लागला, तेव्हा त्याला वाटले, थोड्याच वेळात विरतील ही अभ्रें ! दूरून तो पुतळा पाहिल्यावर साक्षात् राजेसाहेबाची स्वारी आपल्यापुढे उभी आहे, असा त्याला भास झाला चषकातल्या फेसाळत्या मद्याच्या मादक गधाने धुद झालेले राजेसाहेब त्याला सांगत होते– "आमच्या अधुऱ्या इच्छा पुऱ्या केल्यास तू धन्य–धन्य !" त्यानी त्याच्या पाठीवरून हात फिरविल्यासारखे त्याला वाटले. त्याचे मन टवटवीत होऊ लागलें. पुतळ्यापाशी ठेवलेली छिन्नी व घण उचलण्यापूर्वी तो तें शिल्प जरा दूर राहूनच न्याहाळू लागला––

न्याहाळू लागला आणि एकदम दचकला. साशक झाला. त्याला वाटले, डोळे फसवीत तर नाहीत ना ? छे ! काही केल्या त्याचा विश्वास बसेना. डोळे रोखून तो पुढे सरकला. डोळे फाडून शिल्पाकडे पाहू लागला...हाय! तो पाहत होता ते सत्य होते भीषण भासले तरी सत्य होते––पुतळ्यावर ठिकठिकाणी ओरखडे निघालेले दिसत होते ! नाक-डोळ्याच्या जागचे एक–दोन कपरे उडालेले दिसत होते. तो थरथरूं लागला. क्रोध, आश्चर्य, भय याचें विचित्र मिश्रण त्याचा चेहरा व्यापून राहिले त्याहि स्थितीत तो विचार करू लागला–– 'कसे निघाले हे ओरखडे ? कोण आलें हे कर्म करायला...?'

तो या खोऱ्यात आला त्या दिवशीचा तो प्रसंग अगदी अभावित त्याला आठवला. वैदूमायला एक गोष्ट सुचवीत होतो आपण... "राजनगरी" असं नुसत म्हटल्याबरोबर ती चिडली होती. तिचे ते शब्द––"त्या राजनगरीच नावसुद्धा काढू नकोस माझ्यापुढे !"

त्याला वाटले, "वैदूमायने रात्रीच्या वेळी हे–" आपल्या विचाराची लाज वाटली त्याला. ज्या वैदूमायने त्याला पोटच्या पोरासारख वाढवले, ज्या वैदूमायच्या हातचे ताकपीठ खात जन्म काढावा, असे त्याला वाटले, त्या वैदूमायच्या हातून शिल्पभगाचा असा प्रयत्न होईल ? छे ! तो विचार गर्हणीय वाटला त्याला. "माझी भूक कशी अचूक ओळखलीस ?" असं त्यान विचारताच ती म्हणाली होती, "मी वैदू असले तरी "माय" म्हणतोस ना मला तू ?" तिचा त्यावेळचा तो प्रेमळ चेहरा त्याला दिसू लागला. त्याला वाटलें, आई कधी मुलाचा गळा दाबील का ? शिवाय वैदूमाय त्यावेळीं असाहि म्हणाली होती .. "मला हें खोर असं थोडस दूर आहे म्हणून तर आवडत..." म्हणजे तिला एकाकी जगण आवडत. तिला राजनगरीबद्दल चीड येत असली, घृणा वाटत असली म्हणून काही ह्या पुतळ्याचा मत्सर तिला वाटणे शक्य नाही.

पण त्याच्या मनातला गोंधळ अजूनहि शात होईना. गुता झालेले विचार उकलेनात. पुतळ्यावर ओरखडे ओढलेले होते, हें सत्य होते. तें मान्य करणे भाग होते. ते मानले तर असे का झाले याचा अदाज घेता येत नव्हता. मोठी विचित्र मनःस्थिति होऊन गेली त्याची. पुन्हा त्याला वाटले, आपला एखादा शिल्पकार प्रतिस्पर्धी तर हें करू धजला नाही ना ? आपण राजशिल्पकार झालो म्हणून आपले प्रतिस्पर्धी शिल्पकार चिडले असावेत. मत्सरग्रस्त झाले असावेत त्याच्यापैकी कुणी...

छे ! हाहि विचार त्याला अनुकूल उत्तराची वाट दाखवू शकत नव्हता. तो अस्वस्थ झाला. वैंदूमायला हे सारे सांगावे, असा विचार करून झोपडीकडे जाण्यासाठी वळला. पण त्याची पावले तिथेच थबकली. वैंदूमाय, नित्याप्रमाणे केव्हाच शेजारच्या खेडयांत गेली, हे ध्यानी येऊन तो असहाय झाल्यासारखा खाली बसला. आता मात्र त्याच्याने हें सहन होईना नकळत त्याच्या डोळयात आसवें तरारली !

कितीतरी वेळ तो असा वसला होता. हळूहळू शात होत होता. डोळे पुसून त्याने ह्या पुतळयाच्या वरच्या बाजूला पाहिले. गडद अंधारात एक प्रकाशशलाका दिसल्याचा त्याला भास झाला. त्याच्या मनातल्या गुता झालेल्या विचाराचे धागे नीट सुटू लागले उकलू लागले...

पुतळा ज्या पाषाणांत कोरला जात होता तो एका उच दरडीला लागून उभा होता दरडीच्या अगाबाहेर अनेक छोटे मोठे दगड डोकावत होते– त्यांच्याकडे पाहिल्यावर त्याला हायसे वाटलें. तो मनाशी म्हणू लागला–" उगाच डोक्यात राख घालून घेतली आपण. कदाचित् असहि झाल असेल– वरचा एखादा पाषाण दरडीच्या अंगापासून सुटला असेल. घसरत– घसरत खाली येताना आपल्या शिल्पकृतीच्या अंगाशी घासून गेला असेल......हा...असंच झाल असाव...... म्हणूनच असे ओरखडे निघाले..." झाले होते ते विपरीत असून देखील त्याला एक प्रकारचे समाधान वाटले.

मग झऱ्याजवळ जाऊन त्याने तोंडावर पाणी शिपडले आणि पुनश्च फुलल्या मनाने तो पुतळयापाशी आला. त्याने वर पाहिले– आकाशातली अभ्रें विरू लागली असावीत...! त्याला वाटले, गढूळ झालेले पाणी निवळू लागले आहे ! अजून हा पुतळा काही निकामी झाला नाही, हे ओरखडे सहज नाहीसे करता येतील.

***

खेड्याकडून परतत असलेल्या, ....काठी टेकीत पावलें टाकणाऱ्या वैंदूमायने डोळयावर हात आडवा धरून आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे किलकिल्या नजरेने आकाशाकडे पाहिले अभ्राचे ते छोटेछोटे पुजके पाहून तिला, वाटलें " सारे दूध नासून गेलें आहे. त्याच्या गुठळया होऊन गेल्या आहेत. ..!"

आज नेहमीसारखी तिची पावलें तिला साथ देतना. ती थरथरत होतीं. हातांतली काठी नित्याप्रमाणे एका लयीत जमिनीवर आपटेना. तिची लय, का कुणाला ठाऊक, तुटक भासत होती. तिची मुद्रा थोडीशी साशक, थोडीशी भयाकुल अशी झाली. चोर भीत भीत चालतो ना? तिचें चालणेंहि तसेच भासत होतें.

झऱ्याजवळ आल्यावर छिन्नी-घणाचे ध्वनि तिला ऐकू गेले-एक आश्चर्योद्‌गार तिच्या तोंडातून बाहेर पडला. जरा अधिक जवळ आल्यावर डोळयावर हात घेऊन किलकिल्या नजरेने तिने पुतळयाच्या दिशेकडे पाहिलें. आणि आपले आश्चर्य खरेच आहे, हे कळून ती अधिकच बावरली. ती तशीच तिकडे पाहत उभी राहिली. ..

उभी राहिली आणि अकस्मात् थरथरूं लागली–तिच्या डोळयात आग धुमसू लागली, विचित्र हातवारे होऊ लागले. त्या पुतळयाकडे जेव्हा जेव्हा ती पाही, त्या त्या वेळी तिला असेच होई. काय होई तें तिलाच नीट समजत नसे, पण आत आत कुठेतरी असख्य नागिणी उसळल्यासारखें वाटे. हातातली काठी जोराने दाबून धरून त्या नागिणी वारुळात कोंबण्याचा तिने प्रयत्न केला. हळूहळू ती झोपडीकडे गेली. कवाड उघडून दुपारच्या तयारीला लागली. नतर धोंडीरामला हाक मारण्यासाठी पुतळयापाशी आली आणि "धोंडी" असे म्हणून तिथेच थाबली–

हाक ऐकताच छिन्नी थाबवून त्याने वळून पाहिलें आणि वैंदूमायला पाहताच छिन्नी खाली ठेवून तो तिच्याबरोबर चालू लागला. चालता चालता तिला सागू लागला–" आज किती विचित्र अवस्था झाली माझी, माय! ..." आणि सारें-सारें त्याने तिला कथन केलें. ती मधूनच "ह–हं" करीत होती. सकाळपासून फिरफिरून आली आहे ती. श्रमली असेल फार आणि आपण मात्र... तिला आता काही सागू नये 'हेच इष्ट' असा विचार करून तो गप्प झाला. जेवणें झाल्यावर ती अगाचें मुटकुळें करून पटकुरावर पडली. तोहि जरा विसावून पुन्हा आपल्या छिन्नी–घण–पाषाणात रमून गेला.

***

सूर्याने दिन–शिल्प पुरे केलें आणि सहस्त्र करातल्या छिन्न्या खाली ठेवल्या. काळाने तिथे नवा पाषाण उभा करण्याचें आपलें नित्याचें काम आरंभलें.

धोंडीरामनेहि दिसेनासे होतां होतां काम बंद केले. छिन्नी घण पुतळयापाशी ठेवून तो झऱ्याकडे गेला. हातपाय धुवून झोपडीकडे वळला. वैंदूमाय चुलीत तोंड घालून बसली होती. आज तिचें काहीतरी बिनसलें हें त्याने ओळखलें. झोपडीच्या कोपऱ्यांत एका मातीच्या ओटयावर एका ताम्हनांत छोटी कृष्णमूर्ति होती. जवळच्याच मिणमिणत्या दिव्याचा प्रकाश तिच्यावर पडल्यामुळे ती चमचमत होती. वैंदूमाय उठली आणि तिने नीरांजन लावले. ते ओवाळताना तिचा हात नेहमीपेक्षा अधिक थरथरत आहे, हें त्याला जाणवलें. तो नेहमीच्या सवयीनें उठला आणि त्याने हात जोडले. वैंदूमाय त्याच्याकडे पाठ फिरवून आणि मूर्तिला सामोरी राहून प्रार्थना पुटपुटू लागली. आज जरा जास्त वेळ ती उभी राहिली. मध्येच तिच्या सुरकुतल्या गालावर खोल डोळयातून आसवे ठिबकली. ती पाठमोरी असल्यामुळे त्याला तें कळणें शक्य नव्हतें. मग ती दोघें मुकाट जेवलीं आणि झोपली.

त्याला चैन पडेना. आज त्याने पुतळा जवळ जवळ पूर्ण करीत आणला होता. ओरखडे नाहीसे करून पुन्हा पूर्ववत् त्याची झिलई कायम राखली होती आणि मोठया उत्साहानें नि हर्षभराने तो झोपडीत आला. आपला आनंद वैंदूमायला सागावा आणि त्याचा भार कमी करावा, असे त्याला राहून राहून वाटत होते पण ती आज श्रमली होती. कां कुणाला ठाऊक, त्याचे बोलणें ऐकून घेण्याच्या मन स्थितीत आज ती नव्हती.

आजचे वातावरण नित्यासारखें नाही. कुठेतरी, काहीतरी सलते आहे, खटकतें आहे, हे त्याने जाणलें. त्याचा ओसडणारा आनंद हळहळू ओसरू लागला–पडल्यापडल्या सकाळचा पुतळा नजरेसमोर उभा ठाकला–ओरखडे असलेला, विचित्र भासणारा, साऱ्या स्वप्नांचा लोळागोळा करणारा ! ...घाबरून त्याने वैंदूमायकडे पाहिलें. ती शात पडली असावी. तिचे श्वास त्याला ऐकू येत होते. आज फार दमली... झोपू दे बापडी, असा विचार करून तो कुशीवर वळला ..... झोपडीतला दिवा एकटाच मिणमिणू लागला.

झऱ्याच्या मद झुळझुळीच्या संगीताने लुब्ध होऊन झोपडीहि पेंगू लागली.

पण मधेच एका थरथरत्या हाताने दिवा उचलला .....कवाड कुरकुरले. काठीचा "ठण्ऽ" असा दोनदांच ध्वनि आला आणि पात्रोळा तरसरला. दिव्याचा प्रकाश झोपडीपासून दूर दूर गेला--झोपडीत काळोख झाला.

काही वेळाने झऱ्याच्या दिशेने मोठ्या आघाताचे ध्वनि येऊ लागले--ते शांत वातावरण छेदून जाऊ लागले, भेदून जाऊ लागले...

धोंडीरामची झोप चाळवली. कसलेतरी आवाज त्याला ऐकू आले. डोळे सताड उघडून त्याने पाहण्याचा प्रयत्न केला. त्या गिट्ट अंधारात त्याला काहीच दिसेना. वैंदूमायला उठवावें म्हणून त्याने तिला हाक मारली. "माऽऽय" ती जागी झाली नसेल म्हणून पुन्हा जरा मोठ्याने पण दबकतच हाक मारली, "माऽऽय" काहीच चळवळ दिसेना. तिच्या अंथरुणाच्या दिशेने हात सरकवून तिला उठवावे म्हणून त्यानें तिच्या अंगाला स्पर्श करण्याच्या उद्देशाने हात लांब केला. 'आंऽ' असा आश्चर्योद्‌गार अवचित त्याच्या तोंडून बाहेर पडला. तो ताडकन् उठला. पुन्हा एकदा मोठ्याने हाक मारली. पण काहीच उत्तर मिळाले नाही--दिवाहि नाही. वैंदूमाय नाही. 'गेली कुठं' असं बडबडत तो कवाडापाशी आला. तें उघडण्याचा प्रयत्न करू लागला, पण ते उघडेना. बाहेरून ते बंद असल्याचे त्याने ओळखले. आपल्याला न सांगतां, न सवरता माय अशी का गेली हे न कळल्यामुळे तो चिडला होता. एका लाथेसरशी त्याने झोपडीचे तें बांबूचे कवाड उघडलें आणि तो बाहेर पडला. घणाचे घाव आणि छिन्नीवर तो आपटतांना होणारा त्याचा ध्वनि त्याच्या कानानी सवयीने ओळखला. त्याने डोळे फाडून ध्वनीच्या दिशेने पाहिलें. झाडाच्या बाजूने प्रकाशाची एक पिवळसर तिरीप येत होती. नेहमीच्या सरावामुळे तशा काळोखांतहि तो झऱ्यापर्यंत पोचला. दूरवर दिव्याची ज्योत त्याला दिसली. पुतळ्यापाशीच दिसत होती ती. मधूनच ती दिसेनाशी होई एक छाया तिला आडवी येई. आता छिन्नीघणाचे "ठण् ठण् खण्. असे विचित्र निनाद त्याला स्पष्ट ऐकू येऊ लागले. कानात उकळतें तेल ओतल्यासारखें वाटले त्याला तें ऐकून ! अडखळत, ठेचाळत सम्राटाच्या पुतळ्याकडे तो धावू लागला. धावतां धावता साऱ्या गोष्टीचा उलगडा त्याला होऊ लागला--किती विपरीत ! पुतळ्यापासून काही अंतरावर गेल्यानंतर त्याला जरा उभें राहावेच लागले. दिसत होतें ते इतकी चीड आणणारें होतें की, क्षणभर मति कुंठित होऊन जात्री. तो पेटत्या डोळयानी तें भीषण दृश्य पाहू लागला--

पुतळ्याशेजारच्या दगडावर चढून वैंदूमाय घणावर घण हाणीत होती. तो पुतळा भंग करण्याचा तिचा निर्धार स्पष्ट दिसत होता. धोंडीरामाच्या कलेला छेद जात होता. ती त्या पाषाण सम्राटाकडे खुनशी नजरेने बघत घावामागून घाव त्यावर घालीत होती.

ती घावा मागून घाव घालीत होती आणि धोंडीरामांतला पत्थरफोड्या जागा होत होता. तो अधिकाधिक चवताळत होता. दात-ओठ खात होता. मुठी वळवत होता. अकस्मात् तो पुढे सरला. 'चांडाळणी, वैरिणी' असें ओरडून त्यानें तिच्या हातातला घण एका हिसक्यासरशी ओढून घेतला. ती घाबरली. कापू लागली आणि उभीच्याउभी खाली आली.

एका झटक्यात तिचा कपाळमोक्ष करावा असे वाटून त्याने घण उगारला. सारें बळ एकवटून ती मोठ्याने ओरडली--'थांब थांब !' त्या स्थितीतहि तिच्या आवाजाची धार त्याला जाणवली. ती पुन्हा म्हणाली, 'असा अविचार करू नकोस बाळा' त्याचा हात अभावित खाली आला, पण अजून तो धुमसतच होता. फूत्कार टाकीत होता. 'का असा दावा साधलास ?' एवढेच तो उच्चारू शकला.

उठून बसत ती म्हणाली, "शांत हो, शांत हो नि ऐकून घे..."

"कर्म ऐकून घेऊ वैरिणी ?"

"धोंडी बाळा, नको रे असं म्हणूस. तुझी माय अशी कां वागली ते सांगतें तुला !" तो काहीच बोलला नाही. पेटत्या हातानी घण आवळून धरत तो उभा राहिला. तसाच थरथरत. खोकतां खोकतां ती बोलू लागली--"तुला आठवत असेल. तू या पुतळ्याचा संकल्प मला सांगितलास तेव्हा मी चिडलें होते..." त्या क्रोधमग्न अवस्थेंतहि त्याचे कुतूहल जागृत झालें. तिने विचारलें,--"कां ते ठाऊक आहे तुला ?"

त्याच्या भडकत्या डोळयांत दिव्याच्या प्रकाशाची तिरीप शिरत होती. तिथे उत्सुकता तरळत असल्याचें तिच्या अधू दृष्टीलाहि दिसलें. ती सांगू लागली-- "मी त्या दिवशी कां चिडलें ते सांगते तुला--ऐक--"

"आता वृद्ध दिसणारी तुझी माय एकेकाळी तरुण स्त्री होती. आता पांढरे पडलेले तिचे केस एकेकाळीं काळेभोर होते सुरकुतलेली ही कातडी एकेकाळी मुलायम होती मऊ होती. तुझी माय एक सुंदर यौवना होती त्यावेळी. पण हें सौंदर्यच सैतानासारख माझ्या मानगुटीवर बसल धोंडी ! हा तुझा आवडता राजा--" पुतळ्याकडे तुच्छतेने बोट दाखवीत ती म्हणाली, "पराक्रम गाजविण्यापेक्षा नि कर्तव्य करण्यापेक्षा आपल्या राक्षसी भुकेचे चोजले पुरविण्यांतच त्याची हयात गेली, पण त्याच्या या भुकेला मला बळी जावं लागेल, याची मला कल्पना नव्हती." ती मध्येच थांबली. धोंडीरामच्या क्रोधाचें रूपांतर हळूहळू आश्चर्यांत नि कुतूहलात होऊ लागले. ती पुढे सांगू लागली, कांहीतरी भीषण अनुभविल्याप्रमाणे शहारून सांगूं लागली--

"एके दिवशी विहिरीवर पाणी भरत होतें मी--भरल्या हातानी, भरल्या गळ्यानं, भरल्या कपाळानं ! अकस्मात् घोड्याच्या टापासारखा आवाज ऐकू आला म्हणून तशीच थांबून पाहू लागलें. एक घोडस्वार उधळत येताना दिसला. क्षणार्धात तो माझ्यासमोर आला. या पुतळ्याचे डोळे जसे आहेत, तसेच त्याचे ते धुंद डोळे माझ्यावर रोखले गेले. मी घाबरलें. भरभर विहिरीतली कळशी वर ओढू लागलें. मोठ्याने ओरडण्याचें भानहि राहिलें नाही मला. "काय सुंदर पाखरू"... असे त्याचे विषारी शब्द माझ्या कानात पडले मात्र. कळशी तशीच सोडून मी पळण्यासाठी वळले, पण इतक्यात माझ्या कमरेभोवती एक दणकट हात आवळला गेला. मी मोठ्याने किंचाळणार इतक्यात तोंडांत कांहीतरी कोंबले गेलें. भयाने मिटलेल्या माझ्या डोळयांना काही दिसेनासें झालें...फक्त आचके बसू लागले. वारा झोंबू लागला नि घोड्याच्या टापा एकसारख्या ऐकू येऊं लागल्या..." सांगता सांगतां मध्येच तिला उबळ आली. धोंडीराम स्तंभित होऊन गेला होता तो पाहत होता तें विपरीत होतेंच, पण ऐकत होता तें त्यापेक्षाहि भयंकर होतें.

## नव्या लेखकांना चोरांची मदत !!!

सुप्रसिद्ध लेखक सॉमरसेट मॉम् यांनी आयुष्यभर लेखनाप्रमाणेच प्रसिद्ध चित्रकाराची चित्रें जमविण्याचा उद्योग केला. जगात नावाजलेल्या काही तैलचित्रांचा ज्यात समावेश होता असा त्याचा ३५९ चित्राचा सग्रह् साठ वर्षांच्या प्रचड उद्योगानतर त्याच्यापाशी जमलेला होता. या चित्राचा त्याने नुकताच लडनमध्ये लिलाव करून साठ वर्षांची कमाई फक्त नव्वद मिनिटात उधळून टाकली. अर्थात् यामुळे त्यांना ५,२३००० पौड येवढी गडगज रक्कम मिळाली. यापैकी पिकासोच्या एकाच चित्राची किंमत ८०,००० पौड आली. तें चित्र एका खाजगी सग्रहात समाविष्ट झाले आहे

आपण चित्रें लिलावात कां काढली याचा खुलासा मॉमने केला. तो म्हणतो, " गेल्या वर्षात प्रसिद्ध चित्राच्या ज्या चोऱ्या झाल्या त्यामुळे हा निर्णय मी घेतला."

यातील काही पैशाचा विनियोग मॉम् उदयोन्मुख लेखकाच्या मदतीसाठी करणार आहेत.

---

त्याच्या हातातला घण सुटला नि खणकन् खालच्या दगडावर पडला...

ती सागू लागली— " त्या रात्रीं, माझ्या जीवनातल्या त्या काळरात्रीं मी चुरगळली गेल्यें. सत्ता आणि वासना याच्या ज्वाळांनी होरपळून गेली तुझी माय त्या दिवशी." *सकाळी मला सोडण्यात आल*—दूर एकटी टाकून देण्यात आलं. वाटल असस जावं घरी पळत. सासुबाईच्या माडीत डोक खुपसून रड रड रडाव, पण खरं भयाण जिण इथून सुरू झाल माझ. मला घेणार होत कोण घरात ? तुझ्या या राजाला अशी सवय होती. वासनेचे चोजले पुरविण्याचा हा मार्ग सत्तेच्या बळावर तो आक्रमीत होता. कुणी काही बोलू शकत नव्हतं, पण एकदा अशा रीतीन भ्रष्टलेल्या स्त्रीला घरातहि कुणी घेत नव्हत. माझं मन जळफळू लागल— " याचा सूड घेतलाच पाहिजे अस आक्रोशू लागल, पण मी असहाय होतें, अबला होते. वाट दिसेल तिकडे मी पळत सुटले. एका शेतकऱ्याने पोटच्या मुलीप्रमाणे मला जवळ केली—

"या दुष्ट राजाच्या त्या पेटत्या वासनेची खूण माझ्याजवळ दुर्दैवाने शिल्लक राहिली होती. त्या मायाळू शेतकऱ्याने आणि त्याच्या बायकोनं सारं व्यवस्थित केल. माझ्या कुशीत जन्मलेल तें बालक जन्माला आल तसंच देवाघरीं गेल. तें असतं तर राजाच्या अधवासनेचा पुरावा मीं दाखविला असता, त्याचा सूड घेतला असता, पण आता तोहि मार्ग बद झाला, परतु याचा सूड कधीतरी घेतलाच पाहिजे. उगीच जिवाच वाईट करून घेण्यात आपलच माप खोटं टरेल असा निर्धार केला नि अशी वाढले *या कुलटया राजाच्या सूडाची सधि* बघत. तू त्या दिवशी तो सकल्प सागितलास आणि माझ्या मनातला सूड उफाळून वर आला. वाटल अशा कुलक्षणी राजाचा पुतळा करून काय उपयोग ? म्हणूनच मी त्या दिवशी चिडले, पण तरीहि माझ मन मी आवरत होते. तुझ्यासाठी. तुझ्या या पुतळ्यामुळे तुला मिळणाऱ्या कीर्तीसाठी, तुझ्या कलेसाठी, पण माझ्याने राहवले नाही. मनाला बाध घालतां आला नाही. धोंडी, चुकले का रे मी ? तू बनवलेला पुतळा फोडायला निघालें मी— *का ? का ते कळल तुला? चुकले का रे मी ?*"


मोठ्याने उसास सोडीत ती स्तब्ध बसून राहिली—केविलवाण्या नजरेने धोंडीरामकडे बघत.

तो दिङमूढ होऊन गेला होता आणि एकदा तिच्याकडे, एकदा सम्राटाच्या पुतळ्याकडे आळीपाळीने पाहत होता. पाखरें टिपणें, फुले हुगणें, हें त्याला पुरुषार्थाचें लक्षण वाटत होतें, पण वैदूमायच्या करुण भीषण कहाणीने त्याला सागितलें, " तें भाग्यं नव्हतें, तो पुरुषार्थ नव्हता, तो भोग होता. निव्वळ भोग होता. सत्तेच्या कठिण कवचाखाली दडलेली ती वळवळती नागीण होती. तो बेचैन झाला आणि सम्राटाच्या पुतळ्याकडे पाहू लागला—सम्राटाचे ते धुद डोळे त्याला आता विषारी वाटू लागले. त्याच्या हातातल्या चषकात विष भरलेले आहे असा त्याला भास झाला. त्याच्या अगावरल्या दागिन्यांतून, त्या पेल्यांतून अनेक किंकाळ्या त्याला ऐकू येऊ लागल्या. पुतळ्याच्या हातांतलें तें फूल—त्या ठिकाणी वैदूमाय असलेली त्याला दिसली. त्या पुतळ्याने तिला छातीशी आवळले इतक्यात त्या फुलाच्या साऱ्या साऱ्या पाकळ्या गळून पडल्या पुन्हा त्या दणकट, राकट हातात नवे फूल आले—ताजें नि टवटवीत ! राजाने तें हुगले-चुरले-कोळपटून जाऊन तेहि मातीला मिळालें. पुन्हा नवे फूल ! आता धोडीरामाला तिकडे बघवेना. त्याने डोळे गच्च मिटून घेतले. त्याच्या मनांत कुणीतरी किंचाळू लागलें " ही शिल्पकला आहे ? तो भ्रम आहे तुझा-पाहा, जरा डोळे उघडून पाहा—या खोट्या नि स्वतःला विकून घेणाऱ्या शिल्पकलेच हे विपरीत स्वरूप पाहा ! आता का भितोस ? आता का पळतोस ?"

ती भेदरलेला, बावरलेला दिसल्यावरून वैदूमाय उठली नि त्याच्या पाठीवरून हात फिरवीत तिने *त्याला खाली बसविले.*

धोडीराम घामाने डवरून जाऊन वैदुमायकडे *तुसता पाहत होता.*

तो एकदम लवला आणि तिचे पाय धरीत *तिला म्हणाला, " क्षमा कर मला माय !"* आणि झटक्यासरशी उठून खाली पडलेला घण् त्याने हातात घेतला. वैदूमाय भेदरून त्याच्याकडे पाहू लागली. त्याला रोखण्यासाठी तिने आपला थरथरता पंजा पुढे केला, पण त्याआधीच हातातला घण पुतळ्यावर आदळू लागला. घणामागून घण त्या पुतळ्यावर आदळू लागले. धोंडीरामचे हात आता शिल्पकाराचे उरले नव्हते. सम्राटाच्या पुतळ्यावर तो घाव हाणीत राहिला. जणू प्रत्यक्ष सम्राट त्याच्या समोर उभा होता. पाहता पाहता *पुतळा हादरला, भगला, ढासळला...!*





डॉ. अत्तरदे

# वेड्यांच्या सहवासांत काल कंठणारे साहित्यिक डॉ. अत्तरदे

प्रा. भाऊ माडवकर

साहित्यांत अमानुष वेगाने लिहीत गेलेला एक माणूस म्हणून डॉ. श्रीराम अत्तरदे यांची ओळख करून घ्यायला पाहिजे. क्रांतीची धार असलेली लेखणी चालविणारा हा साहित्यिक अज्ञात राहण्यासाठी त्याच्या दुर्दैवाचे भोगच कारण आहेत. डॉ. अत्तरदे यांच्या साहित्याला मराठी लोक पारखे राहिलेत, त्याला कारण अत्तरद्यांची ओळख देण्याला दुसरे लोक कमी पडत आहेत. गेल्या चार-पांच वर्षांत ते कोठे आहेत, ह्याची फारशी जाणीव आजूबाजूला आणि जवळच्या लोकांनाहि नाही.

**'छंदोमयी मऱ्हाटी'**

डॉ. अत्तरदे हे मूळचे खानदेशांतील नांदेड या गांवचे असून त्यांचें पूर्ण नांव श्रीराम हरी अत्तरदे असें आहे. त्यांची जन्मतारीख ३१ जानवारी १९१९ ही असून, त्यांचें शिक्षण मुंबई व नागपूर विद्यापीठांत झालें. ते मराठीचे एम्. ए. झाले व तदनंतर त्यांना अमरावतीच्या श्रीशिवाजी महाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली. तेथे ते अत्यंत लोकप्रिय झाले व विद्यार्थीप्रियहि ठरले. परंतु त्याबरोबर आपल्या कमालीच्या जहाल मतांमुळे त्यांना विरोध-कहि निर्माण होत गेले. असामान्यत्वाला सामान्यांकडून विरोध होत राहणें हा आजवरचा अनभव आहे. विदर्भ महाविद्यालयाच्या व्यास-पीठावरून व्याख्यान देतांना एकदा त्यांनी तथाकथित व अनुभवी जानपद लेखकांची हजेरी घेऊन त्यांच्या अवास्तव व स्वप्नाळू लेखनाचे वाभाडे काढले होते. अनुभव नसलेल्यांनी या क्षेत्रांत वावरून सर्वज्ञ-तेचा आव आणावा, याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केलें होतें. सहकाऱ्यांमध्यें ते ज्ञानामुळें प्रिय असले तरी कांही विघ्नसंतोषी लोकांना त्यांचें ज्ञान खपत नव्हतें, असें त्यांचे निकटवर्ती बोलतात. त्यामुळे त्यांना बराच त्रासहि सहन करावा लागत असे. त्यांच्या प्रबंधावर त्यांना पी. एच्. डी. ची पदवी मिळाली होती. डॉक्टरेटचा प्रबंध त्यांनी प्रचंड वेगाने लिहून काढला होता. मूलभूत अशा नव्या सिद्धान्तावर आधारलेला छंदशास्त्रावरील त्यांचा ग्रंथ "छंदोमयी मऱ्हाटी" हा प्रकाशनाच्या वाटेवर होता, पण त्या ग्रंथाचें हस्तलिखित कोठें आहे, तेंहि चौकशी करून कळत नाही. विद्यापीठांत तें हस्तलिखित असावें. त्या ग्रंथाच्या प्रकाशनाची व्यवस्था कोणीं केल्यास मराठीच्या छंदशास्त्र–विभागांत मोलाची भर पडेल.

**अत्तरदे वेडे झाले !**

हे डॉक्टर अत्तरदे १९५७ च्या दरम्यान एकाएकी वेडे झाले असें कानीं आलें ! त्यांच्या वेडाचें गूढ उकलतां उकलतां लोक त्यांना विसरत गेले. त्यांच्या विद्यार्थ्यांनाहि त्यांचा विसर पडला व त्यांचें साहित्यहि होतें की नव्हतें अशी गत झाली. त्यांच्या मुलांना अनाथ होऊन आश्रय शोधावा लागला व पत्नी कुठें कष्ट उपसते आहे त्याची जाणीव नाही !

डॉ. अत्तरदे प्रथम नागपूरला वेड्याच्या दवाखान्यांत होते असें समजतें. आता त्यांना पुण्याच्या वेड्याच्या इस्पितळांत दाखल केलें असल्याची माहिती आहे.

डॉ. अत्तरदे फारसे कुणाकडे जात नसत. ते घरचा बहुतेक सारा वेळ लेखनांत घालवीत असत. अभ्यास–वाचनासाठीहि त्यांनी राखीव वेळ दिला होता. कांहीतरी ठराविक मजकूर लिहिल्याशिवाय ते झोपत नसत. त्यामुळे त्यांच्या हातून अल्पावधींत बरीच निर्मिति झाली.

**'सावलीच्या उन्हांत !'**

डॉ. अत्तरदे यांची पहिली निर्मिति प्रकाशित झाली ती एक कांदबरी! "सावलीच्या उन्हांत" (१९४६) ही त्यांची कांदबरी उपेक्षितांच्या जवळ जाऊन टिपलेल्या सुखदुःखांचें वास्तव चित्रण म्हणून उल्लेख

नीय आहे. साम्यवादी विचारसरणी या कादबरींत दिसते खरी ! पण ती अत्तरदे याच्या समाजसेवी मनाची मूळ बैठकच आहे. पोट-तिडीक म्हणून लिहिलेल्या या कादबरीतील विचारामधून प्रचारकी-पणा शोधणे हास्यास्पदच ठरावयाचे ! या कादबरीत भिल्ल–वारली लोकाचें यथार्थ जीवनदर्शन असून प्रादेशिक शब्दाचा प्रच्छन्न वापर लेखकाने कुशलतेने केला आहे आदिवासी जनाना संघटित होण्या-साठी आव्हान देणारे अत्तरदे जळता जीव वाटावेत इतकी ही काद-बरी प्रखर आहे. या कादबरीतील " भाऊ " हे पात्र चागल्या प्रकारे चित्रित करण्यात आलें आहे, कारण ते अत्यत आत्मीयतेने रेखाटलें आहे या कादबरीचा शेवट समूचित आणि वेधक आहे.

डॉ. अत्तरदे याची त्यानंतर प्रकाशित झालेली बहुतेक सर्व पुस्तकें काव्याची आहेत व तीहि १९५४ ते १९५७ या अल्पकाळातील आहेत. ' उमदे कवि ' म्हणून श्री. वा. ना देशपाडे यानी त्यांची प्रशस्ति गायली आहे. डॉ पंजाबराव देशमुख यांनी अत्तरदे याच्या काव्याची ओळख दिली आहे. ते म्हणतात, " हे वाङमय साध्यासुध्या माणसाचें नाही. ग्रामीण जनतेच्या सुखदु खांशी एकरूप झालेल्या व जीवन जग-णाऱ्या प्रतिभावान् विचारवंताचे हे विचार आहेत. ग्रामीण शब्द व वाक्संकेत यांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करून बहुजनसमाजाची वाङमयीन शैली निर्माण करायचें कार्य प्रा. अत्तरदे यांच्यासारख्याना नि.सशय साध्य आहे. "

**' चितेच्या प्रकाशांत '**

डॉ. अत्तरदे यांचें " चितेच्या प्रकाशांत " (१९५४) हे दीर्घ प्रेमकाव्य चुणुकदार आहे. वत्सल प्रीतिमूर्तीचें हृदयंगम दर्शन या खंडकाव्यांत कवीने घडविलें आहे. ' प्रीतीची तऱ्हा का इतुकी हरते शुद्ध ?' असे विचारणाऱ्या कवीने भान हरपून प्रीतिक्षेत्रातील नाजुक सवेदनाचे सुखद, तरल व सूक्ष्म वर्णन साधले आहे–

मज तुझ्या उरातिल ऊब जरा मोजू दे।
दे गणू करातिल नाडीचे वा ठोके ॥

अत्तरद्यांच्या या प्रेमकाव्याचे स्वरूप केवळ प्रेमपूरित नसून त्याला सामाजिक सघर्षाची अति तीव्र अशी किनार आहे. अनुभवाची जोड मिळून हें काव्य प्रस्फुरित झाले असावे ! अध्यापनकार्यांत रमणाऱ्या नायकाने विद्यार्थिनीची प्रेयसी म्हणून अपेक्षा केलेली आहे. प्रेमावर घाला घालण्यासाठी सवकलेल्या सैतानांसबधी कवि म्हणतो–

बेइमान ज्याची प्रीति तोच हैवान।
भगितो दुज्याचें प्रेम तोहि सैतान ॥

कटु अनुभवाच्या चक्रात गुरफटलेल्या कवीने जणू स्वत.चेंच खड-तर जीवन नायकाच्या रूपाने या काव्यांत साकार केलेलें आढळतें.

मी लाख उन्हाळे सोसुन झालों श्रान्त।
वाहून हमाली झाली गात्रें क्लान्त।
मज हवे स्वत.चें छोटेंसें घरकूल।
अन् त्यांत राहावी राजा, राणी, मूल ॥

असा हा कवि " बुजबुजले जीवित पुरे लाळ घोटयांनी " हें पाहतो. वृत्ति ' मानव माझा बधू ' ही असली तरी " वेदनास अंत नाही " म्हणून " कुजक्या जगातील " ' हिंस्र रीतीं'नी त्याचें जीवनच काळवंडून जातें !

शेतकरी– जीवनाची सुदर चित्रें अत्तरद्यानी ओघांत रेखाटलीं आहेत. शेती ही कधी अलकृत होऊन कवितेंत येऊन मिरविते.

अनुभव ही वांगीं, देह लवंगी मिरच्या।
अन् सुखदुःखें ही कोथिंबिरिच्या काडचा

अत्तरद्यांच्या भाषेंत प्रौढ आणि भारवती शब्दरचनेबरोबरच कांहीच्या वाही, कावरलें कुत्रें, बेळ इत्यादि ग्रामीण शब्द चपखलपणें पेरलेले दिसतात. त्यामुळे काव्याला एक आगळाच जोश आल्याचा अनुभव येतो.

**' पार्बतीचं मोव्हतीर आणि इतर कविता '**

" पार्बतीचं मोव्हतीर " ह्या दीर्घकाव्यांतून अत्तरदे यांचें मानवता-वादी हृदय उफाळून उठलें आहे. त्याची आर्त वाणी ग्रामीण जीवना-नुभवाच्या मुशींतून प्रकटली, म्हणून ती अधिक यथार्थ उतरली ! " पार्बतीचं मोव्हतीर व इतर कविता " ( १९५४ ) या पुस्तकातील " इतर कविता " मनाला चटका लावणाऱ्या आहेत " तुज नरें क्रूसा-वर लटकविलें " ही येशूवरील कविता म्हणजे अत्तरदे याच्या आत्म्याची ओळखच !

**' मानिनी ' व ' मालटेकडीवरून '**

" मानिनी " ( १९५५ ) या दीर्घकाव्यात अत्तरद्यांची प्रखर मानवनिष्ठा स्पष्ट झाली आहे. ग्रामीण जीवनांतील सत्त्व निवडून त्यांनी तेथली बिघडलेली रीतिनीतीहि चव्हाटयावर मांडली आहे. जीवनमूल्याची नागवण त्यांनी तथाकथित शिक्षितासमोर उभी केली आहे. त्यांच्या सर्व काव्यापेक्षा " मानिनी " अधिक सन्मानपात्र आहे.

र. नं. डी/८ ] जय सहकार [ र. ता. २०-२-१९५९

# धुळें जिल्हा सहकारी

• दूध उत्पादक युनियन लि. •

युनियनचा फायदा घ्या :—

* रोज सकाळ-संध्याकाळ दूध मिळतें * स्वस्त दरांत व निर्भेळ दूध घरपोंच मिळतें * शुद्ध व साजूक तूप, लोणी व मलई मिळण्याची सोय * दूधाची टेस्टिंग मशिनने तपासणी करून तें सकस असल्याची खात्री करण्यांत येते * ग्राहकांनी हें दूध घेतल्याने शेतकऱ्यांना आर्थिक मदत केल्याचें श्रेय मिळतें. *

• योजनेस सढळ हाताने सहकार्य द्या •

— चेअरमन —
श्री. पीतांबर रामचंद्र पाटील.

अचाट बुद्धिचातुर्य आणि बेफाम भावना यांच्या सम्मीलनांतून अत्तरद्यांची प्रतिभा सैराट सुटली आहे. म्हणून ती अनावर वाटते. डॉ. ग. श्यं. देशपांडे यांनी "मानिनी" संबंधी म्हटलें आहे— "परिणामाची प्रखरता हा या कवितेचा एक महनीय विशेष आहे. ही साधी गोष्ट नाही. प्रज्ञावतालाच तें साधतें."

"मालटेकडीवरून" (१९५५) हेंहि दीर्घकाव्य डॉ. अत्तरदे यांच्या सर्व वैशिष्टयांचा स्पर्श रसिकमनाला केल्यावाचून राहत नाही.

## 'अत्तरवाणी'

डॉ. अत्तरदे यांच्या १०३ स्फुट कविता "अत्तरदाणी" (१९५४) या संग्रहांत असून त्यांमधून दलितांच्या आक्रंदनाचा यथार्थ मांड केलेला आढळतो. अत्तरद्यांच्या लेखणीचा उभार वैषम्याच्या ज्वलंत जाणीवेतून "रामराम" या कवितेंतून वाहत असतांना दिसतो—

गुतू नकोस जीवा। दाटू नकोस कंठा॥
थावू नकोस वेडया। येणार कोणि नाही॥
पाहूं नकोस मागे। कुणि रोखणार नाही॥
उरणार काय मागे? —राखुडि अर्ध शेर!

## 'अरणीचीं फुलें' आणि 'अत्तरगंगा'

"अरणीची फुले" अत्तरद्यांनी दरम्यान प्रसिद्ध केली. डॉ. श्रीराम अत्तरदे यानी "अत्तरगंगा" हें स्फुट कवितांचें पुस्तक छापायला दिलें व ते ३१ जानेवारी १९५७ रोजी छापूनहि झालें. त्यानंतर (अंदाज आहे–) अत्तरदे वेडे झाले व "अत्तरगंगे"च्या प्रती अर्धवट बाहेर आल्या किंवा कुठेतरी पडून राहिल्या वा पचल्या! "अत्तरगंगा" निघाल्याचेंहि अनेकांना माहीत नाही. त्राता गेल्यावर कवितांना रसिकां-समोर आणणार कोण? "अत्तरगंगें"त अत्तरदे अधिक जहालपणें प्रकटले. "अत्तरदे कविराज तुला रे खडतर देतो ग्वाही–दुनिया साधी नाही बाबा दुनिया साधी नाही." असे वस्तुनिष्ठ आत्मनिवेदन करणाऱ्या अत्तरद्यांनी यापूर्वीच्या कोणत्याच पुस्तकास प्रस्तावना लिहिली नव्हती. प्रचंड वेगानें लेखन व प्रकाशन करणाऱ्या अत्तरद्यांनी या पुस्तकाला मात्र आत्मनिवेदन जोडले आहे. तें त्यांचें वेडे ठरविण्या-पूर्वीचें बहुधा अखेरचें निवेदन असावें. या लेखवजा निवेदनात अत्तर-द्यांनी म्हटलें आहे— "साधारणपणे मासिकांत ज्यांच्या कविता प्रसिद्ध होतात तो कवि, असा समज अलीकडे रूढ झालेला आहे. त्यांतल्या त्यांत ठराविक विषयांवर ठराविक पद्धतीचीं "काव्यें" लिहिणारे व ठराविक नियतकालिकातच चमकणारे ते कवि, हें निरपवादपणें रूढ झालेलें दिसते." अत्तरदे यांचे हे विचार असून त्यावर निराळें भाष्य करण्याची गरज नाही.

## अत्तरद्यांची विचारधारा

अत्तरदे यांनी "अत्तरगंगे"च्या प्रस्तावनेंत जोडलेले विचार मोलाचे आहेत. त्याचें म्हणणें आहे— "पाश्चात्यांनी संस्कृतीची प्रगति जिथे आणून ठेवली, तिथून—होय तिथूनच पौर्वात्यांना सुरु-वात करावी लागणार आहे." अत्तरदे यानी मार्क्सचें सुदर विश्लेषण या प्रस्तावनेंत केले असून "विज्ञाननिष्ठ भौतिकविवेकी कर्तृत्वा-शिवाय मानवाला भवितव्य नाही" असा त्यानी इशारा दिला आहे. या विचारांचा परिपाक म्हणजेच "अत्तरगंगें"तील कवितांचा प्रपंच!


## 'चालढकल!'

अत्तरद्यांनी लिहिलेलें संगीत नाटक "चालढकल" हें १९५४ साली प्रसिद्ध झालें. ठिसूळ ससाराच्या चालढकलीचें हें नाटक आहे. त्यांत विनोद आहे, कारुण्य आहे, उपहास आहे आणि अद्‌भुतताहि आहे. सामाजिकतेतील विसगतीवर उडविलेले ताशेरे हा अत्तरद्यांचा विशेष आहे. "या इहलोकापलीकडं कुठतरी अधिक रम्य व उदात्त असा परलोक आहे व त्यांतल्या काल्पनिक सुखासाठी ऐहिक जीवि-ताची उपेक्षा करावी हें भोंदूच तत्त्वज्ञान आहे." "समाजनिरपेक्ष व्यक्ति ही कल्पनाच मुळी मानवतेला हानिकारक आहे." असले विचार मांडणारे अत्तरदे माफक, चपक, भपक अशीं पात्रें आणून समाजातील भंपकपणाचे दाखले हुबेहूब रीतीने पुढे मांडतांना या नाटकांत दिसतात.

## प्रसिद्धीसाठी तयार साहित्य

अत्तरदे यानी प्रसिद्धीसाठी तयार करून ठेवलेलें साहित्य बरेच होतें हे त्याच्या किंमतींसह छापलेल्या जाहिरातीवरून दिसतें. तें साहित्य कोणाजवळ आहे, तें कळलें नाही. "छदोमयी मऱ्हाटी" हा प्रबंध छापण्याची तयारी झाली होती "हरीचे लाल" व "वऱ्हाडी स्त्री गीतें" ह्यांची हस्तलिखितें तयार होतीं. "ही जमीन, हें अस्मान" हे कवितापुस्तक लवकरच प्रकाशित होणार होते. "द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद" हा त्यांचा एक गद्यग्रंथ आहे. "व्हिम्म ऑफ अँगनी" हा इंग्रजी कवितांचा संग्रह व "प्रॉब्लेम्स ऑफ मास एज्युकेशन" हीं दोन इंग्रजी पुस्तकेहि तयार होती. साहित्यप्रांतांतील ही जाहिरातींवरून अंदाजलेली त्याची कामगिरी! — त्याशिवाय आणखी असणे शक्य आहे. ह्या सपूर्ण साहित्याचे आलोडन करून अत्तरद्यांचें स्थान साहित्यात निर्णित झाले पाहिजे! नाहीतर त्यांच्या पोरक्या व वेडया जीवितप्रमाणेंच त्यांच्या पोरक्या साहित्याचीहि उपेक्षा व्हावयाची!

●●●



# अत्तरदे-साहित्य-शलाका

## पारणें

बालेस झोपवून गानीं ती नित्य मजकडे येते.
अन् भार उतरल्या वाणी संभाषण आमुचें घडतें.
शिण दिवसभराचा तेव्हा वितळतो भराभर सारा.
पतिपत्निस केवळ लाभे रात्रीच्या गर्भी निवारा.
बरिचशी रात्र ओसरली बंद तिची गुणगुण पडली;
मजजवळ न परि ती आली, मन्मनीं अपेक्षा चढली.
ढकलून दार खोलीचें कधि दबकत हळूच गेलों—
अन् बघतां खाटेपाशी स्थिर चित्रावाणी ठेलों—
कोणतें चित्र मज गमलें मी अथवा खाटेवरलें?
सुप्रहर्ष दाटुन अवघ्या विस्मयेंच मन्मन भरलें
संसारामधिल शिणाने आवली झोपुनी गेली,
अन् पितांपितां अंगाशी बालाहि दिसे निजलेली.
या मंगल दृश्यावरती ओवाळिन शत ब्रह्मांडें!
अनुरागा-वात्सल्याचें मज भरतें आलें गाढें
निमिषार्धी निवले डोळे ममतेने महिरुन गेलों
अति शितल शितल वरुनि बहु अमृतसेकिं नहालों
प्रिय माझ्या शिणल्या जीवा कां उठविन निद्रेमधुनी?
मम सफल प्रीतिची प्रतिमा कां हलविन डोळ्यापुढुनी?
खाटेच्या गातावरती उच्छ्वास रोधुनी बसलों—
पारणें शांत नजरेचें मी फेडित कुठवर गढलों

'अत्तरगंगा'

## द्या संन्याशाला सुळीं...

चोर सुवर्णा तुळी....द्या सन्याशाला सुळी;
समर्थनास्तव तत्त्व कोविदें उभीं अर्धवर्तुळीं!
रीत जगावेगळी!....सौजन्य लोळवा धुळीं;
खुशाल पाजा जनां उगाळुन 'लोकशाहि'ची मुळीं.
रयत खुळी बावळी...गर्दना गुंतवा गळीं;
गात पवाडे कर्तृत्वाचे नाचतील गोंधळी.
येतां कुणि वर्दळी,....लोळवा त्यास भूतळीं;
हवीं व्यवस्था, शांति, कायदा; निरुपाय तिथे मुळी.
जरा न व्हावी लुळी....ती नवाबजादी तळीं;
काटकुळ्यांची नष्ट करावी हरामजादी कुळी!
चोर बसे राउळीं,....द्या संन्याशाला सुळीं;
समर्थनास्तव तत्त्व कोविदें उभीं अर्धवर्तुळीं!
तप्त शिसें वर्दळी...ओकील बंदुकी नळी;
हमरस्त्यांवर हमगर्दीच्या भरुं द्या रुधिरें तळीं.
उंच तटीं कातळीं...कोंडून जगावेगळीं
खुशाल कुचला, करा चिपाडें; कान पिळी जो बळी!
दीप्ति परी आगळी...उजळेल धरामंडळीं,
करील पाणी तटां...गजांचें रेलचेल भूतळीं.
मुक्त जनें मोकळीं...सुप्रबुद्ध कोलाहलीं
हटाहट्टून हणतील तडाखे निर्घृण मर्मस्थळीं.
चोर सुवर्णा तुळीं,....द्या संन्याशाला सुळीं;
समर्थनास्तव तत्त्व कोविदें उभीं अर्धवर्तुळीं!

'अत्तरगंगा'

जरि सर्वदूर ये दारूबंदी, म्हणती गांधीभक्त;
तरि उकीरड्यामधि नदीकिनारीं पिकते मदिरा मस्त.
अन् सफेत डगलेवाले बनले अडते भट्टीवरले.
मग राजरोस हैदोस घालती उपरे उंटावरले.
अति सफाईनें कधि गळे कापती, कुणां भिकारी करती,
संसार उधळती सुखी घरांतील, घरें स्वतःचीं भरती,
कज्ज्यांत दलाली, माजवून दोस्तांत बखेडे मुदलीं.
मिरवतात पाइक सर्वांघरचे; कुरण गावकी बनली.
राहिले जात–पंचायतिमधले बनून तालेवार,
फैसला द्यावया अब्रुदार न्यायाचे ठेकेदार

'पार्बतीचं मोव्हतीर'
यांतून उद्धृत

डॉ. श्रीराम अत्तरदे येरवड्याच्या मानसोपचारगृहांत असावेत असा तर्क प्रा. भाऊ मांडवकर यानी आपल्या लेखांत व्यक्त केला आहे. ही गोष्ट खरी असेल तर या सरकारी रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांकडून या प्रतिभासपन्न कवीच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें कांही विशेष व्यवस्था होणें जरूर आहे. विशेषतः डॉक्टरमहाशयाना ग्रंथवाचनाची व लेखनाची हौस असेल तर ती पुरविली जाणे अगत्याचें वाटतें. यामुळें त्यांच्या प्रकृतीतहि आराम पडण्याची शक्यता आहे.

तसेंच त्यांचें अप्रकाशित वाङमय–विशेषतः त्यांचा डॉक्टरेटचा प्रबंध–– संपादित व मुद्रित करण्याच्या दृष्टीनेंहि नागपूर विद्यापीठाकडून व अत्तरदे याच्या चहाते मंडळीकडून प्रयत्न होणें आवश्यक आहे.

डॉक्टरांच्या कुटुंबियांची अवस्था जर समाधानकारक नसेल तर त्याहि बाबतींत महाराष्ट्र शासनाकडून कांही साहाय्य देण्याची व्यवस्था होणें निकडीचे आहे.

–: संपादक

" खलनायक ! हं खलनायक ! पोटांत कावळे कोकलूं लागले म्हणजे बोलाच्या भातानं व माणुसकीच्या मृगजळानं तृप्ति होत नसते. दात्यांनी माफ करावा मार्फत दिलेल्या नोटाची ही करामत आहे. हा पैसा मोठा वाईट. हाच खलनायक किंवा देवमाणूस बनवू शकतो. नाण्याच्या छनछनाटाची साथ घेऊन माणुसकी गिरक्या घेत पदनिक्षेप करूं लागली म्हणजे अब्रूचा सढळ हातानं विक्रा होऊं लागतो. शिकून नोकरी नाही, नोकरी नाही म्हणून पोटांत घालायला कदन्नाचा कडबा नाही, नोकरी नाही म्हणून चारभितीवरील छपराची सावली नाही, नोकरी नाही म्हणून बायको नाही व बायको नाही म्हणून संसार नाही, सुख नाही. इतरांचे रंगढंग बघतांना मनाला माणुसकीचे आवढे गिळायला लावणं किती जिवावरचं असत हें बेकार झाल्यावाचून कळायचं नाही. पदोपदीं न्यायावर अन्यायाची कुरघोडी चाललेली उघड्या डोळ्यांनी बघत असतां सात्त्विक संतापाच्या धगधगत्या आगीवर दुबळ्या अश्रूंचा पूर लोटायची पाळी येते. इकडं पाहा, अलीकडं बघा, पलीकडं बघा, सगळीकडं दिवसाढवळ्या संभावितपणानं रक्त शोषलं जात आहे, मुडदे पडत आहेत, घरादारावर निष्ठुर नांगर फिरवले जात आहेत, उघड्यावर आणि गल्ल्याकुच्यांत चार-दोन आण्यासाठी अब्रूचा सस्ता सौदा चालू आहे. हलालखोर नीतीची प्रवचन झोडतात आणि आठ महिने पापांच्या राशी उभ्या करणारे चातुर्मासात पोथ्यांची पारायण करतात.

नव्या धर्तीचे बंगले आले, इमले उठले, भूमिगत गटारं आली, अगदी सुधारणेचा कळस झाला. पण आत पाहावं, अंतरंगांत डोकावून बघावं, तर श्रेष्ठकनिष्ठपणाचे, जातीचे व धार्मिक पक्षपाताचे किडे वळवळत आहेत. माणुसकीचा आणि समतेचा घोष मुखानं मात्र चालवयाचा, गर्दन छाटताना दरकार मात्र कशाची बाळगायची नाही. मूठभर सत्ताधाऱ्यांच्या तिजोऱ्या फुगत आहेत, सुखात्र अजीर्ण त्यांचं वाढतच आहे आणि दुसरीकडं लाखो करोडो मत्ताहीन रस्तोरस्तीं, शेतोशेतीं, सर्वदूर अन्न अन्न करीत वणवण फिरत आहेत. सुखाचं अजीर्ण झालेल्यांना तापलेल्या वाळूत विव्हळत पडलेल्या असहाय आत्म्यांच क्रंदन काय कळणार ? श्रम करा, ज्ञानी व्हा, लोकोद्धार करा, म्हणून सारे कानीकपाळीं ओरडतात. योजनांचे व मंजूर केलेल्या कोटींच्या आकड्यांचे तक्ते नुसते पाहून घ्यावेत. श्रम करावयाची इच्छा असूनहि एक कुटका दृष्टिपथांत येत नाही. कुणी भपक कंपन्या काढून, कोणी कोडीं छापून, कुणी खिसे कापून तर कुणी संभावितपणें ढवळे डगले घालून दारूचा चोरटा व्यापार करून जिवाची धन करीत आहेत. सागा, या सर्व लफंग्यांच्या नृशंस कारवायांहून माझा खलनायक कोणत्या दृष्टीनं अधिक हीन आहे ? "

—संगीत "चालढकल" या डॉ. अत्तरदे यांच्या नाटकांतून

# मला दिसलेले लेखक

मी –

४

"टवाळा आवडे विनोद" असें सांगितलेलें आहे. विनोदाची ही फार मोठी बदनामी आहे. मराठी साहित्यांत विनोदाची अखंड परंपरा आजपर्यंत टिकून आहे या हवाल्यावर मराठी माणसासंबंधी अशा विधानामुळें गैरसमजूत होण्याचा संभव आहे. कोल्हटकर, गडकरी, अत्रे, पु. ल. देशपांडे यांनी मराठींत विनोदाची भागीरथी अखंड वाहाती ठेवली आहे.

वरील चार नांवांत आणखी एक नांव अवश्य घ्यावयास हवें आणि तें म्हणजे चि. वि. जोशी यांचें. कोल्हटकरी विनोदाची परंपरा "तुझें आहे तुजपाशीं" पर्यंत विनोदी लेखकांच्या उपयोगी पडली असें दिसून येतें. या परंपरेपासून चि. वि. जोशी निराळे वाटतात. विडंबनकाव्यांत "झेंडूचीं फुलें," नाटचछटाकारांत– "दिवाकरांच्या नाटचछटा" यांना ज्याप्रमाणें सच्चा अनुयायी पुढें लाभला नाही त्याचप्रमाणें चि. वि. जोशी यांच्या विनोदाला शिष्यवर मिळाला नाही. त्यामुळेंच चि. वि. जोशी यांच्याकडे टीकाकारांनी म्हणावे असें लक्ष पुरविलेलें दिसत नाही. कारण एखाद्या लेखकाची गुरुपरंपरा शोधून, त्याची जन्मपत्रिका तयार करण्याची टीकाकारांना विलक्षण हौस असते. ही त्यांची हौस जो पुरवीत नाही त्यांच्याकडे ते फारसें लक्ष देत नाहीत. जेव्हा असें मुद्दाम लक्ष देण्याचें ते हेतुतः ठरवतात तेव्हा पुष्कळ वेळां अचंबा करण्याची आपल्यावर पाळी येते, ही गोष्ट मात्र निराळी.

कोल्हटकर, गडकरी काय किंवा अत्रे, देशपांडे काय हे सर्व नाटककार म्हणून बोलबाला पावले. त्यांचा विनोद उघडचा नाटचगृहांत हशा–टाळयांच्या गजरांत मान्यता पावला, वाढला आणि पुलकित झाला. हजारोंनी माणसें जमा झालेलीं असलीं की, विनोदाचा डाव फारसा पेचदार करून चालत नाही. कुणीहि कसाहि उताणा पडला तरी हशा–टाळया ठेवलेल्या असतात. श्रोत्यांचें सरासरी वयच सात–आठ वर्षांवर घसरतें. अशा वेळीं वक्त्याने वा नाटककाराने या संधीचा किती लाभ उठवायचा एवढाच विचार करावयाचा असतो.

हशा-टाळयांचें हें टॉनिक चि. वि. जोशी यांना फारसें लाभलेलें नाही. त्यामुळे बालबुद्धीलाहि हसवतील अशा तऱ्हेचा 'विनोदी' माणूस अशी कीर्ति चि. वि. जोशी यांना लाभली नाही; आणि साहजिकच टीकाकारांनी त्यांना जमेस धरण्याचें टाळलें.

जोशी यांनी साधे प्रसंग, साधे शब्द आणि परिसरांत नित्य भेटणाऱ्या व्यक्ति हा मसाला वापरून आपला विनोद उभा केला, यशस्वी केला. वर वर गांवढळ वाटणारा माणूस कसा अर्क असतो, साध्यासुध्या गोष्टी लपविण्यासाठी मोठीं माणसें कशीं शब्दांची रस्सीखेच करतात, विवाहाचा व्यवहार कसा कुर्रेबाज व कावेबाज झाला आहे, या सगळया गोष्टी त्यांनी अचूक टिपल्या आणि त्यांतून "चिमणरावाचें चऱ्हाट", "वायफळाचा मळा", "आणखी चिमणराव," "ओसाडवाडीचे देव"—यासारखें सदा ताजें वाटणारें विनोदी वाङ्मय त्यांनी निर्माण केलें. अभिनिवेशांत आणि अवतारकार्य करण्याच्या पावित्र्यांत चिमणराव किंवा गुंड्याभाऊ वावरत नाहीत. म्हणूनच "साष्टांग नमस्कार" किंवा "तुझें आहे तुजपाशीं" यांतील विनोदापेक्षा चि. वि. चा विनोद वेगळया प्रकृतीचा वाटतो.

त्यांनी निर्माण केलेलें विनोदाचें रसायन त्यांच्या समकालीन किंवा नंतरच्या कुणाहि लेखकाला साधलें नाही.

जोशांचा विनोद हा ग्रांथिक आणि बौद्धिक असा आहे. ही तऱ्हा स्वस्थ समाजालाच मानवते. आपल्या समाजाची पुढे जसजशी भरभराट होईल तसतसा तो पुन्हा अधिक लोकप्रिय होईल.

जोशी यांच्या विनोदावर जेवढें लिहिलें जायला हवें होतें तेवढें त्यामुळेच लिहिलें गेलें नाही असें वाटतें. लोकप्रियता लाभल्यानंतर जेव्हा टीकाकार लाभायचे तेव्हा युद्धाचा नि फाळणीचा काळ आला. या काळांत भरभराटीस आलेलें विनोदी वाङ्मय साप्ताहिकी थाटाचें होतें. संथ विनोद वाचण्याचा लोकांचा मूड नव्हता. नंतर स्वातंत्र्य आलें. स्वातंत्र्याच्या पहिल्या उत्साहानंतर जी प्रतिक्रिया झाली, तींत नवकथेला जोर आला. नवकथेच्या वातावरणांत "विनोद" ही कल्पनाच विचित्र वाटावी यांत नवल नव्हतें. या काळांत जें विनोदी वाङ्मय निर्माण झालें तें व्यक्तिरेखांचें होतें. "सामाजिक आशय" ही गोष्ट हास्यास्पद झाली होती. जोशांच्या वाङ्मयाला अजूनहि पोषक स्थिति आली नव्हती.

जोशांचें वाङ्मय सामाजिक आशयाचेंच आहे असा अर्थ नव्हे. विनोदाच्या फटकाऱ्यांतून त्यांनी दिलेले मानसिक वारकावे हे नवकथेची आठवण देतील असे आहेत. व्यक्ति आणि सामाजिक आशय यांचा सुंदर मिलाफ

त्यांच्या विनोदांत आहे. जो नवकथेला न सापडल्याने ती लंगडी पडली. जोशी यांच्या विनोदाचें महत्त्व यापुढे वाढत जाणार हें जें मला वाटतें तें त्याचमुळें.

मध्यम वर्गीयांचें जोशांनी जें चित्रण केलं तितकं वास्तववादी चित्रण गंभीर कथा-कादंबऱ्यांतूनसुद्धा आपल्याला दिसणार नाही. त्यांच्या विनोदी कथांतील मध्यमवर्गीय पात्रें नेहमीच्या साध्या प्रसंगांतून जातात. त्यांच्या तोंडीं नेहमीचीच साधी भाषा असते. तीं विनोद करतात तो सुद्धा 'इथं हसायचं का ?' असं विचारावंसं वाटावं इतपतच असतो. पण सर्वसाधारण माणसाच्या नित्याच्या बोलण्या–वागण्यांतील विसंगति ते इतकी अचूक दाखवतात की, हसण्याशिवाय इलाजच चालत नाही.

जोशांच्या विनोदांतला हृद्य भाग इथंच आहे. समकालीन विनोदाहून जोशांचा विनोद इथं निराळा पडतो. प्रत्यक्ष जीवनांतूनच आल्यानं त्यांचा विनोदाचा थाट संपूर्ण भारतीय आहे. मिठाईवाल्याच्या दुकानीं गेल्यावर 'या माशा काय भाव दिल्या ?' हा मिस्किल प्रश्न अस्सल भारतीय नव्हे काय ? माशांनी झाकलेलं पेढयांचं ताट झट्दिशी आपल्या डोळयापुढें येत नाही काय ? तालिमबाज गुंड्याभाऊ आणि स्वयंपाकिणबाई हीं पात्रं भारताशिवाय कुठं आढळतील ? जोशांच्या विनोदांतील हा गुण इतर कुठल्याहि विनोदी लेखकांत आढळणार नाही. इंग्रजी न जाणणाऱ्या वाचकांना त्यांचा विनोद रिझवतो हें त्याचें एकच गमक पुरें आहे. त्यांच्या अस्सल भारतीय विनोदाची चव परकीय भाषेंतून अुपलब्ध करण्यास हरकत नाही.

जोशी कधी वैयक्तिक हल्ले चढवीत नाहीत. बौध्दिक भुकेसाठी दुसरें लग्न केलें या फडक्यांच्या दाव्याला गुंड्याभाऊंकडून जें उत्तर जोशांनी दिलें तें खेळकर व मार्मिक असेंच होतें. गुंड्याभाऊ कथेंतील प्राध्यापकाकडे जाऊन म्हणतात– "बौध्दिक भुकेसाठी दुसरें लग्न करतोस ना ? मग माझ्याशी लग्न कर "

संस्थानिकांवरचा जोशांचा विनोदहि ध्यानांत राहण्यासारखा आहे. संस्थानांचा कारभार त्यांनी अक्षरशः उघडा केला. स्वातंत्र्यानंतर भारतसरकारनें संस्थानें खालसा केलीं, पण त्या आधी कित्येक वर्षे जोशांच्या विनोदानें मराठी वाचकांच्या मनांतून संस्थानें



# चिं. वि. जोशी

खालसा झालीं होतीं. याचें श्रेय फक्त चिं. वि. जोशी यांचेंच आहे.

सहानुभूति हें जोशांच्या वाङ्मयाचें आणखी वैशिष्ट्य वाटतें. जणू ते सांगतात की, तुमची–आमची सर्वांचीच अशी फजिती होते. आपण सर्वच हसूं या. उत्तम ट्रॅजिडी असावी तसा जोशांचा विनोद आहे. उत्तम ट्रॅजिडी रंगभूमीवरून एकाच प्रेक्षकाकडे बोट करून ओरडत नाही–– "बघ ! ही तुझी शोकांतिका ! ––या तुझ्या चुका—भोग यांचं प्रायश्चित्त.–– " उलट प्रेक्षकांना तें सर्व माणसांचं दुःख वाटतं. तसंच जोशी जीं न्यूनें दाखवतात तीं वाचकाला सर्वांचींच वाटतात. एका पात्राला उभं करून त्याची टोपी उडवून ते लोकांना हसवत नाहीत. हसतां हसतां या चुका आपण सर्वच करतों हें कळून हसूं आणखी दरवळतें. जोशांचा विनोद त्यामुळंच एक गाढ सहानुभूतीचं वातावरण निर्माण करतो.

भोवतालच्या रुक्ष, कठोर, उखाळ्यापाखाळ्या काढणाऱ्या विनोदाचा थोडासासुद्धा वारा न लागतां हा असा एक निराळा हृदयंगम विनोद मराठींत मधेंच कसा निर्माण झाला याचं नवल वाटतं. कारण विनोदाची ही तऱ्हा आधी आढळत नाही तशी नंतरहि नाही. अशा विनोदाचें मूळ सामाजिक कारणांत सापडेल असें वाटत नाही. फारतर असें म्हणतां येईल की, वाचकांत उथळ आणि कठोर विनोद न आवडणारा असा जो वर्ग आहे त्याचें जोशांनी प्रतिनिधित्व केलें, पण या स्पष्टीकरणानें समाधान होत नाही.

जोशी यांच्या वृत्तींतच त्यांच्या विनोदाची

गंगोत्री शोधायला हवी. लोकांचीं दुःखं पाहून ज्याला अश्रू आवरत नाहीत अशा कणवेचा पुढारी एखादाच निर्माण होतो. तसा लेखकहि एखादाच होतो. जोशांना शिष्य झाले नाहीत याचेंहि कारण यांतच दिसेल. जोशांसारखा विनोद लिहिण्यास लागणारें निर्मत्सर, उदार, प्रेमळ मन अनुकरणानं लाभत नाही.

जोशांचें लिखाण अलीकडे उतरलें आहे हें खरें आहे. त्याचें कारण मला असें वाटतें की, आपल्या विनोदाची भीति त्यांच्या मनांत दडलेली असावी. त्यांच्या विनोदांतला पूर्वीचा दिलखुलासपणा हरपला आहे. "मी थोरव्यक्तींचा विनोदासाठी वापर केला, त्यामुळे माझा एकुलता एक मुलगा अकालीं जाण्याचें दुःख नशिबीं आलें" असा एक विचार जोशी यानी माडलेला आहे.

अशा भाबड्या विचारांचाहि जोशी यांच्या मनावर पगडा आहे. आपल्या कर्तृत्वाच्या मानानें फारच थोडें कौतुक आपल्या नशिबी आलें असाहि विचार त्यांच्यापाशी आढळतो. लोकप्रियता आणि मानमरातब भोगल्यावर जी उद्दामवृत्ति आणि साफल्याचें समाधान याची नशा चढावी लागते त्यापासूनहि जोशी वंचित झाले आहेत. या गोष्टीत बराचसा भाग संचिताचा असतो यांत शंका नाही.

आयुष्यभर त्यांनी जो प्राध्यापकाचा पेशा पत्करला तोहि त्यांच्या विनोदाला कांहीसा मारक ठरला असावा असें वाटतें. प्राध्यापकी वृत्तीत जी चिकित्सा हाडीमाशी खिळते त्याचें दिलखुलास हसण्याशी थोडें तरी वावडेंच नाही का ?

●●●

मी पाहिलेले लेखक या चालू लेखमालेसंबंधीं 'माणूस'च्या वाचकांत बरेंच कुतूहल निर्माण झालें आहे असे आमच्याकडे आलेल्या पत्रांवरून दिसतें. या लेखांच्या लेखकासंबंधी अनेकांनी विचारणा केली आहे. याबाबत आम्ही एवढेंच सांगू इच्छितों की, या लेखमालेचे लेखक मराठीतील एक नामवत, सामाजिक मान्यता पावलेले आहेत. योग्य वेळीं या 'मी' ची ओळख आम्ही वाचकाना करून देऊं.

संपादक.


र. नं. ६२२९ ] विना सहकार नहि उद्धार [ र. ता. १९-९-१९२८

शेतकऱ्यांना बी-बियाणें, खतें, पेण्ड, सल्फेट व कीडनाशक औषधें पुरविणें, शेतकऱ्यांच्या मालाची कसोशीने विक्री करून देणें, शेतीसाठी लागणारीं अवजारें, स्प्रे पंप्स भाड्याने देणें, शेतकऱ्याला नवें इंजिन, स्पेअर पार्ट्स व तेलें पुरविणें, याशिवाय शेतकऱ्यांना लोखंड व सीमेन्ट पुरविणारी 'ब' वर्गातील...

★ सहकारी खरेदी-विक्री सोसायटी लि. ★

• मु. पो. धुळें, जि. धुळें •

※ सभासद-संख्या १००० ※ अधिकृत शेअर भांडवल २,००००० ※ वसूल झालेलें शेअर भांडवल १,४७,९००
※ रिझर्व व इतर फंडस् २,८८,१५५ ※ इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल ३४,२६१
※ एकूण उलाढाल १,९२,१२०००

— मॅनेजर —
श्री. बी. एन्. भागवत,
बी. ए. बी. कॉम्.

— चेअरमन —
श्री. हंसराज माधवराव पाटील,
वकील

• संस्थेच्या मालकीची ऑईल मिल, जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी •

# एका जपानी प्राध्यापकाच्या दृष्टिकोनांतून मराठ्यांचा इतिहास

प्रभाकर दत्तात्रय दीक्षित

दिल्लीतील रायसीना होस्टेलमध्ये बरेच दिवस मी राहात होतों. माझ्या शेजारच्याच खोलीत सदरचा जपानी विद्यार्थी राहात असे. मी महाराष्ट्रीयन आहे हें कळताच तो माझ्याशी अधिकाधिक संबंध जोडू लागला. कशावरून तरी गप्पा सुरू झाल्या की, महाराष्ट्रांतील इतिहासप्रसिद्ध स्थळांची माहिती तो मला विचारायचा. मीहि –असेल विचारत झालं, –असा विचार मनाशी घालीत त्याला थोडीफार माहिती देत असे. एकदा त्यांनी मला रायगडबद्दल विचारलं. त्यावर मी त्याला हसत हसत म्हणालों, "नुसत्या स्थळांची माहिती काय उपयोग ? त्यापूर्वी जर तुम्ही मराठयांचा इतिहास वाचलात तर आमच्या तीर्थरूप महाराष्ट्राचं तुम्हाला खात्रीनं आकर्षण वाटेल."

त्यावर–तो इशिडा त्याच नांव–म्हणाला, "I only don't know Maratha history– but I have studied it thoroughly" त्यामुळं मला त्याच्याबद्दल जास्तच औत्सुक्य वाटलं. नंतर मला कळलं की इशिडा म्हणजे एखादा कॉलेज युवक नसून दिल्लीतल्याच संरक्षण मंत्रालयाच्या परभाषा विद्यालयांत (School of Foreign Languages) ते जपानी भाषेचे प्राध्यापक आहेत. आपली नोकरी सभाळून त्यांनी हिंदुस्थानचा इतिहास वाचावयास सुरुवात केली. तो इतिहास वाचता वाचता मराठ्याच्या इतिहासानें त्यांना मोहिनी घातली. अन् त्यातहि त्यांच्या आदराचं स्थान झाले ते छत्रपति शिवाजी. जपानी भाषेंत त्यानी मराठयांच्या इतिहासावर प्रबंधवजा कांही लेखहि लिहले आहेत.

ही सर्व माहिती कळतांच गप्पाष्टकांच्या रूपानं त्यांची एक मुलाखत घ्यावयाचं ठरविलं. अन् एक दिवस सहज मीं त्याना विचारलं, "हिंदुस्थानच्या इतिहासांत प्राचीन अमल, मोंगल अमल, इग्रजी राजवट वगैरे अनेक छोटे मोठे भाग असतांना मराठयांचाच इतिहास जास्त अभ्यासावा असं तुम्हाला कां वाटल ?"

त्यावर आपले किलकिले डोळे मिचकावीत प्रा. इशिडा म्हणाले, "प्रथम मोंगल अंमलच वाचायचं मीं ठरवलं होतं. बाबर, *अकबर, हुमायन करत औरगजेबापर्यंत मी आलों तरी मला त्यांत* काही रस वाटेना. खरंच तुम्हाला सांगतों, मोंगलांच्या इतिहासांत विशेष असं कांहीच आढळलं नाही मला. सत्तालोलुपता हाच मोंगली अंमलाचा स्थायी भाव होता. गादीसाठी बापाला कैदेंत टाकणारा, सख्या भावंडांचा खून करणारा, औरंगजेब वाचतांना मी थोडाफार *थबकलों अन्......"*

मूळ विषयाला हात घालायला ही संधि योग्य आहे हें पाहून मी मध्येच त्यांना म्हणालों, "मराठयाच्या इतिहासाचं आकर्षण वाटायला येवढंच कारण कांही पुरेस नाही."

त्यावर इशिडा हसत हसत म्हणाले, "मराठयांच्या इतिहासाचं आकर्षण वाटू लागतं तें नेमकं औरंगजेबापासूनच. त्याच्याच कारकीर्दीत शिवाजी, संभाजी, राजाराम ताराबाई एकामागून एक त्यागाचीं उज्ज्वल पर्वं सुरू होतात. अन् मग माणूस न कळत मराठयांच्या इतिहासाचा भोक्ता होऊं लागतो."

त्यावर मीं चटकन् त्यांना पुढचा प्रश्न टाकला, "मग तुमचं शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाविषयीं काय मत झालं ?"

ह्या प्रश्नाने ते एकदम गंभीर झाले. त्यांच्या अभ्यासू मनाचे बांध लगोलग फुटले. त्यांच्या भाषेंत एक प्रकारचा अभिनिवेश आला. ते झपाट्याने बोलू लागले. " त्या काळांतील इतिहासांत शिवाजीचें *स्थान केवळ महत्त्वपूर्णच नव्हतें तर खास वैशिष्टचपूर्ण होतें असें* सारेच इतिहासकार म्हणतात, त्यांच्या ह्या मताशी मी पूर्ण सहमत आहे."

ते पुढें म्हणाले, "मोंगलांशी टक्कर देऊन शिवाजीला केवळ स्वत:चें राज्य स्थापायचें होतें हें मत मला मान्य नाही. तसं असत तर *तोरणा किल्ला जिंकतांच राज्य स्थापन करून त्याला राजा म्हणून* मिरवतां आलं असतं, पण तस त्यानं केलं नाही. मुसलमानाच्या सर्व प्रकारच्या जाचातून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करणारा कोणीतरी नेता तेव्हा हवा होता. शिवाजीच्या रूपानं तो नेता तेव्हा महाराष्ट्रास मिळाला. त्यांनी मोंगली सत्तेशी टक्कर दिली ती एक प्रकारे महाराष्ट्राची स्वातंत्र्य–चळवळ शिगेला नेत नेत दिली. लोकाना शांतता व सुबत्ता हवी होती. ती शांतता व सुबत्ता त्यानं महाराष्ट्रांत

आणली अन् त्यानंतर केवळ लोकांच्या आग्रहावरून, आपल्या आयुष्याच्या अगदी अखेरी अखेरीस त्यानं राज्याभिषेक करून घेतला."

ते पुढे म्हणाले, "शिवाजीबद्दल बोलावं तेवढं थोडंच आहे. त्याची लष्करी व्यवस्था उत्तम होती. त्याच्याइतका मुत्सद्दी व प्रभावी लष्करी प्रशासक वरचेवर जन्माला येत नसतो. शिवाजीनें त्या काळांत जे अष्टप्रधान नेमले, त्यांना जहागिरीऐवजी तनखा देण्याची जी पद्धत सुरू केली, मुसलमान धर्मात गेलेल्या हिंदूला परत हिंदु धर्मांत घेऊन त्याचेशी सोयरीक करण्याची जी क्रांतिप्रवण विचारधारा त्यानें आचरणांत आणली त्याला इतरत्र तोड नाही. त्याची लोकप्रियताहि तशीच अजोड होती."

शिवाजीच्या लोकप्रियतेबद्दल ऐतिहासिक दाखला म्हणून शिवाजीने केलेल्या कोकणच्या स्वारीचा उल्लेख प्रा. इशिडा ह्यांनी केला. ते म्हणाले, "कांही इंग्रज इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणे शिवाजी जर लुटारू अगर चोर असता तर लोकांनी त्याचा जागोजाग उत्स्फूर्त सत्कार केला नसता. त्या उलट मोगल सेना आली की, लोक भडकून जात." हें सांगतांना इशिडा क्षणभर थांबले व चटकन् हिंदींत म्हणाले, "मोगल सेना आती है तो लोक भाग जाते थे."

त्यानंतर, शिवाजीचा अभ्यास प्रत्येकाने जरूर केला पाहिजे असें सांगून ते म्हणाले, "शिवाजीनंतर जबर छातीचा झुंजार म्हणून संभाजी आपल्या ध्यानांत राहतो."

त्यानंतर मराठ्यांच्या इतिहासांतील उल्लेखनीय व्यक्ति म्हणून राजाराम, पहिला बाजीराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस वगैरे अनेक व्यक्तींचा त्यांनी उल्लेख केला.

मध्येच मी त्यांना म्हणालों, "मि. इशिडा, मराठ्यांचा इतिहास तुम्हीं वाचला आहांत ह्यांत शंकाच नाही. भारताच्या मध्ययुगांत इतिहासांत अर्धा अधिक भाग आपल्या विजिगिषु उदयाने व्यापणारी मराठ्यांची ही सत्ता नंतर जी लोप पावली त्याचं तुमच्या मतें कोणतं कारण होतं? महाराष्ट्रधर्म लोप पावल्यामुळेच हें घडलें की त्यांची झुंजार वृत्तीच नष्ट झाली?" इशिडा म्हणाले, "Some people explain that Maharashtra Dharma was lost afterwards, but I have not kown any conclusion yet......No satisfactory answer yet revealed." महाराष्ट्रधर्म नाहीसा झाला किंवा कसें हें ठरविणें कठीणच आहे, पण आपल्या हाताखालच्या वीरांना उत्तेजन देण्याकरतां पगाराऐवजी जहागिरी देण्याचा सपाटा नंतरच्या मराठी राजवटींत, म्हणजे पेशवाईत सुरू झाला. घरच्या भांडणांची त्यांत भर पडली अन् त्याच सुमारास धूर्त इंग्रजांचें भारतांत बस्तान बसूं लागलें. आपल्या भांडणांत प्रतिपक्षाला नेस्तनाबूत करण्यासाठी मराठा सरदार व पेशव्यांनी इंग्रजांना जवळ केलें अन् तिथंच मराठ्यांचा ग्रंथ नेमका आटोपला.

"अर्थात हीं माझीं अनुमानें आहेत. ती योग्य की अयोग्य ह्याचाच विचार मी सध्या करतों आहें." असं इशिडा म्हणाले. तेवढ्यांत त्यांच्याकडे कुणीतरी आलें आणि मी बाहेर पडलों.

बाहेर पडतांना माझ्या मनांत हाच विचार आला की कुठले प्रा. मोरिआकी इशिडा! टोकिओ विद्यापीठाचे इतिहासविषय घेऊन झालेले ते एक सुविद्य पदवीधर त्यांचा व महाराष्ट्राचा तसा कांहींच लागाबांधा नाही, पण त्यांना मराठ्यांचा इतिहास वाचावासा वाटला अन् आम्ही मात्र केवळ इंग्लंडच्या इतिहासांतील गुलाबी युद्धं, वाटरलूची लढाई, क्लाईव्ह अन् कार्नवालिस ह्यांचे तपशील अजूनहि घोकत बसतों. शिवाजीचा मुलगा कोण तर शाहू, असं म्हणणारे कांही भारतीय आजहि मला इथे भेटतात. हें पाहिल्यावर तर आपल्या इतिहासविषयक आबाळीची चीडच येते. आपल्या उज्ज्वल भूतकाळाची ओळख पटल्याखेरीज कोणता तरी देश भविष्यकाळ घडवूं शकला आहे काय?




र. नं. ७७७३ ] जय सहकार [ र. ता. १६-६-१९३७

सहकारी प्रशिक्षण वर्ग भरविणें, संस्थेच्या व्यवस्थापक कमिटीचे सभासद व सर्वसाधारण सभासद यांचे वर्ग भरवून शिक्षणाचा प्रसार करण्यास झटणारें....

प. खानदेश जिल्हा
सहकारी बोर्ड लि.
धुळें

* जून महिन्यांत संस्था रौप्य महोत्सव साजरा करीत आहे * या प्रसंगीं सहकारी कार्यकर्त्यांचें शिबिर होणार आहे *

— सेक्रेटरी —
श्री. एन्. वाय्.
कुलकर्णी, C. T. I.

— चेअरमन —
श्री. पी. आर्. पाटील



# आंतर-भारती

## एक ओझरतें दर्शन

११ जून हा 'आंतरभारती-दिन' म्हणून महाराष्ट्रांत सर्वत्र साजरा होत असतो. या दिनानिमित्त पू. साने गुरुजींच्या या संस्थेची ही एक निराळी ओळख....

राजा मंगळवेढेकर

श्रावणाचा महिना. वर्षाऋतूचे रंगलेले ओले चिंब दिवस. धुवांधार पाऊस कोसळत असतो. वर्षेचें लावण्य पानांफुलांवर उलगडलेलें असतें. मातीच्या भिजलेल्या कुशींतून कोंभाचा हुंकार भरत असतो. नदी, नाले, ओहोळ, ओढे भरभरून दुथडी वाहत असतात. निसर्ग एका आगळ्याच उत्सवांत दंग असतो.

मग माणूस तर उत्सवप्रिय प्राणी. तो कसा अशावेळीं शांत, स्तब्ध बसणार ! श्रावणाचा अखेर दिवस नि प्रत्येक दिवस सण–समारंभांत नि व्रतवैकल्यांत गजबजून जातो.

श्रावणपौर्णिमेचा दिवस असतो. तामिलनाडमध्यें सुवासिनींची मोठी धांदल उडालेली असते. पूजासाहित्य घेऊन त्या जिथे समुद्र असेल तिथे समुद्राच्या कांठीं नाहीतर नदी-ओढ्याच्या कांठीं एकत्र जमतात. सागराला पौर्णिमेची भरती आलेली असते. नदी-नाले नव्या पाण्याने तृप्त झालेले असतात. तामिळ सुवासिनी नव्या पाण्याची पूजा करतात. नमस्कार करतात, आणि स्वतःच्या गळ्यांतलें मंगळसूत्र तोडून पाण्याला अर्पण करतात.

महाराष्ट्रांतल्या भगिनीने जर हा विधि पहिला, तर तिच्या काळजांत चर्रऽ झाल्याशिवाय राहणार नाही, कारण चुकून जरी मंगळसूत्र ओघळलें तरी तें ओवून गळ्यांत घातल्याशिवाय ती तोंडांत पाणी नाही घालायची. इतकी तिची मंगळसूत्राच्या पावित्र्याविषयींची भावना ! मग तामिळ

सुहासिनींची ही रीत तिला विपरीत वाटल्याशिवाय कशी राहील ?

पण प्रथमदर्शनीं खटकणाऱ्या या रूढीपाठीमागची भावना कळल्यावर मात्र त्या विषयी आदरच वाटूं लागेल, कारण तामिळ सुहासिनी स्वतःचें मंगळसूत्र तोडून केवळ पाण्यांत अर्पण करतात असें नव्हे, तर त्या पाण्याला प्रार्थना करीत असतात.

" हे सागरा, नदी, निर्झरा ! श्रावणाच्या या— पौर्णिमेला जसें तुझें पाणी वर्धिष्णु झालें आहे, तसें माझें सौभाग्यहि तुझ्या कृपेनें वाढो ! उदंड होवो !"

आणि अशी कामना प्रकट करून त्या नवें मंगळसूत्र धारण करतात.

मंगळसूत्रदानाच्या विधिप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि एक विधि कांही जमातींत प्रचलित आहे आणि तो म्हणजे श्रावणीचा. श्रावणीच्या दिवशीं महाराष्ट्रांत जानवें बदलण्याचा विधि अशाच प्रकारचा नाही काय ?

भारतीय संस्कृति अशी भिन्न भिन्न छटांनी, विविध अंगांनी प्रांतोप्रांतींच्या उत्सवांतून, सणांतून, समारंभांतून ओतप्रोत भरलेली आहे. भारतासारखा खंडप्राय देश, चौदावर प्रमुख भाषा आणि त्यांच्या उपभाषा किंवा बोली किती तरी ! या सर्व भाषांतून समृद्ध साहित्य, संगीत, कला आपापल्या वैशिष्ट्यांनी विलसत आहेत. प्रत्येकाची ठेवण, जडण-घडण आपलें वैशिष्ट्य दाखविणारी. कला कौशल्यांतली विविधता मोठी चित्तवेधक ! पण त्यामागील भारतीय मन एक साधी रांगोळीची पद्धत घ्या. ती खास भारतीय पद्धत आहे. घरापुढें अंगणांत रांगोळी काढून तें सुशोभित करणें हा प्रकार सर्व प्रांतांत आहे, पण त्याची तऱ्हा मात्र वेगवेगळी आहे एवढेंच.

**मुग्गु :** तेलंगणांत रांगोळीनें अंगण सजविण्याचें वेड फार. अंगणाप्रमाणेंच घराचा उंबराहि हळद-कुंकवाच्या पट्ट्यानें सजवला जातो. तेलंगणांत रांगोळीला म्हणतात मुग्गु. महाराष्ट्रांत रांगोळी काढतांना ठिपके काढतात आणि त्याच्या आधारानें रेषा ओढून आकृति पूर्ण करतात; पण मुग्गुमध्यें ठिपके मध्यें राहतात आणि सभोवतीनें एकच रेषा वळणें घेत घेत जाते. रेषांची प्रवृत्ति गोलाकार असते. आणि एकूण आकृति म्हणजे गुंतागुंतीचा चक्रव्यूहच वाटावा अशी दिसते.

तामिळनाडमध्यें रांगोळीला **कोळम** म्हणतात. कोळम आणि मुग्गु किंवा कन्नडची रांगोळी यांत तसा विशेष फरक नाही. दिसायला त्या आकृत्या थोड्याफार फरकानें एकसारख्याच दिसतात. तीच गोलाकार रेषांची प्रवृत्ति, तीच ठिपक्यांच्या भोवती वळणें घेत जाणारी एकच एक अखंड रेषा.


मात्र दक्षिणेंत स्त्रिया जी रांगोळी काढतात. ती कांही आपल्याकडल्यासारखी शिरगोळ्याच्या पिठाची नसते. तर ती असते तांदळाच्या पिठीची. तांदुळाचाच प्रदेश असल्यामुळें रांगोळीसाठीहि ते वापरले असावेत. तांदुळ भिजवून वाटायचे आणि त्या पातळ सफेतींत चिंधी बुडवून रेषा काढायची. दक्षिणेंत देवापुढे सात वारीं सात तऱ्हेच्या रांगोळ्या काढण्याची प्रथा आहे. संक्रांतीच्या वेळेला तर आंध्र महिला आपापल्या घरापुढे जी रांगोळी काढतात तिचीच एक रेषा पुढच्या घरापुढील रांगोळीला नेऊन भिडवतात. एखादेवेळीं ही रेषा दोनशे फूटदेखील लांब असते आणि अशा प्रकारे सर्व आळीभर एकच एक अखंड रांगोळी काढली जाते.

**मंडना :** राजस्थानांतील मंडना म्हणजे रंगांचें प्रदर्शनच. निसर्गानेंच येथे रंग कमी दिले आहेत. सर्वत्र भकास, ओसाड वाळवंट. मग माणसांनी आपली रंगांची भूक आपले कपडे, भांडीं, घरें, रांगोळ्या इत्यादींला भडक रंग देऊन भागवलेली दिसते. भडक रंग हेंच मंडनाचें एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणतां येईल. मंडना काढतांना अगोदर व नंतर ठिपके काढले जात नाहींत. ठसठशीत, जाड पण रंगीबिरंगी रेषांनी मंडना सजते. रेषाहि जास्त असतात. मोकळा भाग आकृतींत क्वचित सोडला जातो. निरनिराळ्या रंगांची पूड कालवून राजस्थानी महिला बोटांच्या टोकांनीच मंडना काढीत असतात. रंगाचाच वापर असल्यामुळें केवळ स्वच्छ सारवलेलें पांढरें अंगणच मंडनानें सुशोभित होतें असें नव्हे तर, घराच्या भिंती, छत, झोपडेंहि मंडनानें खुलून जातें.

मंडनामध्यें निरनिराळ्या आकृत्या असतात. चंद्रसूर्य आढळतात, पण मोर हा विशेषत्वानें दृष्टीस पडतो.

**साथिया**—ही आहे गुजरातची रांगोळी. मंडनाचें रंगवैचित्र्य आणि महाराष्ट्राचे ठिपके-कोनयुक्त रेषा यांचा प्रभाव साथियावर झालेला दिसतो. साथिया काढतांना गुजराती महिला चुनखडी, चुना, किंवा खडू कुटून त्याची पातळ सफेती बनवतात आणि कापसाच्या वातीनें हलकेच आकृति चितारतात. साथियामध्यें सरळ रेषा, चौकोन आढळतात. स्वस्तिक, कमळ हीं चिन्हें दिसतात. दिवाळी, नवरात्र या सण समारंभाचें वेळीं साथियानें घराघरांपुढचीं अंगणें उजळून जातात.

नागपंचमीच्या वेळीं मात्र दुधांत कोळशाची भुकटी मिसळून गुर्जर महिला पाळणा, विंचू, सर्प इत्यादि आकृति रेखाटतात. प्रबोधिनी एकादशीला चित्रविचित्र रंग न वापरतां केवळ पांढऱ्या शुभ्र रंगानेंच साथिया नटत असते.



अल्पना

सौराष्ट्रांत तर अंगणाप्रमाणेंच दाराची चौकटहि चितारली जाते. या प्रकाराला 'टोडेलो' म्हणतात.

**अल्पनाः**—बंगाल ओरिसांतील घरांपुढें अल्पना दिसते. अल्पनाहि विविध रंगानीच रंगते. निरनिराळे रंग तयार केले जातात आणि मधल्या बोटाला चिंधी गुंडाळून बंगाली अल्पना काढतात.

अल्पनेंत वक्र रेषांचा वापर बराच केलेला असतो, पण वर्तुळ मात्र क्वचितच असतें. वापरलेले रंग मंडनेप्रमाणें भडक नसतात, तर शांत-सौम्य असतात. त्यामुळें अल्पनेंत गोडवा अधिक भासतो. फ्री हँड डिझाइन असावें तशीच अल्पनेची रचना असते. मध्यापासून आकृतीला सुरुवात होते. आणि पाकळयांवर पाकळया वाढत जातात. आकृति जशी सौम्य रंगांत असते. तशाच रेषाहि नाजुक असतात. ठसठशीतपणा नसतो. रेषांची प्रवृत्ति गोलाकार अधिक असते. कोपरे, त्रिकोण, चौकोन बहुतकरून नसतातच.

माघ महिन्यांत बंगालमध्यें ताराव्रत पाळलें जातें. या व्रताचे वेळीं घरापुढें चंद्र, सूर्य इत्यादि ताऱ्यांना रांगोळींत महत्त्व दिलें जातें. अल्पना घरांच्या भिंतीवर व छतावरहि रेखाटण्याची प्रथा आहे.

### बैलांच्या शर्यती

साध्या रांगोळींत इतके हे प्रकार, मग जेवणांत, खेळण्यांत किती असतील! हर्ष—आनंदाच्या उर्मी व्यक्त करण्याचें माध्यम म्हणजे उत्सव. उत्सवांच्या नाना तऱ्हा भारतांत प्रचलित आहेत, पण त्यांचें स्वरूप जरी भिन्न भिन्न दिसलें तरी अंतःप्रवाह मात्र एकत्र असल्याचें दिसून येईल. आपल्याकडे दसऱ्याला बैल पळविण्याची किंवा घोडे पळविण्याची रूढि आहे. केरळांत-भारताच्या दक्षिण टोकालादेखील वेगळया दिवसांत आणि थोडया वेगळया रीतीनें हीच पद्धत चालू आहे. तिचें नांव आहे— काळापुट्टु.

काळापुट्टु म्हणजे केरळ प्रदेशांतल्या शेतकऱ्यांच्या जीवनांतला एक हौसे—मजेचा प्रकार. सुगी संपते. धान्याच्या राशी लागतात. वर्षभर उन्हातान्हांत उपसलेल्या कष्टांचें सार्थक होतें,

आता थोडा जीवाला विरंगुळा हवाच. थोडी करमणूक हवीच. मग वर्षभर औताला, गाडीला जुंपलेले बैलहि निघतात बाहेर.

शेताचें औरस चौरस आवार तयारच असतें. घोटाभर पाणी साचवलें जातें. धष्ट पुष्ट बैलांची रांगच्या रांग बांधावर उभी राहते. पंचक्रोशींतलीं माणसं ही गर्दी करून उभीं असतात. उत्सुकतेनं बघत असतात.

थोडयाच वेळांत हाकार होतो आणि मानेवरचें जूं घेऊन दोन दोन बैल धावायला लागतात. भिरी भिरी पळायला लागतात. बैलांच्या आणि हाकणाऱ्यांच्या दोघांच्याहि कानांत वारा भरतो. दोघेहि बेफाम होतात. जीव तोडून पळतात-पळवतात.

बघ्यांना मौज वाटते. त्यांची वीरश्री जागेवरच उसळून येते. आरडाओरडा, शिट्टया, टाळया यांचा गजर होतो. एकामागून एक बैलजोडया दिवसभर पळतच राहतात विजयी जोडीला बक्षिसें मिळतात. या बैलांच्या शर्यतीलाच केरळांत म्हणतात काळापुट्टु!

### आनंद बाजार

गुजरातची व्यवहारकुशल अशी वणिक्वृत्ति प्रसिद्ध आहे. ती त्यांच्या आनंदोत्सवांतहि प्रकट झाल्यावाचून राहात नाही. सर्वच प्रांतांचें हें वृत्तिवैशिष्टय त्या त्या प्रांतांतील रूढींतून प्रकट होत असतें. गुजरातचा मुलांचा आनंद बाजार पाहावा.

आनंद बाजार हा गुजराती मुलांचा एक खेळ. विशेषतः शाळांतून तो साजरा होत असतो. तसें पाहिलें तर हा कांही गुजराती मुलांच्या प्राचीन खेळांपैकी नव्हे, आहे आधुनिकच, पण मोठा गमतीदार.

मुलें खाण्याच्या, खेळण्याच्या निरनिराळया वस्तु तयार करून आणतात. प्रत्येकजण निरनिराळी वैशिष्टयपूर्ण वस्तु बनवतो. यांत त्यांचें कौशल्य व छंद प्रवृत्तीहि प्रकट होते.

मग आलेल्या वस्तूंचा एक लुटुपुटीचा बाजार भरला जातो. बाजारांत आप आपल्या वस्तू आकर्षक रीतीने, सजवून मुलें दुकानें थाटतात.


या बाजाराला मुलांच्या पालकांनाहि निमंत्रित केलेलें असतें. साहजिकच पालक येतात. बाजारांत हिंडतात, मुलांच्या वस्तु पाहतात आणि कौतुक करतां करतांच खरेदीहि करून टाकतात. एखाद्याचा माल झटकन् उठतो. दुसऱ्याचा दमानं जातो, पण तासा-दोन तासानं साराच बाजार आटोपतो. आनंदी आनंद होतो!

गुजरातची वणिक्वृत्ति अशा आनंदाच्या प्रसंगीहि प्रकट झालेली पाहून जशी मौज वाटते तशीच बाजारासारख्या रुक्ष व्यवहारांत ओतलेला हा आनंदाचा शिडकावा पाहून त्यांच्या थोर रसिकतेचीहि साक्ष पटते.

### भलरी, यक्षगान, भांगडा

शेती हा तर भारतांतला प्रमुख व्यवसाय. सस्यशामला मायभूमींत घाम निथळावा, रक्त आटवावं. अशी ही कर्मपूजा उन्हांत, वाऱ्यांत, थंडींत, पावसांत अहोरात्र चाललेली असते. मग धरती प्रसन्न होते आणि ओंजळी भरभरून मोतीदाणें देते. शेतकऱ्यांच्या कष्टाचें हलकें फुलकें फूल होऊन जातें. आनंदाला पारावार उरत नाही. मनाचें पाखरूं भिरभिरायला लागते. जमिनीला पाय ठरत नाही. यांतूनच मग नृत्याचा जन्म होतो. भारतांतलीं बहुतेक नृत्यें हीं शेतीच्या हंगामाशी निगडित अशीं आहेत. महाराष्ट्रांत सुगी-सुरू झाली की, जसें "भलरी" गाजतें तसंच कर्नाटकचें यक्षगान.

यक्षगान हा दक्षिण भारतांतला, विशेषतः कर्नाटकांत प्रचलित असलेला एक प्रमुख नृत्य-नाटय प्रकार आहे. यक्षगान म्हणजे गंधर्वांचें गाणें, स्वर्गीय गा.. महाराष्ट्रांत दशावतारी नाटकें पूर्वी होत असत. त्याच प्रकारचें हें



यक्षगान. यक्षगानांत देवादिकांच्या कथा वर्णिलेल्या असतात. रामायण, महाभारत, पुराणें यांतून यक्षगानांतील प्रसंग निवडलेले असतात. टाळ–मृदंगाच्या ठेक्यावर एक एक प्रसंग कथारूपानें गावून दाखविणाऱ्या यक्षगानाच्या प्रकारास 'ताळमद्दले' म्हणतात. ह्या प्रकारांत नृत्य नसतें की नाटचहि नसतें, परंतु एखाद्या रंगमंचावर शेतांत, किंवा देवळापुढें विविध पात्रांच्या नृत्य-नाटचांतून प्रसंग कथनाचा जो प्रकार आहे त्याला म्हणतात यक्षगान आट.

आपल्याकडील जुन्या नाटकांतून जसा सूत्रधार असे, तसाच भागवत नांवाचा निवेदक यक्षगानांत असतो. तो सुरुवात करतो, प्रसंगाचें प्रास्ताविक बोलतो, पात्रांची ओळख करून देतो. आणि मधून मधून प्रसंगांतले दुवे जुळविण्याचेंहि काम करीत राहतो.



**यक्षगान**

कर्नाटकाच्या दक्षिण भागांत " यक्षगान " ही लोककथा विशेष प्रिय आहे. शेतीचा हंगाम संपला की ठिकठिकाणीं यक्षगानाचे कार्यक्रम घुमायला लागतात. शेतकरीच यांतील कलाकार असतात. रात्रीं ८–९ वाजतां सुरू झालेला हा कार्यक्रम रंगतरंगत सूर्योदयापर्यंत चालतो.

पंजाबच्या तगड्या माणसांप्रमाणेंच त्यांचें भांगडा नृत्य प्रेक्षणीय आहे. शेतांतली मळणी संपते तशी भांगडाचे ढोल घुमायला लागतात. आपल्याकडील ट्रँगलप्रमाणेच पण लांबट आकाराचें लोखंडी वाद्य बोलायला लागतें. पंजाबी शेतकऱ्याचीं जमिनीवर पावलेंपण ठरत नाहीत.

डोक्यावर रंगीत फेटे आणि कमरेभोवती विविधरंगी अंगोछे गुंडाळून नृत्यकार सजतात. अंगांत हरतऱ्हेचीं जरीचीं जाकिटेंहि असतात. नृत्य रंगांत आलें की, एक नृत्यकार उठतो आणि दुसऱ्या नृत्यकाराच्या डोक्यावर घडा ठेवून स्वतः त्यावर उभा राहातो. सारे बघे थक्क होऊन बघूं लागतात. घड्यावरचा नृत्यकार नृत्याभिनय करून घड्यावर नृत्य करूं लागतो तेव्हा तर प्रेक्षकांची नजर धन्य होऊन जाते. भांगडांतला हा प्रकार पंजाबी लोकसमुदायांत फारच प्रिय आहे.

गुजरात तसा हळुवार आहे. त्याच्या नृत्यांतहि भावनेचा हळवारपणा प्रकट होतो, हें गरब्याच्या प्रकारांवरून समजून येईल.

नवरात्रीच्या दिवसांत मातेच्या मंदिरांत किंवा इतर ठिकाणीं उघड्यावरहि गुजरातमध्ये गरबे गायले जातात. गरब्यांचें वैशिष्टच असें की, नृत्यकाराच्या गायकांच्या डोक्यावर छिद्राछिद्रांचे मृत्तिका घट ठेवलेले असतात. ते भडक रंगाने रंगवलेले असतात आणि त्यांत जळते दिवे ठेवलेले असतात. त्यामुळें जाळीदार आकाशकंदीलच जणु डोक्यावर प्रत्येकाने धारण केलेले आहेत असें भासतें


गरबी, रासडा आणि रास असे गरब्याचे प्रमुख प्रकार मानले जातात. या प्रकाराच्या नृत्यगीतांत भावनोत्कटता अधिक असते. शृंगार, करुणादि सर्व रसांचा परिपोष गरब्यांत होत असतो. गरबा हा गुजरातचा खास नृत्यप्रकार आहे. कवि दयाराम हा याचा जनक म्हणून मानला जातो. स्त्रियांप्रमाणेंच गुर्जर पुरुषहि गरबे गातात-नाचतात. " गुर्जर देशो गरबो जीवे । जीवे ए जगमोज । हसती रमती रमनारी ओ, रमवा आवे रोज ! "

गर्ब्याचें आकर्षण गुजराती जनतेंत फार आहे. नृत्यगीत प्रकारांत प्रेक्षकांचीं मनें खेचून ठेवण्याचें विलक्षण कसब आहे. ह्या प्रकारांत अभिनयाला तसा वाव कमीच आहे, पण त्यांतील गतिमानता मात्र चित्तवेधक खासच आहे. शरदऋतूच्या वेळीं जेव्हा आभाळ सुनीलकांत असतें, धरित्री धान्याच्या कणसांनी भारावलेली असते अशा पुष्टी तुष्टीच्या वातावरणांत गरब्याच्या रात्री रंगून जातात! गुजराती माणूस हरखून जातो.

अशी ही विविधता आपआपल्या खास वैशिष्टचांनी विनटलेली असून ती प्रांतोप्रांतींच्या कलाप्रकारांत आढळून येते. परंतु या विविधतेची जाण किती थोडी ! आम्हा सुशिक्षितांना परदेशी साहित्यकारांची आणि त्यांच्या पांचपन्नास ग्रंथांचीं नांवे सहज पाठ येतात, अर्थात यांत वावगें कांहीच नाही; पण शेजारच्या गुजरात–कर्नाटकांतल्या किंवा थोडेंसें पुढे-केरळ-ओरिसांतल्या पांच-सहा कवींचीं किंवा कादंबरीकारांची आणि त्यांच्या ग्रंथांची कांही ओळख असत नाही.

पुण्या-मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरांतून तर हजारोंनी परभाषिक मंडळी व्यवसायाच्या निमित्ताने येऊन राहिलेली असतात. त्यांचे आपले मोहल्लेच बनलेले असतात. शाळा, क्लब, असोसिएशन्स् निर्माण झालेल्या असतात. त्यांचे त्यांचे सण, समारंभहि ते एकत्र जमून साजरे करीत असतात. पण हें सारें घडतें आपल्या पुरतेंच. पुण्यांतच कुठे तरी नाड हब्बच्या वेळीं एक दिवसाचें कर्नाटक निर्माण होतें. दुर्गापूजेच्या दिवसांत खडकीच्या कुठल्यातरी परिसरांत औटघटकेचा बंगाल तयार होतो. कँपच्या बाजूला पंजाब राहतो आणि केळवणी मंडळाच्या टोलेजंग इमारतींत नवरात्र माताचा गर्बा रंगत असतो. पण याचा मागमूस एकमेकांना फारच थोडा असतो. किंबहुना नसतोच. मग एकमेकांच्या उत्साहांत, हर्षांत, आनंदांत सहभागी होण्याचें दूरच.

आपण वेळीं अवेळीं म्हणत मात्र असतों की, भारत आमचा देश आहे भारताची संस्कृति प्राचीन आहे, थोर आहे इत्यादि. पण या देशाची, त्याच्या संस्कृतीची ओळख



**भांगडा**

आपणास फारच अल्प आहे आणि याचीच खंत सानेगुरुजींना लागून राहिलेली होती. भारतीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर त्यांना या गोष्टीची तीव्रता अधिकच जाणवत होती. कारण १९४७ पूर्वी एक तर भारत परकीयांच्या गुलामींतच होता. राजकीय स्वातंत्र्य नसलें की, मग स्वाभाविकपणेंच इतर कलाविषयक स्वातंत्र्याचा लोप झालेला असतो. स्वातंत्र्यानंतर सांस्कृतिक जीवनाचा विकास सहज व सुलभपणें करतां येतो.

साने गुरुजींना याचाच ध्यास लागलेला होता. त्यावेळीं लिहिलेल्या एका लेखांत त्यांनी आपली आंतरभारतीची कल्पना विषद केलेली आहे. ते लिहितात.

**आंतर भारतीचें स्वप्न !**

"आपण अखंड भारत म्हणून म्हणत आलों. परंतु या भारताचें आपणास ज्ञान नाही. हे प्रांत माझे, या सर्व भाषा माझ्या., हे सारे माझे भाऊ, सर्वांना भेटेन, सारें अभ्यासीन असें आपणांस कोठे वाटतें?... मुंबईत रशियन्, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषा शिकवायची सोय आहे, परंतु अशी संस्था नाही की जेथे सकल भारतीय भाषा शिकतां येतील.

"म्हणून "आंतर भारती" संस्था स्थापण्याचें माझें कधीपासूनचें स्वप्न. सुंदरशी जागा असावी. सरकारजवळ मागावी किंवा कोणा भल्या सज्जनाने दिली तर कृतज्ञतेनें घ्यावी. तेथे त्या त्या प्रांतीय भाषेंतील कोणी तज्ज्ञ असतील. त्या सर्वांना हिंदी येत असावी. त्या त्या भाषेंतील वाङ्मय तेथे राहील. संस्थेला जोडून विद्यालय असावें. शेती, हस्तोद्योग असावेत. भारतीय भाषा शिकण्याची तेथे सोय होईल. विद्यार्थ्यांच्या कानावर सर्व भाषा पडतील. त्या त्या साहित्यांचे मराठीला परिचय करून देण्यांत यावेत. इतर भाषेंतूनहि मासिकें काढून त्या त्या प्रांतीयांना सकल भारताची ओळख करून द्यावी असें माझें स्वप्न. गुरुदेव रवींद्रनाथ विश्वकवि. त्यांनी विश्वभारती स्थापिली. जगाचा नि भारताचा संबंध असू दे. पूर्व ती पूर्व, पश्चिम ती पश्चिम असें नाही. पूर्वेकडून निघाला तो पश्चिमेला भेटेल. पृथ्वी वाटोळी आहे. पूर्ण आहे. भारत– विश्वाच्या ऐक्याचा अनुभव घेण्यासाठी स्वतःचा अनुभव घ्या. भारतांतील प्रांतांची तरी एकमेकांस ओळख कोठे आहे? त्या त्या प्रांतांचें सांस्कृतिक कार्य, नवसर्जन आपणास कोठे माहित आहे? आंतरभारती भारतीयांना एकमेकांची भक्तिप्रेमाने ओळख करून देईल.

"साहित्यावरोबर, तेथे चित्रकला,नृत्यकला यांचाहि अभ्यास असावा. सहकारी शिक्षण दिलें जावें. नवभारताच्या निर्मितीचें तें एक तीर्थक्षेत्र असावें. माझ्या डोळ्यांसमोर सुंदर स्वप्न आहे. आंतरभारतींतील मुलें सुटींत खेडोपाडीं जातील. मेळे-संवाद करतील. स्वच्छता करतील. आंतरभारतींतून सहकारी चळवळ फैलावायला ध्येयवादी तरुण बाहेर पडतील. ग्रामीण कला तेथे फुलतील.

"केवळ भाषांचा अभ्यास हेंच कांही या संस्थेचें ध्येय नव्हे. तेथे दुसऱ्याहि अनेक चळवळी जोडाव्या असें मनांत आहे. कला आणि ग्रामीण जीवन यांचा तेथे अभ्यास व्हावा... मौज, आनंद, सेवा, संस्कृति, उदारता, ज्ञान, विज्ञान, कला—एक गंभीर अशी प्रवृत्ति आंतरभारती निर्मू पाहील...

"आज स्वतंत्र भारताची टोलेजंग इमारत उभी राहयची आहे. भाषावार प्रांतरचना पूर्वीच मंजूर झालेली आहे, परंतु अशी रचना केली जात असतां द्वेष, मत्सर न फैलावोत, परस्पर प्रेम राहो, सहकार्य राहो. भारताचें एक हृदय आहे ही जाणीव सर्वांना असो. परमेश्वराला सहस्रशीर्ष, सहस्राक्ष अशी विशेषणें आपण देतों, पण सहस्रहृदय असें विशेषण कधीच नाही आढळत. परमेश्वराला हृदय एकच, त्याप्रमाणें भारताचे प्रांत अनेक झाले तरी अंतःकरण एक असो.

"प्रांतांनी भारती व्हावें व भारतानें अतिभारती व्हावें. आपण क्षुद्र कुंपणें घालून बसतां कामा नये. व्याप वाढवाल तर वैभव वाढेल. संकुचितता सोडा. सारे प्रांत प्रेमस्नेहानें एकमेकांजवळ वागोत. भारताचें एक हृदय असो."

राष्ट्रीय एकात्मतेची भाषा आज वारंवार ऐकूं येते. वास्तविक एक राष्ट्र म्हटल्यावर त्याची एकात्मता कांही वेगळी वस्तु असू शकत नाही. ती त्याचें अविभाज्य असें अंगच असतें; त्याशिवाय एकराष्ट्र ही कल्पनाच संभवूं शकत नाही, पण आज या एकात्मतेच्या भावनेला आवाहन करण्याची, जाग आणण्याची खटपट चाललेली आहे खरी. त्यासाठी चर्चा, परिषदा, परिसंवाद यांचीहि योजना होत आहे; हें प्रयत्न म्हणून ठीक असलें, तरी स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा वर्षांच्या कालावधिनंतरचा हा प्रयत्न खासच चिंतनीय म्हटला पाहिजे, कारण अशा आयोजनांची आवश्यकता वाटावी यावरूनच राष्ट्रपुरुषाच्या प्रकृतींत काळजीकरण्याइतपत विघटना झाली आहे हें स्पष्ट होतें, आणि हें लक्षण कांही ठीक नव्हे. एकीकडे आर्थिक सुबत्तेसाठीं पंचवर्षीय योजनांचा धुमधडाका चालू असतांना दुसरीकडे एकात्मतेसाठी परिसंवाद भरवावे लागावेत हीं राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांतला ऱ्हास दाखविणारी गंभीर चिन्हें आहेत.

"आंतर भारती"चा विचार हा राष्ट्रीय एकात्मतेचाच विचार आहे. या अशा प्रकारच्या विचारांची आज आवश्यकता आहे, हें कोणीच नाकारूं शकणार नाही. सर्वमान्य अशा विचारांची अंमलबजावणी कशी होईल, हाच खरा प्रश्न असतो. आंतरभारतीच्या विचारांचा प्रसार तर झाला पाहिजेच, पण केवळ विचारावर थांबणारी ही बाब नसून ती सहजप्रवृत्ति बनली पाहिजे, म्हणून आंतरभारतीच्या वृत्तीचे व दृष्टीचे नागरिक निर्माण होण्यावरच भारताची भावनात्मक एकता दृढमूल होणार आहे.

•••



वधुपरीक्षा

# नवें वाचन



## अपंगत्वावर विजय

ले. उषा मोहनी, प्रकाशक : समाज प्रबोधन संस्था, विद्यापीठ वाडा, १२४२ सदाशिव पेठ, पुणे २. पृष्ठें १३६, किं. रु. २ न. पै. ६०

सोप्या भाषेंत लिहिलेलें हें पुस्तक अथपासून इतीपर्यंत अत्यंत सुरस व माहितीपूर्ण आहे. पुस्तकाच्या दर्शनी भागावरून ते इतक सुरेख असेल अस प्रथम मुळीच वाटत नाही. परतु एकदा चाळायला सुरुवात केल्यावर तें व्यवस्थित वाचल्याशिवाय राहवतच नाही. पाल्हाळ आणि अपंगांच्या मनांत अनेक कारणामुळें वसत असलेल्या अगतिकपणाचा मागमूस संपूर्ण पुस्तकात औषधालाहि मिळणार नाही.

अपगांनासुद्धा समाजात स्वाभिमानानं व आत्मविश्वासानं जगायचा हक्क आहेच हें त्यानी अनेक उदाहरणावरून स्पष्ट करून सागितलें आहे. तसेच अपंग व त्याचे आप्तमित्र याची एकमेकाबद्दलची वागणूक कशी असावी हें लेखिकेने नेमक्या शब्दांत उदाहरणासहित दाखविलें आहे. त्या म्हणतात.

" मानवजातीतील अपंगाचा हा एवढा मोठा भाग निरुपयोगी व भारभूत करून ठेवणें मानवतेच्या प्रतिष्ठेला शोभणारें नाही. आता हें परवडणारहि नाही. अशी जरूरीसुद्धा राहिली नाही. अपग व्यक्तीच्या सामर्थ्याचें, आकांक्षाचे आणि योग्यतेचें मूल्यमापन झालें तर इतर सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणें ह्याहि व्यक्ती देशाची सपत्ति व प्रतिष्ठा वाढविण्यास हातभार लावू शकतील "

अपगाच्या सामर्थ्याविषयीचा हा रास्त अभिमान सपूर्ण पुस्तकात पानापानावर प्रत्ययास येतो. अपग वैमानिक डग्लस बेंडर, पंगु हेन्री विस्कार्डिस, श्री. सुरेश आहुजा, वेद मेहता अन् नुकतेच पायान पेपर लिहून मॅट्रिक परीक्षा पास झालेले श्री. मेश्राम वगैरे अनेक अपग केवळ आत्मविश्वासाच्या जोरावर जीवनाची यशस्वी वाटचाल करीत असल्याच त्यानी निदर्शनास आणलं आहे. ही सर्व माहिती अनपगानासुद्धा उद्बोधक होईल. उषा मोहनी या स्वतः अपंगांच्या यातनाचक्रांतून जात आहेत. एम्. ए. परीक्षा उत्तीर्ण होताच त्याना अंधत्व आलें, परंतु त्यांनी थांबला तो संपला या धाकानें दुःखांतच गुरफटून न बसतां आपली व समदुःखी बाधवाची प्रगति करण्याचें काम हाती घेतलें आहे. त्यासाठीच पुस्तकरूपान त्यांच्या सुखदुःखाचा आढावा घेऊन, अगदी बारीकसारीक सूचना, अपेक्षा व्यक्त करून त्यांचं जीवन सुसह्य होण्यासाठी केलेला हा प्रयत्न निःसंशय कौतुकास्पद आहे. पुस्तकाचं स्वागत सर्वत्र होईल यात शका नाही.

सौ. निर्मला पुरंदरे

## आनंदें भरीन तिन्ही लोक

ले. विनायक य. कुलकर्णी
प्र. उन्मेष प्रकाशन, लोणावळा
मूल्य : दीड रुपया

श्री.विनायकराव कुलकर्णी यांचें हे ज्ञानेश्वरीचें चिंतन पंडिती चिकित्सा आणि सांप्रदायिक प्रथा यांहून वेगळें आहे. त्यांची दृष्टि विधायक आहे. पांडित्यप्रदर्शन आणि विभूतिपूजन यांनी त्यांचें समाधान होत नाही. ज्ञानेश्वरानी ज्या वैश्विक करुणेनें प्रवृत्त होऊन, ही शब्दसृष्टी निर्माण केली, त्या करुणेशी समान होऊन, आपल्या नित्याचार जीवनात काही मार्गदर्शन प्राप्त करावें अशी श्री. कुलकर्णी यांची भूमिका आहे.

हें ज्ञानेश्वरी–चिंतन म्हणजे तुमच्या आमच्या नित्याच्या जीवनात ज्ञानेश्वरीचें अवतरण घडावें, शिवांत जीवाचें अवतरण घडावें म्हणून आळवलेलें एक उत्कृष्ट स्वागतगीत आहे. हा प्रयत्न अत्यत स्वागतार्ह आहे. त्यांनी अत्यंत प्रसादपूर्ण शैलीत, सरळ, साधा परंतु प्रत्ययकारी अशा दृष्टातांनी आपला विषय सहज– सुगम बनविला आहे. कुटुबजीवन हें " सकळ धर्मांचें माहेर " कसं आहे हें दाखवून त्यानी ज्ञानेश्वराना अभिप्रेत असलेला " कर्मयोग " कुटुंबात कसा अनिवार्य आहे हें ज्ञानेश्वराच्याच शब्दानी दाखवून दिले आहे.

रा. चिं. ढेरे.

## दर्शन ज्ञानेश्वरी

ले. वि. ग. कानिटकर. इंदिरा प्रकाशन. विक्रेते–इनामदार बंधू, पुणे २. मूल्य चार रुपये.

ज्ञानेश्वरी हा वारकरी संप्रदायाचा आदिग्रंथ आहे. या ग्रंथांतील सरस वेचे संपूर्ण भावार्थासहित एकत्र देऊन श्री. कानिटकर यानी ही " दर्शन ज्ञानेश्वरी " बांधली आहे.

संत हे भक्त असतातच, पण कांही अत्यंत प्रतिभाशाली कवि असतात. साहित्यिक त्यांच्या भक्तीकडे दुर्लक्ष करून साहित्यसौंदर्याची महती गातो, तर भक्त त्यांतील साहित्य गुणाकडे दृष्टिक्षेपहि न टाकत भक्तिरसात डुबू इच्छितो.

ज्ञानेश्वरीकडे पाहण्याचें हें अगदी दोन कडेचे दोन दृष्टिकोन दिसतात. खरें पाहतां या दोन दृष्टिकोनांचा सगम झाला पाहिजे. ज्ञानेश्वरीचें खरें संपूर्ण आकलन तेव्हाच होईल. मग भक्तांना साहित्यगुणांमुळें ज्ञानेश्वरीतलें सौंदर्य शतगुणित झालेलें दिसेल, तर साहित्यिकांना भक्तीमुळे तींत आलेलें ओज कळेल. अतिशय सौंदर्यवती स्त्री तितकीच गुणवती असावी तसा आनद दोघांना लाभेल.

श्री. कानिटकरांच्या " दर्शन ज्ञानेश्वरी " चें महत्त्व इथेंच आहे. ज्ञानेश्वरीच्या दोन्ही रूपांचा संगम त्यांत दिसेल आणि भक्त व साहित्यिक या दोघांच्या मनाला तो नवनवा बहर आणील.

दि. बा. मोकाशी.

माणूस } —— साहित्य विभाग
जुलै ६२
अरविंद गोखले
मधुकर केचे

# सोनियाचीं पाउलें

## ~~~~~~एक नीरस व कृत्रिम बोलपट

~~~~~~रंगा मराठे

मराठी चित्रपट-कलेची घसरगुंडी सिद्ध करणारे बरेच बोलपट दर वर्षी निघतात. त्यातच राजा परांजपे दिग्दर्शित "सोनियाचीं पाऊले" याचा नाइलाजाने समावेश करावा लागेल, "लाखाची गोष्ट," "पेडगांवचे शहाणे," "ऊन पाऊस," या बोलपटांमुळें नावलौकिकास आलेले राजा परांजपे यांचें दिग्दर्शन आणि अभिनय-कौशल्य यावर हवाला ठेवून काही अपेक्षा बाळगून जाणाऱ्या प्रेक्षकाची या बोलपटामुळें सपशेल निराशा होते. चित्रपटाची लांबी आणि एका मागून एक अशा अर्थशून्य प्रसंगांची लांबण लागल्यामुळें प्रेक्षक कंटाळून जाभया देऊ लागतात. पतिव्रतेची दर्दभरी कहाणी व तिची पावल हीच "सोनियाचीं पावलं" या सिद्धांताचा प्रदीर्घ डोस प्रेक्षकांच्या गळी उतरविला जातो. चित्रपट सुरू होण्याच्या अगोदर सोनियाची पावलें पडद्यावर दाखविली जातात व चित्रपटाचे शेवटीं पतिव्रतेची पावल हीं सोन्याचीं पावलं आहेत असा आटापीटा लेखक आणि दिग्दर्शकाने केला आहे. तरीसुद्धा प्रेक्षक रिकाम्या मनाने व जड डोक्याने थिएटरबाहेर पडतो.

बोलपटाचं कथानक थोडक्यात असं—

मनोहर : (राजा परांजपे)—एका मोठ्या कंस्ट्रक्शन कंपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर गरीबीतून वर आलेला. स्वतःचा बंगला व गाडी.

मनोहरची बायको : (रत्नमाला) साधी भोळी, जुन्या वळणाची बाई.

अंजली : (सीमा) मनोहरची मोठी मुलगी. आईच्या वळणावर गेलेली. देवपूजा व तुळशी-प्रदक्षिणा घालणारी.

ललिता : (ललिता देसाई) मनोहरची धाकटी मुलगी Modern Girl.

अंजली लहान (सात आठ वर्षांची) असताना मनोहरच्या बाळ मित्राच्या गावीं लहान मुलं बाहुला-बाहुलीच्या लग्नाचा खेळ खेळत असताना अंजलीचं व मनोहरच्या बाळ मित्राच्या मुलाचं—प्रसादच—खेळात लग्न लागत. लहान मुलांचा खेळ पाहून मोठी माणसं गहिवरून जातात व मनोहर आपली मुलगी-अंजली—प्रसादला देण्याच वचन आपल्या मित्राला देतो. पुढे मनोहर श्रीमंत होतो. त्याचा मित्र गरीबच राहातो व त्याचा मुलगा प्रसाद एका पायान पांगळा होतो व टांगेवाल्याचा धंदा करतो, म्हणजे टांगेवाला होतो.

लहानपणी बाहुला-बाहुलीच्या खेळात लग्न लागल्यामुळे अंजली प्रसादला मनानें आपला पति मानते व मोठी झाल्यावरसुद्धा तीच कल्पना उराशी बाळगते. मनोहर याला विरोध करतो. त्याला न जुमानतां ती सासरी पळून जाते व टांगेवाल्याच्या घरीं जाऊन राहाते व त्याला आपला पति मानते. लग्नानंतर थोड्याच दिवसात तिचा सासरा—मनोहरचा बालमित्र मरतो—घरावर जप्ती येते. ती उठविण्याकरितां टांगा विकला जातो. अंजली बेकार व पंगु नवऱ्याबरोबर सुखानें संसार करू लागते, पण तिला गावातील गावकऱ्यांपासून त्रास होऊ लागतो. श्रीमंताची इतकी सुंदर मुलगी पागळ्याला कशी दिली याबद्दल लोक वाटेल तें बोलू लागतात. मवाली आणि दादा लोक तिच्यावर वाईट नजर ठेवतात.

अंजली आपल्या सोन्याच्या बांगड्या विकून शिवण्याच मशीन विकत घेते व त्यावर आपली व आपल्या नवऱ्याची उपजीविका करू लागते. नवऱ्याच्या पांगळेपणावर औषधोपचार करण्यासाठी पुढे ती नवऱ्याला घेऊन गाव सोडते, वैद्य डॉक्टराना भेटते, मोलमजुरी करते व गावोगांव हिंडते. अशाच एका गावी ती व प्रसाद रात्री एका धर्मशाळेंत झोपलीं असताना गावांतील एका घराला आग लागते. आगीनें भडका उडालेल्या त्या घरांत एक लहान मुलगा सापडतो. अंजली व प्रसाद आगीत शिरून त्या मुलाचे प्राण वाचवितात. त्या आगीत शिरल्यामुळें प्रसादचें पांगळेपण जाऊन तो धडधाकट होतो. मुलाचे प्राण वाचविल्याबद्दल त्याचा श्रीमंत बाप आपल्या मालकीचें एक मोठें हॉटेल व आलिशान बंगला अंजली-प्रसादला बक्षिस देतो. प्रसाद व अंजली या आलिशान बंगल्यांत राहूं लागतात व प्रसाद त्याचा मालक व मॅनेजर बनतो.

इकडे मनोहर व त्याची बायको, अंजली घरातून निघून गेल्यामुळें व तिचा तपास न लागल्यामुळें दुःखी होतात. त्याच्या कंपनीत नवीनच इंजिनिअरिंगची परीक्षा फर्स्ट क्लासमध्यें पास झालेल्या एका तरुणास (राजा गोसावी) तो नोकरीस ठेवतो. त्याच्या प्रेमात ललिता पडते व दोघे विवाहबद्ध होण्याचे ठरवितात. त्याला दोन्हीकडच्या वडील माणसांची समति असते, पण अंजली घरातून निघून गेल्यामुळें व बेपत्ता झाल्यामुळें तिचा शोध लागेपर्यंत लग्न न करण्याची ललिता प्रतिज्ञा करते.

नव्या घरी आल्यावर अंजली आजारी पडते. प्रसादच्या डोळ्यावर वैभवाची धुंदी चढते. तो दारू पितो व एका नर्तकीच्या नादाला लागतो. योगायोगाने ललितेचा प्रियकर इंजिनिअर, कंपनीच्या कामासाठी प्रसादच्या हॉटेलात उतरतो. तो प्रसादचे सर्व चाळे पाहातो. प्रसाद दारू पिऊन प्रेयसीला घरात आणून ठेवतो व अंजलीला हाकलन देतो. अंजली माहेरीं परत येते.

आपल्या बहिणीच्या बेछूट नवऱ्याला ताळ्यावर आणण्याची प्रतिज्ञा घेऊन ललिता प्रसादच्या हॉटेलवर येते. ती त्याला आपल्या नादीं
~~~~~~

लावते व त्याच्याशी लग्न करण्याचें त्याला आश्वासन देते व त्याच्या मालकीचा बंगला व हॉटेल आपल्या नांवावर करून घेते. आपल्या व प्रसादच्या लग्नाची लग्नपत्रिका मनोहरला पाठविते. ती पाहून मनोहर त्याची बायको व अंजली घाबरून जाऊन प्रसादच्या गावी त्याच्या हॉटेलात येतात. हें सार नाटक ललिता आपल्या वहिणीसाठी करते. प्रसादची कानउघाडणी करते. प्रसादनें तिच्या नांवावर केलेला बंगला व हॉटेल ती अजलीला भेट म्हणून परत देते. प्रसादला पश्चात्ताप होतो व तो अंजलीची क्षमा मागतो अंजली व प्रसाद सुखानें संसार करूं लागतात व चित्रपट संपतो.

चित्रपटातील सारेच प्रसंग अर्थशून्य व निरस वाटतात. लहानपणी बाहुला-बाहुलीच्या खेळात लग्न लागल्यामुळें प्रसाद हाच आपला नवरा मानणारी सुशिक्षित व तरुण अजलीची व्यक्तिरेखा हास्यास्पद वाटते. आपला नवरा पागळा आहे व तो टांगेवालाहि आहे हे तिला सासरी गेल्यावर समजतं तरीसुद्धा ती त्याला आनंदानें आपला पति मानते व त्याच्यावर मनोभावानें पतिव्रतेसारखं प्रेम करू लागते ही कल्पना आधुनिक युगांत वेडेपणाची वाटते. स्त्री जातीला अशा अंजलीचा अभिमान न वाटता तिची कीवच करावीशी वाटेल. ज्या अजलीच्या व्यक्तिचित्रावर साऱ्या निर्जीव बोलपटाचा उंच डोलारा उभा केला आहे तो डोंबाऱ्याच्या खेळासारखा वाटतो. तुळशीवृंदावनाला प्रदक्षिणा घालणाऱ्या आणि देवाचे तीर्थ घेणाऱ्या अजलीच्या बुद्धिमत्तेबद्दल प्रेक्षकाना आदर न वाटतां ती वेडी आहे काय अशी शका निर्माण होते.

अजली, प्रसाद टांगेवाल्याची बायको म्हणून राहू लागल्यावर तिच्यावर गांवच्या दादाची वाईट नजर असते त्या "दादा" ला धडा शिकविण्यासाठी मध्यरात्रीं ही पतिव्रता त्याच्या खोलीवर जाते हा प्रसंग म्हणजे लेखक आणि दिग्दर्शकाच्या अकलेचें दिवाळें वाजल्याची एक साक्ष आहे. ही पतिव्रता ऐन मध्यरात्रीची वेळ दादाच्या खोलीवर जाण्याकरितां का पसंत करते हें समजत नाही. बरं येवढं करूनच ती थांबत नाही तर ती त्या दादाला पातिव्रत्यावर एक भलं मोठं व्याख्यान देते व म्हणते, "हिंमत असेल तर हो पुढें आणि लाव माझ्या अगाला हात म्हणजे पतिव्रतेच्या पावित्र्याचं काय तेज असत तें कळेल," येवढंच करून ती थावत नाही तर क्षणा क्षणाला त्याच्या जवळ-जवळ येते तिच्या पातिव्रत्याच्या तेजानं बिचारा दादा (विश्वास कुटे) ढेकळासारखा विरघळून जातो. त्याची पतिव्रतेच्या अंगाला हात लावण्याची हिंमत होत नाही. तिच्या तेजानें त्याचे डोळें दिपून जातात व तो तिला बहीण मानून तिची क्षमा मागतो. हा साराच प्रसंग अत्यत खुळचट व मूर्खपणाचा वाटतो. आधुनिक युगांतील एक तरुण सुदर स्त्री चागल्या टांगेवाल्याशी जाणून बुजून लग्न करते व आपल्या पतिव्रत्याचा महिमा गांवातील "दादा" ला मध्यरात्रीं जाऊन पटवून देते हें सारं विसंगत वाटतं, तर्कशुद्ध मनाला तें पटत नाही.

ललितेच्या आणि तिच्या प्रियकराच्या बॅगची अदलाबदल, त्याच्या आईचा प्रौढपणीं इंग्रजी शिकण्याचा हव्यास, मनोहरचा प्रायव्हेट सेक्रेटरी शंभू महादेव (शरद तळवलकर) याचें टेलिफोनवरील संभाषण यातून निर्माण केलेला विनोद शिळा व वेचव वाटतो. जुन्या व गाजलेल्या मराठी चित्रपटातील मसाला वापरून कथानकाला रग भरण्याचा हव्यास बाळगल्यामुळें कटाळवाण्या प्रसगाची लावण लागते. कथानकाचा पायाच ठिसूळ आणि कच्चा असल्यामुळें आधुनिक काळांतील प्रेक्षक त्यात समरस होऊं शकत नाहीत. सारी पात्रें बेगडी व बाहुला बाहुलीच्या खेळासारखी वाटू लागतात. प्रेक्षकाचे मन हलवून सोडणारा असा एकहि प्रसग चित्रपटांत नाही. नायिकेच्या पातिव्रत्याचा महिमा प्रेक्षकाना पटविण्यासाठी व तिची पावले ही 'सोनियांचीं पाउले' आहेत हे सिध्द करण्यासाठी कथानकाचें शेपूट लाववून जो आटापिटा केला आहे तो निष्फळ व निरर्थक ठरला आहे.

चित्रपटांतील गाणीं व संवाद सामान्य आहेत. प्रसगाचें चित्रण करताना कॅमेऱ्याचें किंवा दिग्दर्शकाचें कौशल्य कोठेंच दिसत नाही. चित्रपटात काम करणारे सारे कलावत नावाजलेले असूनसुध्दा चित्रपट फिका पडला आहे. या चित्रपटांत लेखकाला आणि दिग्दर्शकाला काय सागायच आहे याचा प्रेक्षकांना संभ्रम पडतो. मूळ कथानकाशी सबध नसलेल्या पात्रांचा फापटपसारा इतका वाढला आहे की, त्यामुळें निर्माण झालेले प्रसंग हे कथानकाला लावलेली ठिगळें वाटतात. अंजली शिवणाच्या मशीनवर कपडे शिवत बसली आहे हा प्रसग पडद्यावर इतका वेळ दाखविला आहे की मशीनच्या आवाजानें प्रेक्षकांचें डोकें दुखूं लागतें. ललिता आपल्या व प्रसादच्या लग्नाची लग्नपत्रिका मनोहरला पाठविते त्यामुळें दिग्दर्शकानें Suspense निर्माण करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो खुळेपणाचा वाटतो.

उत्कृष्ट नटनटीचा संच, राजा परांजपे यांची भूमिका व दिग्दर्शन, सुधीर फडके यांची संगीतरचना एवढया सर्वांची उपलब्धता असूनसुद्धा ठिसूळ व अर्थशून्य कथानकावर उभारल्यामुळें हा बोलपट सपशेल पडला आहे असं नाइलाजानं म्हणावं लागतं. ●●●


## पांढरे डाग

अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

नकली वैद्यांपासून सावध राहावें.

वैद्य बी. आर्. बोरकर

आयुर्वेद भुवन

मु. पो. मगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)



आपण कोल्हापुरात याल तेव्हा एकवेळ अवश्य भेट द्या...

## ★ साधना गेस्ट हाऊस ★

फक्त लॉजिंगची सोय

★ लक्ष्मी रोड, कोल्हापूर ★

प्रोप्रा :— नलिनीबाई जोशी.

# दिग्दर्शकांकडून अपेक्षाभंग

संपादक " माणूस "

पुणें, २.

स. न. वि. वि.

" सोनियाचीं पाउलें " या चित्रपटाबाबत मी माझे विचार आपणास कळवू इच्छितों व त्याला आपल्या मासिकांतून प्रसिद्धी द्यावी अशी विनंती आहे.

मराठीत ज्यांची दखल घेऊं नये असे चित्रपट भरमसाट निघत असतात, परंतु जुन्या, जाणत्या व ज्यांनी एकेकाळी आपल्या नांवावर चित्रपट गाजविले अशा श्री. राजाभाऊ पराजपे यांच्यासारख्या मान्यवर दिग्दर्शकांकडून एखादा अत्यंत फालतु चित्रपट सादर केला जातो, त्यावेळी मात्र त्याची दखल घेणे हें अत्यंत आवश्यक वाटतें.

" सोनियाचीं पाउले " हा राजा पराजपे यांचा २५ वा चित्रपट. आधीच त्यांनी दिग्दर्शित केलेला म्हणून काही अपेक्षा व त्यात पुनः २५ वा चित्रपट म्हणून अधिकच अपेक्षा वाढलेल्या. म्हणून जास्तच विचारात घेण्यास एक प्रबळ कारण. परतु चित्रपट पाहिल्यानतर मनाशी पहिला विचार येतो तो हा की, खरच का हा चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केलेला आहे ? मनाला पटत नाही. श्री. राजाभाऊंनी सगळेच चित्रपट चांगले दिले आहेत असें नाही, हेहि कबूल की, गेल्या कांही चित्रपटांपासून त्यांच्या दिग्दर्शनकौशल्याला उतरती कळा लागली आहे. (" सुवासिनी " चित्रपटसुद्धा समाविष्ट) परंतु याचबरोबर ही अपेक्षा मात्र खास नव्हती की, त्या घसरगुडीतून वर येण्याऐवजी त्याला एवढा मोठा ' पूर्णविराम ' मिळेल. छे ! छे ! या चित्रपटांत काय आहे, म्हणून काय नाही याचा उल्लेख करावा ? इतकी शोचनीयव केविलवाणी अवस्था याला प्राप्त झाली आहे. मुळामध्यें श्री. कालेलकराची कथा-पटकथा-सवाद हाच एक मोठा विनोद आहे. सुबोध, सुसबद्ध कथा-पटकथा लिहिण्याबद्दल श्री. कालेलकराच्या नावाचा कधीच बोभाट झालेला नव्हता व त्यांच्याकडून ती अपेक्षाहि नाही. उलट त्याच्याबद्दल हीच खात्री म्हणजे आचरट कथा, त्याहून अचरटपणानें केलेली पटकथा व त्यांत भरीस भर म्हणून हिंदी चित्रपटातील तंत्र मंत्राच्या नादीं लागून, कांहीतरी मसाला भरून सादर केलेला निरास, अर्थशून्य सांगाडा ! अशा श्री. कालेलकरांची कथा जेव्हा राजाभाऊ सादर करतात तेव्हा स्वतःच्या कौशल्यानें ती सुसह्य करून, एक उत्कृष्ट चित्रपट पाहावयास मिळेल ही अपेक्षा होती. प्रत्यक्षांत मात्र इतकी घोर निराशा पदरांत आली की, त्याला दुसरी तोडच नाही. मला स्वतःला हें चित्र पाहताना इतका मनस्वी कंटाळा *आला होता की दहा वेळां मधूनच उठून जावे की काय असें वाटत होतें.*

मराठीत चित्रपट-दिग्दर्शकांत श्री. राजाभाऊंचें नांव वरच्या श्रेणीत आहे. चित्रकथा हळुवारपणें कशी हाताळावी यांत त्याचा हात कोणीच धरूं शकणार नाही. ही पुण्याई पाठीशी असतांना या चित्रांत तसें कांहीच दिसून येत नाही. उलटपक्षी कथा ठोकून काढण्याची जाणीव मात्र पदोपदी दिसून येते. चित्रपटातील कोणताहि प्रसंग पाहा-मग तें नायिकेच्या तोडचें पहिलें गाणें असो वा बालमित्राची व मनोहर याची बाचाबाची असो किंवा जाळपोळीचे कोणतेहि प्रसंग असोत त्यापाठीमागें एखाद्या मुरब्बी दिग्दर्शकाचा हळुवार हात आहे हें मनाला बजावलें तरी पटत नाही. सारें कृत्रिम वाटतें.

अर्थात्- कालेलकरांच्या पोतडींतील सुरस व चमत्कारिक कथा हाताळण्याआधीच दिग्दर्शकानें विचार करावास पाहिजे होता व त्याच्यासारख्यानें विचार करून जर असलाच चित्रपट दिला तर नाईलाजाने असेच म्हणावें लागतें की, दिग्दर्शक राजा पराजपे संपुष्टांतच आले असले पाहिजेत.

पंडित मांडके


र. नं. ३११ ] जय सहकार [ र. ता. ४-२-१९६१

वैजापूर तालुक्यांत नव्याने स्थापन झालेली...

**दि वैजापूर तालुका**

**• को-ऑप. ऑईल मिल •**

★ समासद संख्या ९८ ★ शेअर भांडवल रु.५०,७१० ★

— मॅनेजर — श्री. पी. एम्. साळी.

— चेअरमन — श्री. चांगदेव मारुती पाटील.



र. नं. ८३१४ ] जय सहकार [ र. ता. १२-३-१९४२

शेतकऱ्यांना कर्ज पुरविणें, खतें, पेण्ड, सल्फेट व कीडनाशक औषधें पुरविणें, शेतकऱ्यांना अवजारे स्प्रे पंप्स, ट्रॅक्टर भाड्यानें देणारी ' अ ' वर्गांतील...

**पुणतांबा नं. २ विविध**

**• कार्यकारी सहकारी सोसायटी लि. •**

**• मु. पो. पुणतांबा, जि. अ. नगर •**

● सभासद सख्या १५५ ● शेअर भांडवल रु. ८१,२०५ ● रिझर्व व इतर फंडस् रु. १४,५०६ ● इतर सस्थेत गुतविलेले भांडवल रु. ३९,३८५ ● खेळतें भांडवल रु. ४,८०,६०९ ● एकण उलाढाल रु. १३,५५,१४१ ●

— सेक्रेटरी — श्री. अम्बादास नामदेव ढोक चवळे

— चेअरमन — श्री. निवृत्ती गंगाधर पाटील ( धनवटे )

# बालगंधर्वांची पहिली भूमिका आणि ........ सर्वोत्कृष्ट भूमिका

" किर्लोस्कर मंडळीच्या शाकुंतल नाटकातील शकुंतलेची भूमिका ही बालगंधर्वांची पहिली स्त्रीभूमिका. बालगंधर्वांच्या नांवाचा अगोदर बराच गाजावाजा झालेला असल्याने प्रेक्षकांची या पाहिल्या प्रयोगाला चिकार गर्दी झाली होती. नवीन पात्र कसें आहे हें पाहण्यासाठी प्रत्येक प्रेक्षक उतावीळ झाला होता. रंगभूमीवरील प्रथम पदनिक्षेपाच्या वेळीं प्रत्येक पात्र थोडेंतरी घावरतें; त्याप्रमाणें श्री. बालगंधर्व याचीहि स्थिति झाली. आपल्या सख्या आपणास सोडून गेल्याचें पाहून कण्वाश्रमांतील शकुंतलेने घावरल्याचें ढोंग केले, पण ही ढोंगातील शकुंतला खरोखरच घावरलेली मला दिसली. या प्रयोगात बालगंधर्वांचा अभिनय म्हणजे कळसूत्री बाहुलीचा अभिनय होता. फक्त सूत्र तेवढें स्टेजवर दिसत नव्हतें, पण विंगमधून सूत्रचालकाचें काम रा. चितोबा गुरव करीत होते. 'रुतला दर्भांकुर' हें पद म्हणतांना रुतला शब्द उच्चारण्याचे वेळीं पायास हात लावणें व 'सख्ये अनुसये थाब की बाई' हें पद म्हणण्याच्या वेळीं थांबण्याची खूण करणे एवढाच अभिनय बालगंधर्व यांनीं केला. 'वृक्ष वेल या दोहींची' हे पद म्हणताना एकवार त्यानी विंगकडे जें तोंड केलें तें पद सपेपर्यंत दुसरीकडे फिरविलें नाही. चेहऱ्यावर मनोविकार उमटलेला तर सर्व नाटकांत दिसलाच नाही.

प्रयोग पाहताना ज्यानी कै. भाऊराव कोल्हटकर यांची भूमिका डोळ्यांपुढें ठेवून प्रयोग पाहिला त्यानी श्री. नारायणरावाना अगदीच नाकें मुरडलीं व ज्यानी कै. भाऊरावाचें काम पाहिले नव्हतें त्यानी 'आहे, पात्र देखणें आहे. आवाजांत जोम न आला तरी गाण्याची पद्धत गोड आहे.' एवढेच उद्‌गार काढले.

श्री. बालगंधर्व यानी अभिनय व गायन यात पुढें जें असामान्य यश संपादन केलें त्याचा मागमूसहि त्यांच्या रंगभूमीवरच्या पहिल्या कामाच्या वेळीं दिसला नाही. हा मुलगा संगीत नाटकांत स्त्रियांची भूमिका करण्यांत अग्रगण्य होऊन आबालवृद्धाचे तोंडी आपले नांव करील असें भविष्य त्यावेळीं कोणी केलें असतें तर त्यावर कोणाचाहि विश्वास बसला नसता."

१९३१ साली 'रत्नाकर' मासिकानें एक खास बालगंधर्व विशेषांक प्रसिध्द केला होता. त्यांत बालगंधर्वांच्या नाट्यगुणांविषयीं अनेक नामांकित व्यक्तींचे लेख, परिचिताच्या आठवणी वगैरे चांगलें साहित्य संग्रहित करण्यात आलें होतें. मिरजेचे डॉ. रा. म. भातखंडे यांनी 'बालगंधर्व' या नावाचा जो एक लेख या विशेषांकांत दिला आहे त्यांतून वरील उतारा येथें उधृत केला आहे. २६ जून ( १८८८ ) ही बालगंधर्वांची जन्मतारीख असल्यानें 'माणूस'च्या चालू अंकांत हा उतारा देण्याचें प्रयोजन साधलें आहे.

या लेखांत डॉ. भातखंडे एके ठिकाणी म्हणतात, "माझ्या मतें अभिनयाचे बाबतीत श्री. बालगंधर्व यांना शोक व करुण हे रस जितके साधतात तितका कोणताच रस साधत नाही. मानापमान, मेनका, संशयकल्लोळ वगैरे नाटकांत शृंगाराचा ते अभिनय करतात, पण तो पाहून मार्मिक प्रेक्षकांना विशेष आनंद होत नाही. त्यांच्या अभिनयात लाडकेपणा भरलेला आहे, पण तो शृंगारिक नसून बाल्यास शोभणारा आहे. हास्यरस हा पण त्याना मुळीच साधत नाही, वीररसाचा अभिनय उठावदार होण्यास आवाजांत एक प्रकारचा लोभ व मुद्रेवर उग्रपणा जातीचा असावा लागतो तो त्याच्या ठिकाणी नाही. द्रौपदी वगैरे नाटकांत ज्या वेळेस ते रागाचा आविर्भाव करतात त्यावेळीं त्यांच्या क्रोधावर शोकाची छटा विशेष दिसून तो राग सुका दिसतो. त्यांचें भक्तिरसाचें काम अद्याप रंगभूमीवर आलें नाही, पण तो रस त्याच्या स्वभावास अनुकूल असल्यानें शोक व करुण रसाप्रमाणे भक्तिरसहि त्यांना उत्कृष्ट साधेल."

डॉ. भातखंडे यांनी बालगंधर्वांच्या भूमिकेचें केलेलें हें रसग्रहण खरें असल्याबद्दलचा पुरावा योगायोगानें त्याच अंकांत अन्यत्र उपलब्ध आहे. संपादकानी एक नवीन उपक्रम या अंकांत केलेला होता. 'बालगंधर्वांची सर्वोत्कृष्ट भूमिका कोणती? असा प्रश्न संपादकांतर्फें रसिकाना विचारला गेला होता आणि या प्रश्नाला एकून ३३५३ रसिकांकडून उत्तरेंहि आल्याचें संपादकीय नोंदीवरून दिसून येतें. आलेल्या मतपत्रिकाचे वर्गीकरण करता खालीलप्रमाणें भूमिकांचे क्रमांक लागले.

| | | | |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट भूमिका— | रुक्मिणी | १३०१ | मतें |
| " " | सिंधु | २०५२ | " |

देवयानी, भामिनी या भूमिकाहि सगळ्यांना आवडल्याचें या मतपत्रिकांवरून दिसून आलें, पण सर्वोत्कृष्ट भूमिकेचा मान करुण रसपूर्ण अशा 'सिंधू' कडेच गेला.

आपल्या रसग्रहणाचा हा मनोमन पडताळा डॉ. भातखंडे यांच्या नजरेस आला की नाही हें मात्र सांगतां येणें कठिण आहे.

•••

# सवाई माधवरावाचा मृत्यु

गतवर्षीच्या सरकारी नाटचप्रयोगांत मुंबई मराठी साहित्य संघानें सादर केलेलें "सवाई माधवरावाचा मृत्यु" हें नाटक त्या महोत्सवांत बरेंच गाजलें. गाजलेल्या लेखकाच्या एका ऐतिहासिक नाटकाचा एक उत्तम प्रयोग पाहाण्याचें समाधान प्रेक्षकांस लाभलें. अर्थात त्या यशाच्या मुळाशी एक प्रमुख शक्ति होती व ती म्हणजे नटवर्य केशवराव दाते यांचें दिग्दर्शन आणि उत्कृष्ट अभिनय! या खेरीज मा. दत्ताराम आणि मामा पेंडसे यांच्यासारखे कसलेले कलावंतहि त्यांत कामें करीत होते. प्रयोगाला एक वेगळाच उठाव आला. नयनरम्य नेपथ्य, उत्कृष्ट संच आणि कुशल दिग्दर्शन यांचा त्रिवेणी संगमच जणू दृष्टीस पडला.

नुकतेच पुण्यामध्येहि या नाटकाचे दोन प्रयोग करण्यांत आले आणि पुणेकर प्रेक्षकांना कांहीशा प्रमाणांत या गोष्टीची प्रचीति आली, पण नटवर्गानें प्रयोग उत्तम करूनहि कुठेतरी कांही कमी पडत असल्याचा भास होत होता. सवाई माधवरावांचें काम मा. दत्ताराम अप्रतिम करीत होते. त्यांचा प्रत्येक प्रवेश कमालीच्या उंचीवर जात असे. परंतु ती चढती कमान पुढील प्रवेशांतून एकदम खाली उतरत असे आणि याचमुळें नाटक लाटांच्या हेलकाव्याप्रमाणें चढउतार करीत होतें.

अर्थात यामध्यें दोष वाटतो तो खाडिलकरांच्या नाटचरचनेचाच. लांब लांब संवाद कंटाळवाणें झाले. हृदयस्पर्शी प्रसंगानंतर आलेलें विनोद तितकेसे परिणामकारक ठरले नाहीत. अर्थात खाडिलकरांची ही पहिलीच नाटचकृति, तेव्हा त्यामध्ये किरकोळ दोष राहणें अपरिहार्य आहे!

१८९५-९६ साली "विविधज्ञान विस्तारां"तून त्यांचें हें नाटक प्रथम प्रसिद्ध झालें. मात्र त्या नाटकांत आणि सदर नाटकांत बरीच तफावत आढळते. अनेकांनी त्या नाटकांतील रचनेवर त्यांतील पात्रांवर आक्षेप घेतले आणि म्हणून १९०५ सालीं महाराष्ट्र नाटक मंडळीनें जेव्हा तें नाटक बसविण्याचें ठरविलें तेव्हा त्यांनी त्यामध्यें बऱ्याचशा दुरुस्त्या करून घेतल्या. तेव्हांपासून मात्र आजतागायत त्याच स्वरूपांत सदर नाटक रंगभूमीवर येत आहे.


सवाई माधवरावाची कारकीर्द साऱ्या मराठी माणसांस सर्वश्रुत आहेच. बारभाईच्या कारस्थानानंतर जन्माला आलेले सवाई माधवराव पेशवे हा नाना फडणविसांचा एक प्रकारचा विजयच होता. नारायणरावांच्या पत्नीचे पोटीं मुलगा जन्माला न येतां मुलगी जन्माला येती तर सारा इतिहास पालटला असता, परंतु नानांचें आणि मराठ्यांचें दैव चांगलें म्हणून मुलगा जन्माला आला आणि मराठी राज्य जिवंत टिकलें, परंतु सवाई माधवराव अल्पायुषी ठरले. त्यांच्या मनावर त्यांच्या शत्रूंकडून सारखे आघात केले गेले आणि त्यामुळे ते कांहीसे भ्रमिष्ट होऊन अखेरीस आत्मनाश करते झाले. नाटकाच्या कथावस्तूचें मूळ हेंच आहे.

खाडिलकरांना कॉलेजांत शिकत असतांना शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' आणि 'अथेल्लो' या दोन नाटकांचें आणि या कथानकांतील पात्रांचें कांहीसें साम्य आढळलें. विशेषतः या दोन नाटकांचें मराठी रूपांतर रंगभूमीवर पाहतांच तर त्यांना ती गोष्ट विशेष प्रतीत झाली. त्यांचें विचारी मन त्यावर विचार करूं लागलें. हॅम्लेट आणि आयागो ह्या दोन पात्रांच्या व्यक्तिरेखेनें तर त्यांना विशेष वेधून घेतलें. हीं दोन पात्रें एकाच नाटकांत उभीं केलीं तर काय होईल, हा विचार ते वारंवार करूं लागले. त्याच वेळीं कै. वासुदेवशास्त्री खरे यांचें नाना फडणविसांचें चरित्र त्यांच्या वाचण्यांत आलें. त्यामध्यें सवाई माधवरावांच्या मृत्यूसंबंधानें दिलेल्या कारणावर त्याचें लक्ष गेलें आणि मग मराठी इतिहासांतील 'विकारवश हॅम्लेट, सांपडला असें त्यांना वाटूं लागलें. यानरूनच पुढें नाना फडणवीस नायक असलेल्या नाटकांची रचना त्यांनी मनोमन सुरूं केली. हॅम्लेटची व्यक्तिरेखा मिळतांच आयागो कोण? हा प्रश्नहि झट्दिशी सुटला. श्रीमंतांकडे दुसऱ्या बाजीरावानें एक मांत्रिक धाडला होता व त्यानें आपला पगडा बसवून श्रीमंतांच्या मनांत नाना तर्ककुतर्क निर्माण केले असे उल्लेख चरित्रांत आढळले. याच मांत्रिकाला त्यांनी आयागोचा पोषाख चढविला आणि मग त्या मांत्रिकाच्या—केशवशास्त्र्याच्या—कारस्थानांना नीट रंग भरावा म्हणून बाबासाहेब आणि आईसाहेब हीं पात्रें आणि त्यांच्यासंबंधीच्या नाना कंड्या निर्माण केल्या आणि मग नाटक आकार धरूं लागलें.



मा. दत्ताराम आणि सौ. विजया खोटे
सवाईमाधवराव आणि यशोदाबाई

सवाईमाधवरावांचा दरबार
उजवीकडून दुसरे
नाना फडणीस
( मामा पेंडसे )



त्यावेळच्या वाचकांसमोर हें नाटक येतांच नानांचें व्यक्तिमत्त्व फारच विरळ आहे, असा आक्षेप सर्वांनी घेतला. त्याखेरीज इतिहासाचा आधार नसलेलें बाबासाहेबांचें पात्रहि लोकांना पटेनासें झालें. बराच काळ तें नाटक तसेंच पडून राहिलें, परंतु पुढें १९०५ साली महाराष्ट्र नाटक मंडळीनें तें नाटक मागतांच कांही आवश्यक ते फेरफार करून आणि बाबासाहेबांचें पात्र पार रद्द करून एक नवीन रंगावृत्ति महाराष्ट्राच्या चालकांच्या हातीं लेखकानें दिली. आजची रंगावृत्ति ती हीच ! यामध्ये नानांच्या व्यक्तिरेखेला विशेष उठाव आणला. त्यांच्या कर्तृत्वाला मुळीच बाध न आणतां त्यांचें धोरण जितक्या उज्ज्वलतेनें रेखाटतां येईल तेवढें रेखाटलें. आईसाहेबांसंबंधीहि ऐतिहासिक पुरावा नसूनहि तें पात्र उभें केलें. मात्र मूळच्या नाटकांतील श्रीमंत पेशवे आणि केशवशास्त्री हीं दोन पात्रेंच काय तीं कायम ठेवून सुमारे दोनतृतियांशाहून अधिक नाटक नवीन लिहावें लागलें. नाटक रंगभूमीवर आलें तरीहि लोक खूष नव्हतेच. एका लेखकानें तर " नानांची नालस्ती होईल, अशा रीतीनें नानांचें पात्र रंगविलें असून खाडिलकरांसारखे लेखक जन्मले नसते तर फार बरें झालें असतें ! आता जन्मले आहेत तर लवकरच मरतील तो सुदिन ! " अशा तऱ्हेची अत्यंत विदारक टीका केली होती. ही टीका जरी अतिरंजित असली तरी तेव्हापासून खाडिलकरांच्या ह्या नाटयकृतीवर आक्षेप घेतले जातच आहेत.

महाराष्ट्र नाटक मंडळीनें १९०५ साली या नाटकाचा प्रथम प्रयोग सादर केला. त्यामध्यें सवाई माधवराव–त्रिंबकराव कारखानीस, यशोदा–माधवराव टिपणीस, आवडी–विनायकराव प्रधान, केशवशास्त्री–गणपतराव भागवत, नाना फडणवीस–यशवंतराव टिपणीस अशी प्रमुख पात्रयोजना होती. १९०७ साली केशवराव दाते यांनी कंपनींत प्रवेश केला तेव्हा त्यांनीं प्रथम आवडीची भूमिका केली. पुढें कांही दिवस यशोदेची भूमिका केली. मात्र १९१३ पासून ते केशवशास्त्र्यांचें काम करूं लागले. केशवशास्त्र्यांचें काम त्यांनी भागवतांच्या भूमिका पाहून आपल्या मनानेंच बसविलें, मात्र पुढें कांही दिवस त्यांना कारखानिसांनी अभिनयाचे कांहीं धडे दिले. महाराष्ट्र मंडळी वारंवार या नाटकाचे प्रयोग करीत नसे. क्वचित कधी अन्य नाटकांबरोबर याचेहि प्रयोग होत, पण केशवराव दाते महाराष्ट्र नाटक मंडळींतून निघून गेल्यावर मात्र प्रयोग बंदच पडले.

त्यानंतर मुंबई येथें १९४६ सालच्या नाटय महोत्सवांत तें केशवराव दाते यांच्या दिग्दर्शनाखाली मराठी साहित्य संघातर्फे सादर केलें गेलें. एकंदरीत या नाटकाचें स्वागत आजवर कधीच नीट झालेलें नसतां श्री. केशवराव दाते हें नाटक पुन्हा नव्या उत्साहानें रंगभूमीवर कां आणीत आहेत हा प्रश्नच आहे. यासंबंधी त्यांनीच केव्हातरी आपला विचार लोकांसमोर मांडला तर नाटयप्रेमी जनतेला तो मार्गदर्शक ठरण्याचा संभव आहे.


र. नं. ६२१७ ] जय सहकार [ र. ता. १९-२-१९५९

आडत व्यवहार, शेतकऱ्याला मालतारणावर कर्ज देणें, शेतीची अवजारें, स्प्रे पंप्स, पेण्ड, मिश्रखतें व कीडनाशक औषधें पुरविणारी...

# दि वैजापूर को-ऑप.

## मार्केटिंग सोसायटी लि.

* मु. पो. वैजापूर, जि. औरंगाबाद *

शाखा :– लासूर स्टेशन, ता. गंगापूर ● सभासद संख्या ८३५ ● शेअर भांडवल रु. २९,००० ● रिझर्व फंड व इतर फंड रु. २८,००० ● इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल रु. ९,२९२ ●

– मॅनेजर –
श्री. टी. जी. रामैया
बी. कॉम्.

– चेअरमन –
श्री. बी. एम्. पाटील
बी. ए. एल्.एल. बी.

# नागपूरचें ४४ वें नाट्य-संमेलन

# कांही विचार

—एक प्रतिनिधि

दि. २१ आणि २२ एप्रिल रोजीं मराठी नाटय परिषदेचें ४४ वें समेलन नागपूर येथे पार पडलें. तें यशस्वी झालें अशी नागपूरकराची भावना आहे. वर्तमानपत्रांतूनहि तशा अर्थाचे सूर निनादले. पण संमेलनाबाबत ज्या घटना घडल्या त्याचा इतिहास मात्र नाटयाप्रमाणे चमत्कृतिपूर्ण आहे.

गेल्या वर्षी श्रीमती दुर्गाबाई खोटे याच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे संमेलन पार पडलें. परतु त्या समेलनाच्या अध्यक्षपदासाठी नांवें सुचविण्याची घटा ज्यावेळेस वाजली तेव्हा श्री. नानासाहेब चापेकर याचें नांव रीतसर आले होतें. परंतु ऐनवेळी दुर्गाबाईंचें नांव सुचविलें आणि समेलनाचे अध्यक्ष बिनविरोध निवडून यावेत अशा खटपटी सुरू झाल्या. नाटचपरिषदेच्या शाखांमध्ये आपपर भाव नाही. हें सुचविण्यासाठी नानासाहेबानी आपलें नाव उदारमनाने मागे घेतलें.

नागपूर समेलनाचेवेळीं नानासाहेबानी अध्यक्षपदासाठीं नांव दिलें. याच बरोबर पुण्याचे एक उमेदवार आणि खुद्द नागपूरचेच एक उमेदवार त्यासाठी उभे राहिले. वास्तविक ज्या ठिकाणीं समेलन भरावयाचें तेथील किंवा त्या गावाजवळील अध्यक्ष सहसा निवडत नाहीत असा अलिखित प्रघात आहे. हासुद्धा पाळला गेला नाही. सभासदांकडून मतपत्रिकाही परत मागविण्याची मुदत अल्प ठरली गेली. त्यामुळे प्रचाराला वेळ फारच कमी मिळाला, पण अखेर नानासाहेब निवडून आलेच. अर्थात अध्यक्षपदासंबंधीची पूर्वघटना नागपूरकराना अगोदर कळविली होती; पण त्याची दखल त्यानी घेतली नाही. तशा आशयाचें पत्र पाठवूनहि त्यांचेकडून काहींच उत्तर आलें नाही. यामागील एक घटना अशी वाटते कीं, नानासाहेबाविरुद्ध उभें राहाण्यासाठी नागपूरकरांकडून एका फार मोठ्या व्यक्तीला गळ घालण्यांत आली होती. परतु त्यानी ती नाकारल्यामुळे कदाचित् नाखुषीने नानासाहेबाचें अध्यक्षपद शर्करावगुठित क्विनाईनच्या गोळीसारखें पत्करावें लागलें असावें.

नागपूरकरानी एप्रिलच्या ७।८ तारखांना संमेलन भरणार असल्याबद्दल पूर्वी जाहीर केलें होतें. स्वागताध्यक्षपदी मा. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण याचेहि नांव सुचविण्यात आलें होते. परंतु ऐन वेळीं समेलन पुढे ढकलण्यात आलें आणि मुख्यमंत्री यशवतरावजी याना येणें अशक्य झाले. तीच गोष्ट प्रतिनिधींची ! त्यांनीहि पूर्वनियोजित तारखांना वेळ रिकामा ठेवला होता, पण त्यांचाहि विरस झाला.

समेलनांत प्रदर्शन, परिसंवाद, नाटचप्रयोग आदी अंगोपांगावर नागपूरकरांनी भर दिला. सर्व सोपस्कार त्यांनी व्यवस्थित पार पाडले, तरी एक गोष्ट विशेष आढळली ती हीच की, या परिसंवादादि गोष्टींना प्रेक्षकांची उपस्थिति बऱ्यापैकी असली, तरी त्यामध्ये नाविन्य फारच थोडें आढळलें. किंवा पर्यायाने असें म्हणावेसे वाटतें की, त्यांत इतिहासाची पुनरावृत्तीच अधिक झाली ! त्यात भाग घेणाऱ्यानी निश्चित स्वरूपांत जरी काही सागितले नसले तरी मांडणीचा दृष्टिकोन किंवा ऐकताना विचाराला कांही नवीन प्रवाह मिळावा अशी जी इच्छा असते ती कितपत फलद्रूप झाली हा विचार मनांत डोकावून जातोच ! परिसवाद चाकोरीसोडून मुळीच बाहेर पडले नाहीत. त्यातील विचारांची व्यवहारात सागड कशी घालतां येईल हा प्रश्नच आहे.

## नागपूकरांची सौजन्यशील वागणूक

कार्यकारिणीची बैठक, विषयनियामक समितीची बैठक आणि वार्षिक सर्वसाधारण सभा या गोष्टी औपचारिकरित्या उरकण्यांत येतात. वास्तविक विषयनियामक समितीची बैठक ही तर समेलनाचा प्राणच! नाटचअभ्यासू प्रतिनिधींना आणि ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांना प्रेरक असा भाग हाच ! पण तो इतका झर्रदिशी उरकला गेला कीं, ठराव माडणारे आणि अनुमोदक यांनाच त्यांचा ठराव माहीत.

समेलनासाठी नाना ठिकाणाहून प्रतिनिधि येत असतात. त्यामध्यें विशेष करून निष्ठावंत आणि चोखदळ प्रतिनिधीच अधिक असतात. आपण काय केलें, दुसऱ्यानें काय केलें, नवीन काय करता येईल किंवा आपण कुठें उभे आहोत याची कल्पना येण्याचे दृष्टीने प्रतिनिधि मोठ्या उत्साहानें जात असतात. सरावलेले प्रतिनिधी चर्चेंत अहमहमिकेने भाग घेतात, ओळखी करून घेतात, विचारांची देवाण-घेवाण करतात. परंतु जे नवीन असतात ते मात्र बुजतात. त्याचा हा बुजरेपणा घालविण्याचें काम असतें स्वागत मडळाचें. परंतु नागपूरला परस्पर परिचयाचे काम समेलनाच्या अखेरीस झालें. आणि कां कोण जाणें, नागपूरकरांचा परिचय जसा व्हायला हवा होता तसा काहीं झाला नाही. आणि याची जाणीव उभयपक्षी जाणवली. बाकी नागपूरकरांनी प्रतिनिधींचें आदरातिथ्य वगैरे व्यवस्थित करून त्यांच्या भोजनाची वगैरे व्यवस्था चोख ठवली होती. त्यांच्या सौजन्यशील वागणुकीचा विसर पडेल असे चुकूनदेखील वाटत नाही.

नव्या कार्यकारी मंडळाच्या निवडीत नाटचप्रेमी लोकच अधिक दिसतात. नाटचासबंधी काही झाल पाहिजे हीच त्याची सदिच्छा असते. मात्र व्यवहारात त्या गोष्टी उतरणें कठीण जाते. हे लोक निरनिराळ्या ठिकाणचे असतात. आणि त्यांतील बहुतेक सर्वजण व्यक्तिगत कार्यांतच गुतलेले असतात नाटच या विषयावर विचार करावयास त्याना वेळच नसतो. फावल्या वेळांतील नाटचसेवा ही अशीच !

मध्यवर्ति मंडळाची एकसारखी हाकाटी चालू असते की, सभासद-संख्या वाढवा आणि संस्था बळकट करा ! आणि सर्वसाधारणपणें दरवर्षी सभासद वाढतहि असतात. परंतु त्यामध्यें जेथें संमेलन भरावयाचें तेथील स्थानिक मंडळीच सभासद झालेली दिसतात. आधींच्या सभासदांची संख्या मात्र कमी असते. याला कारण एकच व तें म्हणजे मध्यवर्ति संस्थेकडे आकर्षक असा दुसरा कोणताच कार्यक्रम नसतो. हें झालें सर्वसाधारण सभासदांबावत ! मध्यवर्ति सभासद म्हणून एक प्रकार असतो आणि तो मराठी नाटचपरिषदेशी संलग्न असतो. परंतु संस्था–सभासद काय किंवा शाखांमध्येंहि एकसूत्रीपणा आढळून येंत नाही. मध्यवर्ति संस्थेनें शाखांना कांही आदेश दिले पाहिजेत, निदान वर्षाचा कार्यक्रम तरी दिला पाहिजे. पण यांपैकी कांहीच घडत असल्याचें दिसत नाही. फक्त सभासद वाढवा आणि शाखा स्थापन करा, हाच एक आदेश सातत्यानें मिळत असतो. काम वाढविण्याची मध्यवर्ति मंडळाची सूचना स्तुत्य आहे. परंतु त्याचें नियंत्रण, मार्गदर्शन किंवा कार्यक्रम मध्यवर्ति मंडळाकडे नाहीत असेंच म्हणावेसें वाटतें.

मध्यवर्ति मंडळाकडून कांही मार्गदर्शन झालेलें नसल्यानें शाखा आपल्या मगदुराप्रमाणें कांही कार्य करीत असतात. त्यांत एका शाखेचा दुसऱ्या शाखेला पत्ता नसतो, अशीं उदाहरणेंहि दाखवून देतां येतील. या सर्व गोष्टींकडे त्रयस्थ म्हणून पाहिलें तर हा सगळाच कारभार अनागोंदी किंवा यदृच्छया झाल्यासारखा वाटतो.

१९०५ साली नाटचसंमेलनाला सुरुवात झाली त्यावेळीं या संमेलनाची कल्पना लढविणारे अनंत वामन बरवे यांनी जी पद्धति सुरू केली तीच आजहीं चालू आहे. अजून नाटचपरिषद प्रयोगावस्थेंत आहे असें मोठ्या खेदानें म्हणावेसें वाटतें. त्यावेळची निबंधस्पर्धा आणि नाटक मंडळ्यांतील मुलांची सुधारणा कशी करावी या विषयावर चर्चा होत असेल तर थोड्याफार फरकानें आज तसाच प्रकार दिसून येईल. थोडक्यांत म्हणजे इतकीं वर्षें झालीं तरी नाटचसंमेलन भरविणाऱ्या मध्यवर्ति संस्थेची परिस्थिती पूर्वी जशी होती तशीच आजहि आहे असें म्हणावयास हरकत नाही.

मध्यवर्ति संस्था आपली दोन नवीं प्रकाशनें ' सरकार आणि रंगभूमीं ' किंवा नाटच संमेलनाची माहिती देणारा इंग्रजी मराठी ग्रंथ यांचा उल्लेख करून कार्याची माहिती पटविण्याचा प्रयत्न करील. पण आज त्याचा किती उपयोग आहे ?

दरवर्षींच्या नाटचसंमेलनांत जे ठराव पास होतात त्यांची कांहीच दखल घेतलेली दिसत नाही, तर ते दप्तरीं पडून राहातात. त्यांची एकदां छाननी होणें अत्यावश्यक नव्हे काय ? साताऱ्च्या संमेलन प्रसंगीं श्री. बाबूराव पेंढारकरांनी एक त्रैवार्षिक योजना मांडली होती त्याचें पुढें काय झालें हें समजत नाही. अशा अनेक गोष्टी आहेत. यासाठी मध्यवर्ति मंडळांतील सदस्यांच्या अंगीं कार्याची तळमळ हवी. ती आज कोठेच दिसत नाही.

सध्या चालू असलेल्या गोष्टींकडे एक नजर टाकली तर नवीनें तरुण, हौशी कार्यकर्त्यांची दिशाभूल होत असल्याचें दिसून येईल. नवीन विचार मिळतील ह्या भावनेनें नवे लोक येतात पण संमेलनांतील कारवाईमुळें त्यांच्या पदरीं निराशाच येते. मध्यवर्ति संस्थेकडून कोणतेंहि मार्गदर्शन त्यांना होत नाहीं.

एकंदरीत नाटचसंमेलनाला आलेलें उत्सवाचें स्वरूप पालटून ती एक शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रतिनिधि संस्था आहे हें सिद्ध करण्यासाठी नुसतें राजकारण करीत न बसतां निरलसपणें आणि निष्ठेनें कार्य करण्याची उमेद बाळगली पाहिजे. नटवर्य दाते, के. नारायण काळे यांच्यासारखे अनुभवी मार्गदर्शक जी मदत देण्यास, मार्गदर्शन करण्यास तयार आहेत त्यांचा फायदा घेतला तर नाटचपरिषदेवर जे आक्षेप आज घेतले जात आहेत ते तसे घ्यावयास वाव मिळणार नाही.



• विना सहकार नहि उद्धार •

शेतकऱ्यांना कर्ज पुरविणें, शेतीला लागणारी अवजारें, स्प्रे पंप्स, खतें, पेण्ड व सल्फेट पुरविणें, शेतकऱ्यांना इंजीन्स व इंजीन तेलें पुरविणारी ' अ ' वर्गीतील...

नांदुर्खी विविध कार्यकारी

• सेवा सहकारी सोसायटी लि. •

• मु. पो. नांदुर्खी ( बु. ), जि. अ. नगर •

• सभासद संख्या ११८ • शेअर भांडवल रु. ५०,००० रिझर्व व इतर फंडस् रु. ५,००० • इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल रु. १५,००० • एकूण उलाढाल रु. २,२५००० •

— सेक्रेटरी — श्री. म्हाले.

— चेअरमन — श्री. शिवराम पाटील चौधरी.

समाज प्रबोधन संस्था

१२४२, सदाशिव पेठ, पुणें २.

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २·६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·६० |

# पोतडी

रमेश के. सहस्रबुद्धे

## आईचा मोठेपणा

तीं दोन लहान मुलें एकमेकांना आपल्या आईचा मोठेपणा सांगत होतीं. बराचवेळ त्यांचा हा कार्यक्रम चालू होता. त्यांतील एक मुलगा सरतेशेवटीं दुसऱ्याला म्हणाला, "अरे माझी आई, कित्ती ऽ कित्ती ऽऽ हुशार आहे म्हणून सांगूं ! तिला किनई कोणत्याहि विषयावर वाटेल तेवढा वेळ बोलतां येतें. समजलं ?"

इतकें आपल्या आईचें श्रेष्ठत्व सिद्ध केल्यावर मोठ्या रुबाबांत त्याने दुसऱ्या मुलाकडे पाहिलें. आपली आई त्याच्यापेक्षा जास्त हुशार असल्याचें आपण सिद्ध केलें यावरच स्वारी खूष होती.

पण दुसरे चिरंजीव कांही कमी नव्हते. आपली आई पहिल्याच्या आईपेक्षा हुशार आहे हें सिद्ध करण्याकरितां तो म्हणाला, "बस्स ऽऽ ! एवढंच ! यांत काय मोठं ? अरे, माझी आई किनई यापेक्षा खूपच हुशार आहे. कारण ती कोणताहि विषय नसतांना वाटेल तेवढा वेळ बोलते !"

●●●

## नकली हस्तिदंत

आपण कालच विकत घेतलेले हस्तिदंत घेऊन रामभाऊ रागानेच हस्तिदंताच्या व्यापाऱ्याकडे गेले व म्हणाले, "भले ! अरे तूं मला हें जें काल हस्तिदंत म्हणून दिलेंस तें नकली हस्तिदंत आहे असें माझ्या जाणकार मित्राने मला सांगितलें. चांगलेंच फसवितां की तुम्ही !

"कोण जाणे बुवा" दुकानदार म्हणाला. "मीं तर हत्तीचेच दात आणले होते. हां, पण जर हत्तीनेंच नकली दात लावले असतील तर त्याला मात्र माझा नाईलाज आहे."

●●●

## रिक्रूटभरतीचा पोलिस

पोलिसांत नवीनच भरती झालेल्या शिपायांस हवालदार म्हणाला, "अरे गाढवा ! लवकर आटप परेडला उशीर होईल ना ?"

"पण माझा पट्टा अजून सापडत नाही हो !" नवीनच भरती झालेला तो पोलिस हवालदारास म्हणाला.

"हात वेडचा ! अरे तो तर तुझ्या कमरेलाच आहे" इति हवालदार,

"बरं झालं हवालदारसाहेब; तुम्हीं मला सांगितलंत म्हणून; नाहीतर मी आपला पट्ट्याशिवायच परेडला गेलों असतों" बावळटासारखा चेहरा करून गंभीरपणें तो शिपाई उत्तरला.

●●●

## कांही मजेशीर व्याख्या

**असूया** :—दोन स्त्रियांमधील मैत्री.

**मुत्सद्दी** :—लुच्चा माणसाचा गौरव करतांना त्याला लावलेलें विशेषण.

**दंतवैद्य** :—स्त्रियांना हवें तेव्हां तोंड उघडावयास अगर बंद करावयास लावणारा वीर.

**उपदेश** :—शहाण्यांना ज्याची आवश्यकता भासत नाही आणि मूर्ख जो मानीत नाहीत तो.

**न्याय** :—आपल्यासारखा निकाल लागला म्हणजे मिळतो तो.


**ओळखीचा माणूस** :—पैसे उसने घेण्याइतकी ज्याच्याशी आपली ओळख असेल, परंतु पैसे उसने देण्याइतकी नसते तो.

**अनुभव** :—तुमची अपेक्षा नसतांना पदरीं पडणारा.

**वगैरे वगैरे** :—आपल्याला येतं आहे, त्यापेक्षां कितीतरी अधिक अवगत आहे असं इतरांना भासविण्याचं साधन.

●●●

## रेडिओ ऑक्टेव्ह मुलें



डॉ. शरद अभ्यंकर

## भारत–विंडीज सामने

# बचेंगे तो और भी लढेंगे

रा. म. शास्त्री

वेस्ट इंडीजला जाणाऱ्या भारतीय खेळाडूंचीं नांवें जेव्हा जाहीर झालीं तेव्हा प्रथमच सर्वत्र समाधान व्यक्त होण्याचा योग आला. इंग्लंड विरुद्ध झालेल्या सामन्यांत सुरतीसारख्या खेळाडूला पांचहि सामन्यांतून वगळण्यांत आलेलें असल्यामुळें त्याची निवड होते किंवा नाही, अशी शंका होती. परंतु सुरतीचीहि निवड झाली. फक्त सुभाष गुप्तेला वगळण्यांत चूक झाली अशी क्वचित टीका झाली.सुप्रसिद्ध क्रीडा टीकाकार तल्यारखान यांनी भारताच्या आघाडीच्या जोडीसाठी अरविंद आपटे यांच्या नांवाची 'टाईम्स' पत्रांतून सतत चालवलेली भलावणही दुर्लक्षित करून कॉन्ट्रॅक्टरच्या जोडीस आघाडीचा राखीव जोडीदार म्हणून विजय मेहराला निवडण्यांत आलें. या निवडी बाबतहि सुधाकर अधिकारीवर अन्याय झाला, अशी रास्त टीका कांही ठिकाणीं झाली. तरीहि एकंदरीनें पाहतां वेस्टइंडीजला निघालेला संघ आजवरच्या परदेशांत गेलेल्या कुठल्याहि संघापेक्षा प्रबळ नसला तरी अधिक बांधेसूद होता हें निश्चित.

कॅरेबियन् बेटांत पाऊल स्थिरावल्यावर लगेचच सरदेसाईने शतक ठोकलें आणि पतौडी की सरदेसाई ही बाब इतिहासजमा करून आपली जागा कसोटी सामन्यांत नक्की केली.

### पहिली सलामी

दि. १६ फेब्रुवारीला पहिला कसोटी सामना पोर्ट ऑफ स्पेन म्हणजे त्रिनिदादला होता. दि. १६ ला अशी बातमी आली की, कसोटी सामन्यांत, पतौडीचे नवाब, जयसिंह, मेहरा, आणि वसंत रांजणे खेळतील की नाही, याबाबत शंका आहे. रांजणेचा डावा हात दुखावला होता, जयसिंह आणि मेहरा आधींच्या सामन्यांत जखमी झाले होते आणि पतौडीच्या नवाबांना पायांत लचक भरली होती. जयसिंह आणि मेहरा दोघे सामन्यांतून बाद झाले तर कुंदरमचा समावेश अटळ होता. रांजणे खेळूं शकला नाही तर उम्रीगरची जबाबदारी वाढणार हें निश्चित होतें. वेस्टइंडीजचीं जीं नांवें प्रसिद्ध झालीं होतीं त्यांत रॉड्रिग्यू, वॉटसन्, हॉल, आणि स्टेअर्स या द्रुतगति गोलंदाजांचा भरणा होता शिवाय गिब्ज, वॅरेल आणि सोबर्स या मंदगति गोलंदाजांचें ऑस्ट्रेलिया विरुद्धचें यश हिंदी संघाला वचक दाखवीत होतेंच. चेस्टर वॉटसन् किंवा स्टेअर्स यांच्यापैकी अेकाला वगळून रॉड्रिग्यू या त्रिनिदादच्या खेळाडूलाच संघांत घेतलें जाईल असें वाटत होतें, परन्तु दि. १६ फेब्रुवारी उजाडला आणि भारताच्या दुर्दैवानें जयसिंह, रांजणे, आणि पतौडीचे नवाब सामन्यांत भाग घेऊं शकत नाहीत हें जाहीर झालें. मात्र मेहरा खेळूं शकत असल्यामुळें कुंदरमचा समावेश न होतां भारतीय संघ जाहीर झाला तो असा– कॉंट्रॅक्टर, मेहरा, मांजरेकर, सरदेसाई, उम्रीगर, बोर्डे, दुराणी, नाडकर्णी, इंजिनिअर देसाई, आणि सुरती. वेस्टइंडीज्नें रॉड्रिग्यूला वगळून स्टेअर्स, वॉट्सन्, हॉल, यांनाच पाचारण केलें.

### आघाडींतच खिंडार

दि. १६ फेब्रुवारीचा दिवस मावळला तेव्हां भारताच्या पहिल्या डावांत सहा गडी बाद होऊन धावसंख्या फक्त ११३ झालेली होती. नाणेफेंक कॉंट्रॅक्टरनें जिंकली आणि फलंदाजी पत्करली. आदल्या दिवशीं रात्रीं जरी पाऊस पडला होता, तरी हिरवळ झांकण्याचें आधीं ठरल्यामुळें कॉन्ट्रॅक्टरचा निर्णय योग्यच होता असें दिसतें.नाणेफेंक जिंकून उभय कप्तान तंबूंत परततात तोंच पाऊस सुरू झाला. ठरलेल्या वेळेपेक्षां पंचवीस मिनिटें उशीरा, अखेर वॅरेलनें क्षेत्ररक्षण रचलें. भारताची आघाडीची जोडी– कॉंट्रॅक्टर आणि मेहरा खेळावयास आली. हॉलनें सहा खेळाडूंचें कडें कॉन्ट्रॅक्टरमागें रचून गोलंदाजीचा मारा सुरू केला. पहिल्याच चेंडूवर कॉंट्रॅक्टरनें एक धांव घेतली. दुसऱ्या बाजूनें वॉटसननें गोलंदाजी सुरू केली. त्यानें स्लिपमध्यें चार खेळाडू-एका ओळींत आणि दोन लेगच्या बाजूस रचले होते. धांवसंख्या सात झाली असतां हॉलनें भारताच्या आघाडींत खिंडार पाडलें. हॉलचा चेंडू मेहरानें अडवण्यासाठीं बॅट पुढें केली मात्र, त्याच्या हॅंडलला चाटून चेंडू जो उडाला तो यष्टिरक्षक हेंड्रिक्सच्या हातांत जाऊन चपखल बसला. मांजरेकरनें मेहराची जागा घेतली आणि कॉंट्रॅक्टर आणि मांजरेकर यांनीं हॉल, वॉटसनच्या तुफानी माऱ्यावर थोडाफार कबजा बसवला. तोंच वॅरेलने चार षटकानंतर काढून घेतलेल्या हॉलकडे पुनः चेंडू दिला. एकावेळीं तीन–चार षटकेंच द्रुतगति गोलंदाजांना द्यावयाचीं असें वॅरेलचें धोरण स्पष्ट झालें होतें. या दुसऱ्या फेरींत हॉलनें अपेक्षेप्रमाणें कॉंट्रॅक्टरचा बळी घेतला. त्याचा एक चेंडू अनपेक्षितपणें वर उडाला आणि कॉंट्रॅक्टरनें अनवधानपणें सोबर्सच्या हातीं झेल दिला. सरदेसाई आला आणि त्यानें आशा निर्माण केली. मांजरेकर-सरदेसाई जोडी नीट जपून खेळूं लागली. मांजरेकरनें स्टेअर्सला दोनदां सीमेपार पाठवलें होते, पण धावसंख्या ३८ असतांनाच स्टेअर्सचा त्यानें फटकावलेला चेंडू फिरकी घेऊन उलट फिरला आणि विकेटवर आदळला. मांजरेकरहि बाद झाला आणि धांवसंख्या फक्त ३८. उम्रीगर खरें पाहतां अनेक सामनें खेळलेला खंदा फलंदाज, पण त्यानें हॉल-स्टेअर्सच्या उशी घेणाऱ्या चेंडूंना घाबरून डोकें खालीं वाकविण्यास सुरुवात केलेली पाहून भारताचीं लक्षणें ठीक नाहींत हें लगेच दिसून आलें. वॉटसन्च्या

गोलंदाजीवर उम्रीगरनें दिलेला अत्यंत कठीण झेल सोबर्सनें पकडला आणि उम्रीगर फक्त दोन धांवा काढून तंबूंत परतला चार गडी बाद अठ्ठेचाळीस !

दि. १७ ला सकाळीं वृत्तपत्रांतून मथळे आले, "कसोटी सामन्यांत भारताची घसरगुंडी.! हॉलनें उडविलेला धुव्वा ! " वस्तुतः हॉल, वॉट्सन्, स्टेअर्स, या तिन्ही गोलंदाजांनीं भारताची दाणादाण उडवलेली होती.

उपहाराच्या वेळीं धांवसंख्या ४९ असून सरदेसाई व बोर्डे नाबाद होते. उपहारानंतर सरदेसाईनें धावसंख्या वाढवण्यास सुरुवात केली. जरी वॉट्सनच्या आदल्याच षटकांत चेंडू कट् करण्याच्या प्रयत्नांत बोर्डेचा शून्यावरच उडलेला झेल सोबर्सनें सोडला होता तरीहि सरदेसाईनें तीच चूक केली. त्यानें हॉलला तीनदां सीमेपार करून थोडा आत्मविश्वासपूर्ण खेळ नुकताच कुठें सुरू केला होता. त्यानें आता स्टेअर्सचा चेंडू कट करण्याच्या प्रयत्नांत सॉलोमनच्या हातीं स्लिप्मध्यें झेल दिला. यानंतर आलेल्या दुराणीच्या मदतीनें बोर्डेनें कांहीं उत्कृष्ट कव्हर ड्राइव्हज करून धावसंख्या शंभराच्या पुढें रेटली, पण त्याच्या फक्त १६ धांवा झाल्या असतांना ज्या पद्धतीनें सरदेसाईचा बळी घेतला त्याच पद्धतीनें स्टेअर्सनें बोर्डेचा बळी घेतला. त्याचा झेल गिब्सनें घेतला. सुरती-दुराणी जोडी अधूनमधून धांवा वाढविण्याच्या उद्योगांत थोडीफार यशस्वी झाली आणि पावसामुळें दोन तास खेळ लवकर थांबला, तेव्हां भारताच्या सहा गडी बाद ११३ धांवा झाल्या होत्या.

याचा अर्थ जरी गडी बाद होत होते तरी धांवांचा ताशीं वेग भारतानें चांगला राखला होता असाच होतो.


### सुरती–दुराणींची करामत.

दि. १७ ला सकाळीं सुरती-दुराणी या डावखुऱ्या फलंदाजांनीं फटकेबाजी करून भारताच्या धांवसंख्येंत आणखी ५७ धांवांची भर घातली. भारताची सातवी विकेट १७० धांवांवर पडली. दुराणीनें ६५ धांवा काढल्या आणि सुरतीनें ६७ धांवा केल्या. दुराणीनंतर आलेला भरवशाचा फलंदाज नाडकर्णी धांवचीत झाला आणि इंजिनिअर-सुरती ही जोडी अधिक कांहीं करील ही आशाहि सुरती बाद होतांच मावळली, दुराणीचा झेल सोबर्सनें स्वतःच्या गोलंदाजीवर घेतला. तर इंजिनिअरला गिब्जनें फसविलें. सुरतीचा बळीहि सोबर्सनेंच घेतला.याचा अर्थ भारताच्या आघाडीत हॉलनें खिंडार पाडलें. स्टेअर्स, वॉटसन या दोघांनीं त्यांचें कंबरडें ढिलें केलें आणि सुरती–दुराणीनें थोडावेळ घातलेला धुमाकूळ, मंदगति गोलंदाज सोबर्स आणि गिब्ज यांनी लौकरच संपुष्टांत आणला. भारताच्या पहिल्या डावांत फक्त २०३ धांवा झाल्या.

### भारताची चढाई

दुपारीं क्षेत्ररक्षणासाठीं भारतीय संघ पुन्हा बाहेर आला,तेव्हां वेस्ट इंडीज खेळाडूंना कल्पना तरी असेल का कीं, भारताचें झालें तेंच वेस्ट इंडीज्चेंहि होणार होतें म्हणून ? भारताची पहिली विकेट सातावर पडली तर देसाईनें कॅमी स्मिथला धावसंख्या फक्त तेरा असतांना तंबूंत परत पाठविलें. भारताची दुसरी विकेट ३२ ला पडली तर धावसंख्या फक्त ३७ असतांना कन्हायचा झेल स्वतःच्या गोलंदाजीवर घेऊन बोर्डेनें, सॉवर्स–हंटला सावध करून ठेवलें. सॉबर्स–हंट या जोडीनें धावसंख्या १३६ पर्यंत रेटली आणि दुराणीनें हंटला स्वतःच्या गोलंदाजीवर झेलबाद

## आघाडीवरून परत




डॉ. शरद अभ्यंकर

करून दुसऱ्या घसरगुंडीची नांदी केली. पाठोपाठ सोबर्सचा चाळीस धावसंख्येवर उम्रीगरनें त्रिफळा उडवला. चार गडी बाद १३९. हॉलला दुराणीनें येतां क्षणींच चकवलें आणि त्याच्या फिरत्या चेंडूला वॉरेलनें स्पर्श करतांच सुरतीनें लेग स्लिपला त्याचा झेल घेतला. पांच बाद १४०. एवढ्या घातपातानंतर सालोमन–स्टेअर्स ही जोडी जपून खेळूं लागली. क्षेत्ररक्षण बॅटीच्या टप्प्यांत यावें इतकें जवळ सरकलें होतें. दिवस मावळत आला होता. आणखी एखादी विकेट हवी होती. शेवटचें षटक टाळण्याकरतां चेंडू दुराणीकडे आला. सगळे क्षेत्ररक्षक सरसावले आणि चंदू बोर्डेनें मिड ऑफला स्टेअर्सचा झेल अचूक टिपला. सहा बाद १४८ आणि दुसरा दिवस मावळला.

भारतानें २०३ धावसंख्या मोठी वाटावी अशी परिस्थिति आतां निर्माण केली होती. १४९ धावांत वेस्टइंडिजचे हंट, स्मिथ, कन्हाय, वॉरेल, सोबर्स, सालोमन एवढे खंदे वीर दुराणी, देसाई बोर्डे–उम्रीगरनें संपविले. खालीं तर उरले होते. बहुसंख्य गोलंदाज. हॉल, वॉटसन, गिब्ज आणि हेंड्रिक्स. हा हेन्ड्रिक्स कसा काय आहे, कुणास ठाऊक ! हॉल प्रसंग पडलातर ४०–५० धावा काढतोच असा अनुभव होता, पण न जाणो दुराणी–बोर्डेचे चेंडूच फार वळत असले तर वेस्टइंडीज संघ १७० धावांत गुंडाळला जाईल अशी आशा दुसऱ्या दिवशींच्या शेवटी निर्माण झाली होती. पारडें भारताकडे झुकलें होतें.

### हेंड्रिक्स–संप्रति नवा !

दि. २० फेब्रूवारीला सकाळीं वृत्तपत्रांत मथळा वाचला–वेस्ट इंडीजला ८६ धावांची आघाडी ! हेंड्रिक्स–हॉल यांची मोलाची भर.

**द्रुतगति गोलंदाजीवर उपाय**




डॉ. शरद अभ्यंकर

अपेक्षेप्रमाणें हा हेन्ड्रिक्स सोम्यागोम्या ठरलेला नव्हता. सणसणीत ६४ धांवा काढून तो सर्वांत शेवटीं बाद झाला होता आणि हॉलनें त्याच्याबरोबर स्वतःच्या ३७ धांवा काढून खूप ठोकाठोक केलेली दिसली. आठवी विकेट २१७ वर पडली आणि हेंड्रिक्स– हॉलच्या जोडीनें नवव्या विकेटसाठीं ७० धांवांची भर घातली होती. त्यापूर्वीं सालोमननें ४३ धांवा काढल्या होत्या.

हा हेंड्रिक्स–एक बोट प्लॅस्टरमध्यें खालून खेळत होता बरं का ! त्यानें आणि सॉलोमननें, भारताचे जोडी लगेच फोडण्याचे सारे प्रयत्न सामन्याच्या तिसऱ्या दिवशीं विफल केले. हेन्ड्रिक्सनें काढलेल्या या ६४ धांवा हा या सामन्यांतला सर्वांत उत्कृष्ट खेळ होय. त्यानें भारताला नामोहरम केले. हॉलला–षट्कार, चौकार हाणण्यासाठीं मोकळें ठेवलें व एक टोक घट्ट धरून ठेवलें. हॉलनें दुराणीच्या चेंडूवर षट्कार मारलाच.

धांवा दोनशेवर गेल्या तेव्हां कॉंट्रॅक्टरनें चेंडू देसाईकडे दिला आणि २१२ धांवसंख्या असतांना सॉलोमनचा झेल इंजिनिअरनें घेतला, पण त्यानंतर आलेल्या हॉलनें फारच धमाकूळ घातला. अखेर हेंड्रिक्स बाद झाला. गिब्ज बाद झाला. वॉटसन बाद झाला, पण हॉल मात्र नाबाद राहिला. ८६ धांवांची आघाडी त्यानें वेस्ट इंडिजला मिळवून देण्यांत महत्त्वाचा वांटा उचलला आणि पुनः यशाचें पारडें वेस्ट इंडिजकडे कललें. हा हॉल हन्त !

वेस्ट इंडिजचा पहिला डाव आटोपला तेव्हां आपण केलेली नेत्रदीपक कामगिरी पाहून संतोष मानायला हॉल तयार नव्हता. तिसरा दिवस मावळतांना त्यानें भारताची पुनः पांचावर धारण बसवली.

तीच बकरी आणि तेच वाघ ! धांवसंख्या फक्त सहा असतांना त्यानें कॉंट्रॅक्टरची लेग स्टंप उखडली. त्याच्या दुसऱ्याच चेंडूवर मांजरेकर मागें खेळण्याच्या प्रयत्नांत बॅटसह स्टंपवर आदळला. सरदेसाई आला आणि त्यानें हॉलची हॅट्रिक चुकवली. उलट त्यानें दोन धांवाहि काढल्या, पण हॉलनें सरदेसाईला आणखी खेळूं दिलें नाहीं. पुढच्याच चेंडूवर त्याचा उडालेला झेल कॅमिस्मिथनें घेतला. १ बाद ६, २ बाद ६, ३ बाद ८. उम्रीगर आला आणि त्यानें आणि मेहरानें पंचवीस-सव्वीस धांवांची भर घातली. मेहरा–जवळ जवळ खेळत नव्हताच. अधून मधून एखादी

धांव काढून त्यानें कशाबशा आठ धांवा केल्या असतानाच स्टेअर्सनें स्वतःच्या गोलंदाजीवर त्याचा झेल घेतला. चार बाद पस्तीस. बोर्डे–उम्रीगर या जोडीनें तिसऱ्या दिवशी अखेरपर्यंत कशी तरी तग धरली. खेळ सपला, तेव्हा उम्रीगर २१ व बोर्डे ३ धावा काढून नाबाद होते. धांवसंख्या होती ४९.

पहिल्या दिवशीं धांवतंख्या कानीं आली होती ती ४ बाद ४९ आणि पुन्हां दुसऱ्या डावांत ४ बाद ४९ ! पण कुणीं सागावें ? पहिल्या डावात सुरती-दुराणीचा चमत्कार पुन: घडेलहि. उम्रीगर खेळतो आहे. नाडकर्णी काय पुन: धावबाद होईल ? धावसख्या निदान पुन: दोनशे खास ओलाडली जाईल. आणि कदाचित् दुराणी-बोर्डे वेस्टइंडिजचा दुसऱ्या डावात पुरता फज्जाहि करूं शकतील.

पण कसलें काय आणि कसलें काय ! ४९ ला चार बाद या दरांत धांवा निदान शंभर तरी व्हाव्यात की नाही ? दि. २१ला सकाळींच बातमी—" वेस्टइंडिज्ने कसोटी सामना जिंकला. भारताच्या दुसऱ्या डावात ९८ धावा ! " पुन: पहिल्या डावाचीच पुनरावृत्ति. स्टेअर्स हॉलनें आघाडीत चार खिडारें पाडलीं आणि गिब्स सोबर्सनें कंबरडें मोडलें. समाधान एवढेंच वाटलें की, बापू नाडकर्णी या उल्कापातातहि बारा धावा काढून नाबाद राहिला. सामना संपला. पहिल्या दिवशी दोन तास पाऊस पडला हे लक्षांत घेतलें तर पांच दिवसांचा सामना जवळ जवळ तीन दिवसांतच संपला. पहिल्या दिवशीं दोन तास पाऊस पडला म्हणून सामना चौथ्या दिवसापर्यंत रेंगाळला एवढेंच !

या दुसऱ्या डावांत सरदेसाईला हेन्ड्रिक्सच्या अपीलावर झेलबाद केलें. तो निर्णय संशयास्पद होता असे म्हणतात. हे सर्व संशय जमेस धरूनहि असेच म्हणावें लागेल की, दहा विकेटस्नी सामना गमावला तो फार तर पांच-सहा विकेटस्नी गमावला असता, पण एकंदरीत भारताची झालेली ससेहोलपट अत्यंत अनपेक्षित झाली आणि त्याला कारण हॉल, स्टेअर्स, सॉबर्स, गिब्स आणि तो बहाद्दर हेंड्रिक्स !

हें सगळे पुढील सामन्यांत आजारी पडले तर— ? मन चिंती तें वैरी न चिंती असें म्हणतात ना ?

[ अपूर्ण. ]


# गुजरातेंतील मराठी राजवट

मूल्य सात रुपये

वि. गो. खोबरेकर

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणें २



तार :—गिरणासाखर ) विना सहकार नहि उद्धार ( फोन नं. २१

महाराष्ट्राचे महान नेते कै. भाऊसाहेब हिरे यांच्या अशीर्वादाने प्रगतिपथावर असलेला...

# दी गिरणा सहकारी साखर कारखाना लि.

• पोस्ट दाभाडी, ता. मालेगांव जि. नासिक •

※ कारखान्याने चाथा गळित हंगाम दि. २१–४–१९६२ रोजीं यशस्वीरीत्या पार पाडला ※

प्रगतीचा आढावा :

| हंगाम | ऊंस गाळित मे. टन्स. | साखर उत्पादन पोत्यांची | सरासरी रिक्व्हरी |
|---|---|---|---|
| सन १९६०–६१ | १,४५,८९७ | १,५५,३२३ | १०·१४. |
| सन १९६१–६२ | १,४४,४३४ | १,६८,६६० | ११·६५. |

• यंदाच्या शुभ्र व दाणेदार साखरेस महाराष्ट्रांतील बाजारपेठांतून लोकप्रियता मिळाली आहे •

— मॅनेजिंग डायरेक्टर —
श्री. के. एस्. मोघे,

— चेअरमन —
श्री. टी. आर्. पवार,
वकील

# गंगाजळी

[प्रतिमासीं 'माणूस'च्या भेटीस पुष्कळ भावंडें येतात. या मराठी मासिकांतून घेतलेले वैशिष्ट्यपूर्ण वेचे आमच्या वाचकांस या सदरांत वाचावयास मिळतील.]

## यशाचे 'अलिप्त' मानकरी

[साहित्य अकादमीने डॉ. द. न. गोखले याच्या 'डॉ. केतकर' या ग्रथास पाच हजाराचें १९६२ चें पारितोषिक दिल्याचें जाहीर झालें. त्यानंतर त्याची झालेली प्रतिक्रिया श्री. रा. शं. दातार यानी 'मनोहर' मासिकाच्या एप्रिल ६२ अकात नोंदली आहे. ती उद्बोधक असून डॉ. गोखले यांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी आहे. श्री. दातार लिहितात—]

"साहित्य अकादमीच्या पारितोषिकाची बातमी 'आकाशवाणीवर ऐकली आणि मी धावतच डॉक्टराच्या घरी त्याचें अभिनदन करण्यासाठी गेलों. त्याच्या घरांतलें वातावरण त्या वेळी स्वाभाविकपणेच आनंदमय होऊन गेलेलें होतें. अभिनदनाचा वर्षाव चालू झाला होता, सातारी पेढयांनी तोंडें गोड होत होती, हास्यविनोदाच्या फैरीवर फैरी झडत होत्या, पण त्या सर्व आनंदाच्या केद्रस्थानी उभे असलेले डॉक्टर गोखले एकाएकी गंभीर आणि अंतमुर्ख होऊन मला म्हणाले, "एवढ मोठं यश मला इतक्या लवकर मिळायला नको होतं!" हें खोटया विनयाचें प्रदर्शन नव्हतें. कसल्याहि तऱ्हेच्या ढोंगबाजीचा डॉक्टराना तिटकारा असून निखालस आणि खळखळीत प्रामाणिकपणा हें त्याच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचें एक वैशिष्टय आहे. चाळिशीचा ऊंबरठासुद्धा पुरता गाठला नाही, तेवढयांतच एका परमोच्च यशाचें रसरशीत फळ स्वत:च्या पदरांत पडलेलें पाहताच आता आपली उद्योगाची ईर्षा तृप्तीची ढेकर देऊन कायमची मावळणार की काय या विचाराने आनंदाच्या त्या ऐन क्षणीदेखील त्याचें मन खरोखरच काहीसे भयकातर झाले होतें. अत्युच्च प्रकारच्या यशसिद्धीचा रोमांचकारी अनुभव एकीकडे घेत असतानाच त्या यशाचें आपल्या एकदर जीवनाच्या दृष्टीने कठोर मूल्यमापन अलिप्तपणें करण्याची ही प्रवृत्ति खरोखरच असामान्य नव्हे का?"

• • •


## कलाकृतीचें कलाबाह्य विश्लेपण

["टीकाक्षेत्राचे काही विशेष", श्री. नरहर कुरुदकर यानी प्रतिष्ठानच्या मार्च. ६२ अकांत सागितले आहेत. टीकाक्षेत्रात केले जाणारें पुष्कळसे विवेचन त्या क्षेत्राच्या बाहेर कसे जातें याचें विवेचन करतांना ते लिहितात—]

"अमुक कालात वाङ्मयाच्या प्रेरणा कोणत्या होत्या, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. तेराव्या-चौदाव्या शतकातील मराठी वाङ्मयाच्या प्रेरणा कोणत्या? राणी व्हिक्टोरियाच्या कारकीर्दींत इंग्रजी वाङ्मयाचें स्वरूप कोणतें? असे प्रश्न आपण नेहमी विद्यार्थ्यांना विचारीत असतो. आणि ज्याना परीक्षा द्यावयाची असते. त्यांना या प्रश्नाची बरीवाईट उत्तरें लिहावीच लागतात. खरोखरी कोणत्याहि काळातील वाङ्मयाच्या प्रेरणा कशा सांगावयाच्या? उद्या जर मुक्तेश्वर एकनाथाचा नातू नसून ज्ञानेश्वराचा आजा होता आणि "रुक्मिणी-स्वयंवर" कार नरेंद्र हा तुकारामाचा भाऊ होता, असें नवीन संशोधन पुढे आले की, त्या त्या काळांतील वाङ्मयाच्या प्रेरणा बदलत जाणार. म्हणून नाईलाजानें इतिहासानें दिलेल्या माहितीवर विसंबण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. कोणतीहि कलाकृति रसिकाला आपण कलाकृति आहोंत याची साक्ष देते. आपण कोण्या काळातील आहोंत, याची माहिती देत नाही. एकदा इतिहासानें मार्गदर्शन करावयाचें म्हटल्यावर उद्या भौतिकवादी इतिहासमीमासेनें कालिदास सरंजामदार मनोवृत्तीचा असल्यामुळें त्याने दुष्यंताच्या स्वैराचाराचें समर्थन केलें आहे, असा धडा आम्हाला शिकविला तर राग का यावा? हीच गोष्ट व्यक्तिविषयक प्रश्नांची आहे. त्या त्या कलावंताचें जीवन तपासून पाहत आम्ही कलाकृतींचें विवेचन करीत असतों. कुणी एक मेरी फिल्टन होती. या मेरी फिल्टनच्या प्रेमात शेक्सपिअर सापडला होता. म्हणून शेक्सपिअरनें आपल्या वाङ्मयातील, सर्व अलौकिक सौंदर्यशालिनींच्या सौंदर्याचें वर्णन करताना, त्यांच्या रगांत सावळी झाक होती, असें म्हटलें आहे, असा एकाचा दावा, तर गडकरी एका मुलीवर सतत प्रेमाचा वर्षाव करीत होते, पण ती मुलगी त्यांना अप्राप्य होती म्हणून त्यांच्या प्रेमकाव्यावर शोकाची, भग्नतेची, व्यथेची गडद छाप आहे, असा दुसऱ्याचा दावा मला एक प्रश्न कळत नाही. जर समजा, "प्रेम आणि मरण" ही कविता गडकऱ्यानी लिहिलेली आहे हे आम्हाला माहीत नसतें, तर त्या कवितेचें मोल बदललें असते काय? आजकाल कलावंत आपलें नांव कलाकृतीच्या बाहेर ठेवतात; पण पूर्वी साहित्यिक, दर ठिकाणी आपल्या नांवाचा उल्लेख करीत "तुका म्हणे आता" हें याचें उत्तम उदाहरण आहे. कलावंताचें नाव हा जर कलाकृतीचा भाग नसेल, तर मग कलाकृतीच्या मागे कलवतापर्यंत जाण्याचा रस्ताच कुठे शिल्लक राहातो? सगीत क्षेत्रांत एक महत्त्वाची घटना म्हणून असें सागतात की, पंडित भातखडे यांनी "चतुर पंडीत" या नांवाने काही लिखाण केले व आपल्या मताच्या समर्थनार्थ चतुर पडिताचा हवाला दिला. कदाचित् असें हे असेल की, त्रिबक बापूजी ठोंबरे हें टोपण नाव धारण करणाऱ्या कुणातरी व्यक्तीनें "फुलराणी" लिहिलेली असेल. समीक्षेशी त्याचा सबंध येतो कुठे? वाङ्मय समीक्षेंत कलाकृतीचा काळ आणि कलावंत याचा संबध फक्त कलाबाह्य असणाऱ्या इतर माहितीच्या आधारेंच येणें शक्य आहे."

• • •

# राजा शिवछत्रपती



भाग एक ते दहा

**ब. मो. पुरंदरे**


एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय


मूल्य :: सोळा रुपये

**राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २**

संपादक, मुद्रक व प्रकाशक : **श्री. ग माजगांवकर**, राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रण स्थळ : **साधना प्रेस**, ४३०-४३१ शनवार पेठ, पुणें २. **कव्हर छपाई** : उदय मुद्रणालय, पुणें २.